जून–जुलै २०२५
वीरनिर्वाणसंवत् २५५१
वर्ष ७५वे, पुष्प ११–१२वे
ज्येष्ठ–आषाढ–श्रावण शके १९४७

UGC-CARE Listed
Research Journal
(Since-Jun2019)

www.sanmatimasik.com

ISSN- 2395-5503
RNI No. MAH/MAR/2006/21290/27-9-07

बाहुबली विद्यापीठ व ब्रह्मचर्याश्रमाचे मुखपत्र

# सन्मति

मूल्य – २५ रु.

## श्रुतपंचमी विशेषांक

# प्राचीन श्रुत भांडार – संवर्धन आणि संरक्षण प्रक्रिया



(१०१वा विशेषांक)

## संस्मरणीय क्षणचित्रे.... साहसी कर्तृत्वाची... शरयूताईंची.. (विशेष आलेख पृ. क्र. ४९ ते ५४)



गुरुकुल दिव्यादानप्रसंगी-१९८३



गुरुकुल दिव्यादानप्रसंगी द. भा. जैन सभा वीरसेवा दलाचे नैमित्तिक अधिवेशन



कंकुबाई श्राविकाश्रमच्या सुवर्णमहोत्सवप्रसंगी गुरुकुलमाता गजाबेन यांचा सन्मान करताना





प. पू. गुरुदेवश्री समंतभद्र महाराज यांच्या समाधीप्रसंगी भावपूर्ण विनयांजली अर्पण करताना



दिल्ली येथे १९९१ साली गुरुदेवश्रींच्या जन्मशताब्दीचा शुभारंभ पंतप्रधान श्री. पी. व्ही. नरसिंहराव यांच्या शुभहस्ते करविताना सोबत साहू अशोककुमारजी




बाहुबली येथे १९९१ साली गुरुदेवश्रींच्या जन्मशताब्दीप्रसंगी मंचासीन श्री. कल्लाप्पाण्णा आवाडे, श्री. उदयसिंह गायकवाड, श्री. दिग्विजय खानविलकर, ब्र. भूपाल गुरुजी, गुरुकुलमाता गजाबेन यांच्या सोबत शरयूताई दफ्तरी

१९८३ साली बाहुबलीच्या पहाडावरील संकटसमयी शरयूताईंच्या साहसी कर्तृत्वाची झलक-






बाहुबलीतील सन्मती प्रेसमधील नवीन ऑफसेट मशीनचे उद्घाटन




ब्र. माणिकचंदजी भीसीकर गुरुजी यांचा स्मृतिविशेषांकाचा प्रकाशन समारंभ

सत्प्रेरणा-शुभाशीर्वाद




प.पू. गुरुदेव १०८ श्री
समंतभद्र महाराज

उन्नतं मानसं यस्य, भाग्यं तस्य समुन्नतम् ।

# सन्मति

पो. बाहुबली, जि. कोल्हापूर
पिन-४१६ ११० ☎(०२३०) २५८४४२२

संस्थापक-संपादक



स्व. ब्र. माणिकचंद भीसीकर
एम्. ए., न्यायतीर्थ

## जून-जुलै २०२५

❍ वर्ष: ७५ वे ❍ पुष्प ११-१२वे

❑ वार्षिक वर्गणी :१५१/-

❑ द्वादशवर्षीय वर्गणी :१५०१/-

❍ संपादक मंडळ ❍

❍ **डॉ. नेमिनाथ शास्त्री,** एम.ए., बी.एड्., पीएच्.डी.

❍ **सुश्री प्रज्ञाताई डोणगांवकर,** कारंजा, बी.एस्सी.

❍ **डॉ. लीना चवरे,** कारंजा, एम.ए., बी.एड्., पीएच्.डी.

**(सन्मती मासिकातून प्रकाशित होणारे सर्व शोधप्रबंध व लेख हे संशोधक आणि लेखकांचे व्यक्तिगत विचार आहेत. त्याची प्रामाणिकता व योग्यता याविषयी तेच सर्वस्वी जबाबदार आहेत. प्रकाशक किंवा संपादक हे केवळ संवाहक आहेत.)**

## ⊙ अनुक्रमणिका ⊙

| | | |
|---|---|---|
| ❋ संपादकीय..१ श्रुतपंचमीच्या निमित्ताने | - डॉ. सौ. लीना चवरे, कारंजा-लाड | ०४ |
| ❋ संपादकीय..२ सन्मति : श्रुतसेवेचा अमृतमहोत्सवी नंदादीप | -डॉ. नेमिनाथ शास्त्री, बाहुबली | ०६ |
| ❋ प्रवचनसार : जीवनस्वातंत्र्याची कला (भाग १३६) | -आर्यिका १०५श्री शुद्धोऽहंश्री माताजी | ११ |
| ❋ योगसार चिंतन (०६) | - प्रियदर्शन जैन, नागपूर | १५ |
| ❋ पट्टमहादेवी-शब्दांपलिकडील अन्वयार्थ (२२) | -विपुल खेडकर, नागपूर | १७ |
| ❋ आर्जव (कविता) | -पं. श्री. जिनचन्द्र अलमान,शास्त्री-हेरले | २१ |
| ❋ 'सोलहकारण भावना भाय....!'(१०) | - हर्षा वेखंडे, नागपूर | २२ |
| ❋ रामायण आणि महाभारत : तौलनिक विवेचन-३ | -डॉ. सौ. लीना चवरे, कारंजा-लाड | २५ |
| ❋ प्रथमानुयोग | -मीना किरण गरिबे (जैन), अमरावती | २९ |
| ❋ करणानुयोग | -सौ. विजया अविनाश संगई, अंजनगाव सुर्जी | ३२ |
| ❋ चरणानुयोग | -अनुपमा नेगीसागर अंबुडकर, डोंबिवली (पू) | ३४ |
| ❋ द्रव्यानुयोग | -सौ. भारती खंडारे | ३७ |
| ❋ आचार्य तारण स्वामी कृत ग्रन्थों में श्रुतविवेचना | -मीनाक्षी नवनीतलाल जैन,चोपडा | ३८ |
| ❋ श्रुतपंचमी | -वंदना दर्यापूरकर, अमरावती | ४१ |
| ❋ प्राकृत साहित्य परम्परा में स्त्री-शिक्षा | -डॉ. विकास चौधरी,नई दिल्ली | ४४ |
| ❋ लोभ - दुःखप्रदाता | - पं. श्री. प्रदीप धोतरे (शास्त्री), बाहुबली | ४७ |
| ❋ बहुआयामी व्यक्तिमत्त्व : शरयूताई दफ्तरी | -श्री. गोमटेश बेडगे, बाहुबली | ४९ |
| ❋ साहसी उद्योजिका श्रीमती शरयुताई दफ्तरी | -डॉ. नेमिनाथ शास्त्री, बाहुबली | ५२ |
| ❋ पद्मश्री शरयूताई दप्तरी यांची श्रद्धांजली सभा | | ५४ |
| ❋ अनवट वाटेवरील प्रवासी | -वृंदा प्राजक्त मेहता, नाशिक | ५५ |
| ❋ शाळांचा निकाल | | ५७ |

# श्रुतपंचमीच्या निमित्ताने

**डॉ. लीना उदय चवरे,** कारंजा(लाड)

ज्येष्ठ शुक्ल पंचमी ! जैन श्रुत परंपरेतील एक महत्त्वपूर्ण दिवस! एक असा दिवस की ज्या दिवशी जिनवाणीची वाहती धारा लिपीबध्द झाली. मग त्याआधी ही ज्ञानधारा कशी वाहती होती ? तर मानवी बुद्धीची क्षमताच अशी तीक्ष्ण होती की, मौखिक परंपरेने हे ज्ञान पुढील पिढ्यांमध्ये प्रवाहित होत राहिले.

भ. महावीरांची परम कल्याणकारी दिव्यध्वनी गौतम गणधरांनी जीवमात्रांपर्यंत पोचवली. भ. महावीरांचे ज्या दिवशी निर्वाण झाले त्याचदिवशी सायंकाळी गौतम गणधरांना केवलज्ञानाची प्राप्ती झाली. नंतर बारा वर्ष त्यांनी तत्त्वोपदेश दिला. ज्या दिवशी त्यांचे निर्वाण झाले त्याचदिवशी संध्याकाळी सुधर्मस्वामींना केवलज्ञानाची प्राप्ती झाली. त्यांनी बारा वर्षे तत्त्वोपदेश दिला. त्यांच्या निर्वाणानंतर त्याच दिवशी संध्याकाळी जम्बुस्वामींना केवलज्ञान झाले. त्यांनी अडतीस वर्षे तत्त्वपरंपरा चालविली. म्हणजे अशाप्रकारे भ. महावीरांच्या निर्वाणानंतर बासष्ट वर्षे केवलींची परंपरा सुरू होती. यानंतर केवलज्ञानद्वारा लोकालोकास न जाणता श्रुतद्वारा लोकास जाणणारे पाच श्रुतकेवली झाले. त्यापैकी अंतिम श्रुतकेवली म्हणजे भद्रबाहू .

त्यांच्या नंतर सुमारे १८३ वर्षांपर्यंत अकरा अंगांचे ज्ञानी होत राहिले. परंतु आ. भद्रबाहूपर्यंत मौखिक परंपरेने चालत आलेले ज्ञान त्यांच्यानंतर मात्र स्मरणशक्तीच्या हीनतेमुळे कमी कमी होत चालले. याला पंचमकाळाचा महिमा म्हणावा लागेल हवं तर ! भगवान महावीरांच्या निर्वाणानंतर ६८३ वर्षे व्यतीत झाल्यानंतर आचार्य धरसेन झाले. परंतु त्यांच्यापर्यंत ते ज्ञान येऊन पोहोचेपर्यंत फक्त एका अंगाचा काही भाग एवढेच शेष राहिले होते. आचार्य धरसेन निमित्तज्ञानी होते. त्यांनी अचूक ओळखले की, आगामी काळात हे शेष ज्ञानही काळाच्या उदरात लय पावेल. तेव्हा 'आगामी अरिष्ट टाळण्यासाठी हे शेष ज्ञान लिपीबद्ध व्हायला हवे ', ही त्यांची आज्ञा शिरोधार्य मानून त्यांचे शिष्य आचार्य पुष्पदंत आणि भूतबली यांनी आचार्य धरसेनांकडून ग्रहण केलेले ते ज्ञान परिश्रमपूर्वक लिपीबध्द करण्यास सुरुवात केली आणि त्यांच्या या परिश्रमाचे फलित म्हणजे लिपीबध्द झालेला 'षट्खंडागम' ग्रंथ ! आणि ज्या दिवशी हे कार्य पूर्णत्वास गेले तो दिवस होता ज्येष्ठ शुक्ल पंचमी ! यानंतर पुढील काळात मग अनेक आचार्यांनी अनेक अनमोल ग्रंथांची रचना केली.

जैन परंपरेमध्ये या दिवसाला अनन्य-साधारण महत्त्व आहे. परम कल्याणकारी जिनवाणी मातेच्या संरक्षण आणि संवर्धनाच्या प्रयत्नांची ही सुरूवात होती. लौकिक व्यवहारामध्ये आम्ही मदर्स डे, मातृदिन साजरा करतो. आमचे जीवन संस्कारांनी समृध्द करणाऱ्या मातेप्रती आम्ही कृतज्ञता व्यक्त करतो. मग जिनवाणी माता तर आध्यात्मिक संस्कार करून फक्त वर्तमान जीवनच नव्हे तर पुढील अनेक भवांना समृध्द करते, त्यामुळे **श्रुतपंचमी म्हणजे खऱ्या अर्थाने मातृदिन !**

आमच्या अनेक विद्वान आचार्यांनी आमच्या कल्याणाचा विकल्प मनात घेऊन अतिशय परिश्रमपूर्वक ही अनमोल धरोहर आमच्या हाती सुरक्षितपणे पोचविली आहे. 'अतिशय परिश्रमपूर्वक' म्हणण्याचे कारण म्हणजे त्याकाळी काही आजच्यासारखी प्रगत लेखन सामग्री उपलब्ध नव्हती. विशिष्ट प्रक्रिया करून वृक्षांची पाने (उदा. ताडवृक्ष वगैरे ) प्रथम लिहिण्यायोग्य करावी लागत असत. त्यावर कोरणीने एक एक अक्षर कोरून

अचूक लिहावे लागत असे. कारण खोडरबरचा पर्याय उपलब्ध नव्हता. त्यानंतर अनेक नैसर्गिक घटक वापरून तयार केलेल्या शाईचा उपयोग करून ती अक्षरे ठळक करीत असत. थोडक्यात अतिशय परिश्रमपूर्वक ही मौलिक ज्ञान धरोहर त्यांनी सुरक्षित ठेवली आणि त्यानंतर टप्प्याटप्प्याने लेखन सामग्री तसेच मुद्रण तंत्रज्ञानातील बदलांसह हे ज्ञान आमच्यापर्यंत पोहोचून आता तर ते डिजिटल झाले आहे. परंतु या सर्व ज्ञान प्रवासामध्ये आता आमचे कर्तव्य काय ? आम्हाला गांभीर्याने विचार करावा लागेल की या पावन दिवशी सुंदर वेष्टनाद्वारे शास्त्रांना सजविणे, त्यांची पूजा करणे एवढेच फक्त करुन श्रुतपंचमी साजरी करायची आहे की यापलीकडे जाऊन आमच्या अनेक कर्तव्यांचे, जबाबदाऱ्यांचे निर्वहन आम्हाला करायचे आहे ?

आम्हाला हे समजून घ्यावे लागेल की जिनवाणीची फक्त पूजाच नाही तर तिचे अध्ययन महत्त्वाचे आहे. सुंदर वेष्टन घालून तिला कपाटात नाही तर अंतरंगात सुरक्षित करायचे आहे. फक्त शास्त्रदानच नाही तर प्रभावना सुद्धा करायची आहे. आमच्या मुला-नातवांना A for Apple शिकवतानाच A for Arihant हे सुद्धा आवर्जून शिकवायचे आहे. ट्यूशनला पाठवतानाच पाठशाळेत सुध्दा पाठवायचे आहे. अवांतर वाचनासोबत धार्मिक पुस्तकांच्या वाचनाची आवड रुजवायची आहे. आता बालबोधादी अनेक धार्मिक पुस्तके आकर्षक स्वरूपामध्ये इंग्रजीतून उपलब्ध होत आहेत, ती आवर्जून कॉन्व्हेंटमधील मुलांच्या हातात ठेवायची आहेत. या शार्प पिढीच्या मनात उद्भवणाऱ्या धर्मविषयक शंकांकडे दुर्लक्ष न करता त्यांचे तर्क आणि बुद्धीद्वारे निरसन करून त्यांना धार्मिक अध्ययनाकडे, स्वाध्यायाकडे वळवायचे आहे. स्वाध्यायाचे महत्त्व पटवून द्यायचे आहे. जिनवाणी ताम्रपटांवर, भिंतींवर, दगडांवर फक्त उत्कीर्ण न करता ती मनामनात उत्कीर्ण करायची आहे. 'बालमनावर जसे संस्कार करू तसे पुढे व्यक्तिमत्त्व घडेल' ही गोष्ट लक्षात घेऊन ते लहान असतानाच जीवनातील धर्माचे महत्त्व त्यांच्या मनावर बिंबवायचे आहे.

आजची पिढी विज्ञानाची पुजारी आहे आणि काळानुसार धावताना हे होणारच ! परंतु हाच धागा पकडून या गोष्टीचा उपयोग आम्ही धर्मासाठी करून घ्यावयास हवा. अनेक दुर्मिळ ग्रंथ डिजिटल स्वरूपात सेव्ह करून ठेवता येतील. ॲनिमेशनचा वापर करून प्रथमानुयोगातील कथा आज युट्युब वरून मुलांपर्यंत पोचवण्याचा प्रयत्न काही तरूण मंडळींकडून होत आहे, तो निश्चितच स्तुत्य आणि मुलांना धर्माची गोडी लावण्यासाठी उपयुक्त आहे. विज्ञानाचा जास्तीत जास्त उपयोग धर्माच्या जास्तीत जास्त प्रभावनेसाठी करून घेता आला आणि विज्ञानाशी सूर जुळवून घेत वाटचाल करता आली तर भविष्यातही धर्माचा ध्वज फडकत राहील. लॉकडाऊनच्या कठीण काळात मंदिरे बंद असताना झूम वगैरे ॲप्सच्या माध्यमातून एका क्लीकवर जिनवाणी घराघरात पोहोचली. आज अनेक लाइव्ह धार्मिक क्लासेस, शिबिरेसुद्धा होत आहेत. विज्ञानाच्या या महिमेचे स्वागत करून तिचा जास्तीत जास्त उपयोग आम्ही आमच्या कल्याणासाठी करून घेतला तर ती आमच्या पूर्व आचार्यांप्रति खरी कृतज्ञता होईल.

सन्मति मासिकाचा हा ७५व्या वर्षातील शेवटचा अंक ! या ७५ वर्षांमध्ये धर्म प्रभावनेचे बरेच कार्य सन्मतितर्फे पार पडले, ही निश्चितच समाधानाची गोष्ट आहे. तसेच सन्मति प्रकाशन, बाहुबलीतर्फे आजवर अनेक ग्रंथांचे, पुस्तकांचे प्रकाशन करण्यात आले आहे.

आज भारतभरातील अनेक जैन संस्थांच्या ग्रंथालयांमध्ये अनेक मौलिक साहित्यकृती आहेत.जुन्या मौलिक ग्रंथांसह ताडपत्रावरील हस्तलिखितांचा यात समावेश आहे. हा एक अनमोल साहित्यिक, सांस्कृतिक, ऐतिहासिक दस्तावेज आहे. कालौघात तो जीर्ण होऊन हाताळण्यास अयोग्य होऊ नये, हे श्रुत भांडार सुदीर्घ काळ सुस्थितीत राहावे, त्यातील शब्दसंपदा शाश्वत राहावी यासाठी त्याच्या संवर्धनाची नितांत आवश्यकता आहे. या मौलिक कार्याला वाहून

घेतलेल्या दोन सेवाभावी संस्थांविषयी माहिती देणारे दोन आलेख या अंकात दिले आहेत.आचार्य शान्तिसागर फौंडेशन (बेंगळुरू) आणि श्री कुंदकुंद जैन संस्कृति सेंटर, ( पोन्नूरमले ) व श्री कुंदकुंद कहान पारमार्थिक ट्रस्ट (मुंबई )या दोन ट्रस्टच्या समर्पित सेवाकार्याची व कार्यप्रणालीची संक्षिप्त माहिती वाचकांना निश्चितच प्रेरणादायी वाटेल.

या अंकामध्ये चारही अनुयोगांचे स्वरूप थोडक्यात विशद करणाऱ्या लेखांमध्ये त्या अनुयोगांच्या अभ्यासाची उपयोगिता स्पष्ट केली आहे. नैतिक मूल्यांच्या पडझडीच्या आजच्या युगात भौतिक सुखाच्या अतिरेकी हव्यासापोटी माणूस मानसिक समाधानापासून मात्र दूर जात आहे असे प्रकर्षाने वाटून जाते. अशावेळी जिनवाणीचे अध्ययन मानसिक स्थिरता प्रदान करण्यासाठी दीपस्तंभासारखे मार्गदर्शक ठरू शकते. जीवनातील कठीण प्रसंगांचा स्थितप्रज्ञतेने सामना करण्याचे सामर्थ्य प्रदान करू शकते. आणि सर्वात महत्त्वपूर्ण म्हणजे अनादी संसारचक्र भेदून मोक्षप्राप्तीसाठी दिशादर्शक आहे. ही जिनवाणीरूपी पणती हाती धरून जर संसारपथावर मार्गक्रमण केले तर त्या समीचीन प्रकाशात अज्ञानाचा अंधकार दूर करण्याचे सामर्थ्य निश्चितच आहे.

---

## संपादकीय....२

# सन्मति : श्रुतसेवेचा अमृतमहोत्सवी नंदादीप

**डॉ. नेमिनाथ शास्त्री, बाहुबली**

**❊ सन्मतीच्या माध्यमाने श्रुतसेवा –**

गुरुकुल शिक्षणप्रणाली ही मुळातच त्यागमय आदर्श तत्त्वावर आधारलेली आहे. त्यामुळे आजवरचे सर्व संपादक त्यागभावनेने भारावून गेलेले दिसून येतात. ह्या सर्वांना प. पू. गुरुदेवश्री समंतभद्र महाराजांची सत्प्रेरणा व शुभाशीर्वाद लाभला होता. यापूर्वी प्रकाशित संपादक-तालिकेतील सर्व संपादकांनी नि:स्वार्थ वृत्तीने कार्य केले आहे, करीत आहेत. वेतन, कमीशन तर दूरच विद्यावेतन, मानधनाची सुद्धा कोणीही अपेक्षा केली नाही. कसलाही मोबदला न घेता आपली शक्ती व वेळ सत्कारणी लावली आहे. उलट प्रसंगी स्वत:ची पदरमोड करून कार्य केले आहे, करीत आहेत.

सर्व संपादकांनी नाव, यश-कीर्ती यांची अपेक्षा न करता नि:स्पृहवृत्तीने काम केले आहे. साहित्यिकांनी, लेखकांनी, कविवर्गांनी सुद्धा कधीही मोबदल्याची, वेतनाची, यश-अपयशाची इच्छा केली नाही. सर्वजणांनी केवळ जैनधर्माच्या समीचीन तत्त्वज्ञानाच्या प्रचार-प्रसाराची अभिलाषा उराशी बाळगली आहे. गुरुकुल-शिक्षण प्रणालीच्या मुशीतून बाहेर पडलेल्या विचारांची छाप आजही त्यांच्यावर दिसून येते.

सन्मतिचे ध्येय व तदनुसार झालेले सेवाकार्य सर्व समाजांनी मान्य केलेले दिसून येते. किंबहुना आजही बहुतांश समाज त्याच विचारांची अपेक्षा करीत असलेला दिसून येतो. **''नि:स्वार्थ पण उपयुक्त सेवा करणाऱ्यास समाज जरूर साहाय्य करतो''** हे पूज्य गुरुदेवश्रींचे अभिवचन विशेष प्रचीतीस आलेले येथे दिसून येते.

सन्मतीची साहित्य, कला, संस्कृती आणि धर्म इत्यादी बाबतीतील सेवा सर्वांना सादर आहेच. सहसा अभिनिवेशाच्या, भ्रांत कल्पनांच्या आणि असद्-अभिरुचीच्या आहारी सन्मती कधी गेला नाही. भ. महावीरांच्या सत्य-अहिंसा आणि अनेकांत यांचा अमर संदेश वाचकांच्या घरी पोचविण्याचे अल्पसे कार्य सन्मतीने चोख

बजावलेले दिसून येते.

मनोरंजन आणि ज्ञान यांच्या नावाखाली वाचकांच्या श्रद्धेला आणि आचरणक्षम संस्काराला सुरूंग लावून केवळ पोटासाठी हीनरुचीचे साहित्य पुरविण्याचे ध्येय सन्मतीच्या संपादकांनी कधी बाळगले नाही.

सन्मतीने आपल्या सामर्थ्याला अनुसरून राष्ट्राची व समाजाची सेवा केली आहे. विशेषत: मराठी भाषा बोलणाऱ्या जनतेला खरा जैनधर्म काय आहे, जैन संस्कृतीची भारताला चिरंतन देणगी कोणती आहे, याची कल्पना आणून देण्याचे कार्य सन्मतीने केले आहे. हे करत असताना कोणत्याही प्रकारचा अभिनिवेश मनाशी धरून इतरांचा विरोध केला नाही. अन्य संस्कृतीला तिरोभूत केले नाही. कूपमंडूकवृत्ती न बाळगता अंतरंग मन विशाल बनेल अशी भावना सदैव ठेवली आहे.

मुद्रणक्षेत्रातील कार्य खूप वेळ, पैसा व शक्ती खाणारे काम असते. आज प्रगत तंत्रज्ञानाचा आधार घेतला जातो. तथापि अनेक अडचणींना सामारे जावे लागते. आजपेक्षा पूर्वीच्या काळी अनंत संकटे येऊन पडत होती, तरी सुद्धा त्यांना न जुमानता वेळोवेळी अंक, विशेषांक अत्यंत आकर्षक, सुबक पद्धतीने छापली आहेत. प्रकाशन, तांत्रिक, मानसिक अशा अनेक अडचणीमुळे कधी कधी अंकास विलंब झाला, पण वाचक वर्गावर कधी अन्याय होणार नाही याची दक्षता सर्व सन्मती प्रकाशनाच्या टीमने घेतलेली दिसून येते.

वास्तविक प्रारंभी सन्मती हे कोणत्याही संस्थेचे मुखपत्र, तिला कोणत्या तरी संस्थेचा आश्रय किंवा ती व्यक्तिगत मालमत्ता नव्हती, त्यामुळे तिच्या संपूर्ण खर्चाची जबाबदारी ग्राहक व समाजातील उदार दातारांच्या देणगीवर चालत होती. त्यामुळे प्रारंभकाळी विविध योजनेस अनेक लोकांनी वेगवेगळ्या प्रकारे सहकार्य करून सन्मतीस संजीवनी दिली. पण जेव्हा ती बाहुबलीस स्थलांतरित झाली आणि ब्र. भीसीकर गुरुजींच्या न्यायपूर्ण आदर्श नि:स्वार्थ कार्यशैलीमुळे ती बाहुबली संस्थेचा एक अविभाज्य अंग बनली. तेव्हा सन्मती 'बाहुबली ब्रह्मचर्याश्रम' या संस्थेशी इतकी एकनिष्ठ झाली की तिच्या भरण-पोषणाची सर्वस्वी जबाबदारी संस्थेवर आली. तथापि ती स्वयंपूर्ण आहे. अनेक उदारचेता दातार आजही भरभरून सहकार्य करीत आहेत, असे दिसून येते.

संपादकीय कार्यप्रणालीचा विचार केला असता ब्र. माणिकचंद भीसीकर (गुरुजी) यांनी संपादकाची धुरा अत्यंत समर्थपणे पेलली. संपादकाची सर्व कर्तव्ये त्यांनी पूर्णपणे पार पाडण्याचा प्रयत्न केला. लेखकांशी संवाद साधणे, पत्र-व्यवहार करणे, आलेले लेख वाचून त्यातील प्रकाशित करण्यायोग्य लेखांची निवड करणे, त्यात सुधारणा करणे, योग्य मथळा सुचविणे, अंकाची मांडणी करणे, वृत्तसंकलन करून त्यांचे संशोधन करणे, लोकांचे कौतुक करणे, सत्कार्यास प्रेरणा देणे, जनसंपर्क ठेवणे, प्रकाशनात काळजीपूर्वक लक्ष घालणे, काळानुरूप बदल करणे, उच्च साहित्य लोकासमोर मांडणे, प्रकाशनातील सर्व अडचणी दूर करणे, आर्थिक निधी उभारणे व ती भक्कम करणे, प्रूफ तपासणे, ऑपरेटरांना मार्गदर्शन करणे इत्यादी सर्व किचकट व परावलंबीची कामे करवून घेण्याचे काम ब्र. भीसीकर (गुरुजी) यांनी तब्बल ५३ वर्षे केले. आज अशाप्रकारचे काम मी स्वत: (डॉ. नेमिनाथ शास्त्री) गेली २४ वर्षे झाली करीत आहे. त्यातही गेल्या तीन वर्षापासून कारंजानिवासी श्रीमती प्रज्ञाताई डोणगाकर व डॉ. लीनाताई चवरे यांचे बहुमोल सहकार्य लाभत आहे. आता तर सन्मती प्रेस नसल्याने परावलंबीत्व वाढले आहे. 'पराधीन सपने हूँ सुख नाहीं' ह्या तुलसीदासांच्या वचनाप्रमाणे कार्य करीत रहावे लागते, पण कालौघात सन्मतीने आपले ध्येय, उद्दिष्टे डोळ्याआड न करता कार्य करीत रहावे, अशाप्रकारचेच मार्गदर्शक, सहाय्यक मिळावेत अशी सद्‌भावना करतो.

**❊ सन्मतीच्या आधारे संशोधनात्मक कार्य–**

आज अखेर गेल्या ७५ वर्षात एकूण शंभर

विशेषांक प्रकाशित झाले आहेत. आनंदाची बाब ही आहे की १) नांदणी येथील वर्धमान लठ्ठे हे या विशेषांकावरती संशोधनात्मक प्रबंध लिहिण्याचा विचार व्यक्त करीत असून त्यांना नुकतीच त्या प्रकारे अनुमती मिळाली आहे. २) यापूर्वीच संदीप अंबेकर यांनी १९५० ते २००० या कालावधीतील सन्मतीमधून प्रकाशित कथांच्या वर संशोधनात्मक प्रबंध लिहिला असून तो मान्यतेसाठी सादर केला आहे. लवकरच त्यांना पीएच.डी. ही उपाधी प्राप्त होईल. ३) तसेच कोल्हापूर येथील श्री. दीपक कोण्णूरे यांनी सन्मती, जैन बोधक व प्रगती आणि जिनविजय या मासिकांच्या वर संशोधनात्मक प्रबंध लिहीत आहेत. तोही पूर्णत्वाकडे गेला आहे. ४) अहिल्यानगर (अहमदनगर) येथील वर्षा गडेकर यांनी गुरुदेवश्री समंतभद्र महाराज यांच्या पत्रसंग्रहांचा चिकित्सक अभ्यास यावर संशोधनात्मक कार्य करीत आहेत. ५) तर अंबाजोगाई येथील शिक्षणशास्त्राच्या प्राध्यापिका डॉ. सौ. कल्पना संतोष मुळावकर यांनी गुरुदेवश्री समंतभद्र महाराज यांचे शैक्षणिक विचार याविषयी पीएच.डी. पंधरा वर्षांपूर्वीच पूर्ण केली आहे. ६) कारंजानिवासी पण सध्या नांदेड येथे राहत असणारे डॉ. पंकज खंडारे यांनी गुरुकुल शिक्षण पद्धती : एक ऐतिहासिक आढावा याविषयी पाच वर्षांपूर्वीच पीएच.डी. ही उपाधी मिळविली आहे . ७) त्याचप्रमाणे आम्ही देखील २०१४ साली बाहुबली गुरुकुलाचा गौरवशाली इतिहास १९३४ ते २०१४ हा ६०० पानाचा इतिहास लिहिला आहे. या पुस्तकाविषयी अभिप्राय व्यक्त करताना आमचे गुरुजी प्राचार्य डॉ. शांतिकुमार पाटील, जयपुर हे असे म्हणतात की, हे इतिहासाचे पुस्तक म्हणजे खऱ्या अर्थाने डी.लीट. उपाधी देण्यायोग्य आहे, अशा प्रकारे संशोधनात्मक मांडणी यामध्ये केली आहे. ८) त्याचवेळी गुरुदेवश्री १०८ समंतभद्र महाराज : व्यक्तित्व आणि कर्तृत्व या पुस्तकाचेही लेखन आम्ही केले आहे.

याशिवाय अनेक लोकांनी जे लेखन किंवा संशोधन केले आहे. त्याकरिता या ७५ वर्षातील सन्मती मासिकाच्या सर्व अंकांचा साकल्याने सदुपयोग केला आहे. किंबहुना समाजाच्या वैचारिक, आध्यात्मिक अधिष्ठानाची दिशा ठरविण्यासाठी व समजून घेण्यासाठी यांचा वापर करणे अनिवार्य आहे.

यासोबत बाहुबलीने आजअखेर ११०हून अधिक पुस्तके प्रकाशित केली आहेत. त्यापैकी ८०% पुस्तके यापूर्वी मासिकातून प्रकाशित झाली होती. लोकांच्या आग्रहास्तव ती संकलित करून छापली आहेत.

**❊ सुवर्णमहोत्सवी विशेषांकातून सन्मतीविषयी काही अभिप्राय–**

❊ गुरुकुल स्नातक प्रसिद्ध विद्वान **डॉ. पद्मनाभ जैनी** लिहितात की, सन्मतीच्या पूर्वी गुरुकुल स्नातकातील कोणासही लेखनकलेची प्रतिभा असेल अशी कल्पनाही नव्हती. वक्तृत्वावर व शास्त्र वाचनावरच सर्व भर होता, परंतु सन्मतीच्या माध्यमातून अनेक नामवंत लेखक आश्रमातून तयार झाले आहेत.......

..... गुरुकुल स्नातकांच्या नव्या पिढीतील अनेक विद्वानांनी मराठी भाषेतील जैन वाङ्मय याबद्दल जे अनेक शोधपूर्ण लेख प्रकाशित केले आहेत. ते सन्मतीच्या अभावी साध्य झाले नसते असे वाटते. त्यांच्यामुळे साहित्यसेवेचे एक नवे दालन उघडले गेले आहे, यात शंका नाही....

...... सन्मतीची दुसरी महत्त्वाची देणगी म्हणजे परमपूज्य गुरुदेवांनी निर्माण केलेल्या विशाल गुरुकुल परिवारामध्ये कौटुंबिक प्रेम जागृत ठेवणे. गुरुकुल म्हणजे केवळ शिक्षक आणि विद्यार्थी हे दोनच घटक नाहीत. त्यातून बाहेर आलेल्या स्नातक वर्गाचाही यात समावेश होतो. आणखी एक महत्त्वाचा गुरुकुल परिवारातील सदस्य म्हणजे उदारचेता धर्मानुरागी श्रावक–श्राविकांचा विशाल समूह. परमपूज्य गुरुदेवांच्या अलौकिक निःस्पृहतेने त्यांच्याकडे ओढलेला व ध्येयाशी सहमत होऊन त्या कार्यास हातभार देणारा हा समाज अनेक ठिकाणी विद्यमान आहे. त्यांचे आश्रमावरील प्रेम हा

सर्वात अमूल्य असा निधी आहे. सन्मतीच्या माध्यमातून या विशाल गुरुकुल कुटुंबामध्ये जो वात्सल्य भाव पूज्य गुरुदेवांच्या काळी होता तो भविष्यातही राहील अशी आशा करण्यास हरकत नाही.

✻ प्रसिद्ध लेखक **डॉ. निर्मलकुमार फडकुले** लिहितात की, जोपर्यंत केवळ लोकरंजन हेच लक्ष ठेवून मासिके चालत राहतात तोपर्यंत ती यशस्वी होऊ शकतात, पण सन्मतीचा दृष्टिकोन याहून सर्वस्वी निराळा आहे. हे पत्र उदयाला येण्यापूर्वीच त्याची वाट निश्चित झालेली होती. लोकप्रबोधनासाठीच आपला अवतार आहे, हे उद्दिष्ट सोडून दुसरी कोणतीही वाट आपल्याला मानवणारी नाही हा सन्मतीचा वैचारिक पीळ त्याच्या प्रत्येक अंकातून व प्रत्येक पानातून दिसत आला आहे.......

....महाराष्ट्रातल्या विविध नियतकालिकात आपल्या वेगळेपणानं उठून दिसणारी जी वाङ्मयीन आणि वैचारिकतेला महत्त्व देणारी पत्रं आहेत, त्यात सन्मतीचे स्थान मला वैशिष्ट्यपूर्ण वाटतं.....

**...उन्नतं मानसं यस्य भाग्यं तस्य समुन्नतम् ।**

या ब्रीद वाक्याला अनुसरून सन्मतीने उन्नत आणि उदात्त मूल्यांचा सतत घोष केला आहे. आपल्या विचाराशी त्यानं कधी तडजोड केली नाही, पण त्याबरोबरच आपल्या विचारांनी कोणाला डिवचलं ही नाही. हे काम भल्याभल्या लोकांना साधत नाही. पत्रकाराची लेखणी न्यायनिष्ठूर असावी. असत्य, अन्याय आणि अधर्म यावर आघात करताना त्या लेखणीने निर्भय बनाव. पण सत्याचा विपर्यास करू नये. अधर्मावर प्रहार करताना अधार्मिक होऊ नये. या पत्थ्याचं पालन सन्मतीने केलं. बाहुबली क्षेत्र जेव्हा काही आक्रमकांनी व्यापण्याचा प्रयत्न केला तेव्हा या मासिकानं आक्रमणाच्या विरुद्ध जी भूमिका घेतली ती निःसंदिग्धपणे सत्य आणि न्याय यांना अनुसरण होती. **सन्मतीची प्रकृती शांती, प्रेम आणि अहिंसा यांच्या संमिश्र रसायनातून बनलेली आहे. त्यामुळे जैन संस्कृती आणि साहित्य यांचं सत्त्वसुंदर दर्शन नेहमीच यातून घडत आलेला आहे.** पूज्य समंतभद्र महाराजांच्या पावन व्यक्तित्वाची छाया या पत्रावर दीर्घकाल होती. आजही त्याच छायेखाली हे पत्र आपली वाटचाल करीत आहे.......

..... शेकडो बीज पेरली तरी सारीच अंकुरत नाहीत, पण निदान दहा टक्के बीज अंकुरतात, फुलतात. ही देखील एक क्रांतीच आहे. परिवर्तनासाठी समाजमनात पुन्हा पुन्हा मूल्य विचारांची पेरणी करावी लागते. या विचारावर सन्मतीचा विश्वास आहे आणि त्याची धडपड चालू आहे. हे समाधान कमी महत्त्वाचे नाही. हा श्रद्धेचा नंदादीप प्रकाशाचा संदेश देत तेवत रहावा, हीच उत्कट इच्छा.

✻ प्रसिद्ध समाजशास्त्रज्ञ **डॉ. विलास संगवे** लिहितात की, गुरुकुल शिक्षणप्रणालीचे वैशिष्ट्य सन्मतीने विशद करून सामान्य जनतेमध्ये या शिक्षण पद्धतीबद्दल आस्था निर्माण केली. त्याचप्रमाणे सन्मतीने नेहमी संशोधनपर लेखांना चालना दिली. मान्यवर जैन व जैनेतर लेखक वर्ग मिळविला, उपयुक्त व माहितीप्रद अशा विशेषांकांची प्रथा प्रस्थापित केली आणि त्याद्वारे समाजामध्ये विचार जागृती निर्माण करण्याचे आवश्यक पण अवघड कार्य निष्ठेपूर्वक पार पाडले आहे....

.... सन्मतीने जैनांचा सामाजिक इतिहास लिहून ठेवण्याचे अत्यंत महत्त्वाचे कार्य पार पाडले आहे. याच बरोबर इंग्रजी, हिंदी, गुजराती, कानडी आदी अन्य भाषातील मौलिक जैन साहित्याची मराठी भाषांतरे देऊन आणि प्राचीन जैन मराठी साहित्यावरील लेख प्रसिद्ध करून सन्मती मासिकाने मराठी जैन साहित्य सर्वतोपरी समृद्ध केले आहे...

..... वैचारिक व मौलिक अधिष्ठान असलेल्या सन्मती मासिकाने जैन साहित्य व संस्कृती यांची बहुमोल सेवा निष्ठेपूर्वक करून जैन नियतकालिकांच्या इतिहासात अपूर्व कामगिरी करून दाखविली आहे आणि त्याचबरोबर मराठी

साहित्यात देखील वैशिष्ट्यपूर्ण स्थान मिळविले आहे.

✻ **डॉ. सुभाषचंद्र अक्कोळे,** जलाशयात आकाशाचे प्रतिबिंब या उपशीर्षकाखाली असे लिहितात की, भीसीकर गुरुजींच्याकडे केवळ एक साहित्यिक व संपादक वगैरे निरर्थक होत चाललेल्या उपाधीतून पाहणे व त्यांना ओळखणे हेही बरोबर वाटेनासे होते. त्यातून त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा यथार्थ बोध होणे कठीण आहे. अनेक अंगानी त्यांच्या समृद्ध व्यक्तिमत्त्वाचा विचार करावा लागतो. परमपूज गुरुदेव समंतभद्र महाराजांच्या गुरुकुल शिक्षण संस्थेच्या कार्याला हे जीवन समर्पित झाले आहे. देशातील सर्वश्रेष्ठ आचार्य, विद्वान्, भट्टारक, धर्मपीठांचे अधिकारी, उच्च कोटीचे धार्मिक श्रेष्ठी, साहित्य, शिक्षण, राजकारण यातील धुरंधर व्यक्ती अशा सर्वांच्या संपर्काचा योग या कार्यात आलेला! संपूर्ण आकाश एका जलाशयात प्रतिबिंबित व्हावे तशी एक समग्रता येथे दिसू लागते. सन्मतीच्या अंतरंगात ही तेच दिसते.

✻ मराठीतील जैन कथाकार **श्री. आदिनाथ कुरुंदवाडे** लिहितात की, सन्मतीने कधीही आक्रस्ताळेपणा स्वीकारलेला नाही. सभ्य अभिरुचीला मानवेल आणि पचेल अशीच भाषा त्याने अंगीकारून दुसऱ्याविषयी टीकाटिप्पणी करीत बसण्यापेक्षा त्याच्याशी सौहार्दाचे संबंध प्रस्थापित करणे त्याचे ध्येय आहे. भाषेवरून ही आपली संस्कृती कशी मर्यादाशील आहे, हे ध्यानात यावे.

✻ गुरुकुलस्नातक, स्वातंत्र्य सेनानी **श्री. पी. बी. पाटील, निमशिरगाव** हे असे लिहितात की, ब्रह्मचारी भीसीकर गुरुजी म्हणजे महाराजांच्या अपेक्षांचे चालते-बोलते उदाहरण. त्यांनी आपल्या वाणीने आणि लेखनीने समाजाला मार्गदर्शन केले आहे. श्रावक आपल्या अपत्याचा सांभाळ ज्या जिद्दीने करतो त्यापेक्षा कांकणभर अधिक जिद्दीने गुरुजींनी आपल्या अपत्याच्या संवर्धनाचा प्रयत्न केला आहे. ते त्यांचे अपत्य म्हणजे सन्मती.

जैनांच्या इतिहासापासून संस्कृती, जैन तत्त्वज्ञान यांचे भांडार सन्मतीने सर्व समाजापुढे ठेवले आहे. साहित्यातील सन्मतीचे हे योगदान अमूल्य आहे. त्यामुळे ब्रह्मचारी भीसीकर गुरुजींच्या सारखे एक आगळे व्यक्तिमत्त्व आपल्या समाजाला देण्याचे उपकार परमपूज्य समंतभद्र महाराजांनी केले आहे. तसाच सन्मतीचे योगदान हाही समाजावर अनंत उपकाराचाच भाग आहे.

**✻ बाहुबली क्षेत्रावरील श्रुतसेवा–**

श्री अतिशय क्षेत्र बाहुबली येथे श्री कुंदुकंद सिद्धांत भवन, अनेकांत शोधपीठ या ग्रंथालयात **बाराशेहून अधिक हस्तलिखित व १४७ ताडपत्र ग्रंथ आहेत.** सुमारे एक लाखाहून अधिक पानांची संख्या होते. या सर्व **पांडुलिपींचे संरक्षण व संवर्धन करण्याचे कार्य आचार्य शांतीसागर फाउंडेशन, बेंगलोर यांनी केले आहे. विगत दोन वर्षात या संस्थेकडून एक कोटी पाच लाख याहून अधिक रुपये खर्च करून हा बहुमोल ठेवा जतन केला आहे.** खरोखर त्याबद्दल त्यांचे कोटीशः आभार मानावेत तितके कमीच आहेत. आता हे कार्य कारंजा येथील गुरुकुलात सुरू झाले आहे; म्हणून त्याची माहिती समाजाला व्हावी या हेतूने या अंकात त्याचाही समावेश करण्यात आला आहे.

**जयदु सुददेवदा !!!**



## हार्दिक अभिनंदन !

**कु. खुशी संतोष दोडल, पुणे हिला इ.१०वी बोर्डपरीक्षेत ९७.८०% इतके गुण मिळाले.**

# प्रवचनसार : जीवनस्वातंत्र्याची कला

(लेख क्र. १३६)

आर्यिका १०५श्री शुद्धोऽहंश्री माताजी

ज्याप्रमाणे एखादा रोगी रोग झाला तर डॉक्टरांच्याकडे जाऊन तपासणी करून घेतो, डॉक्टरांचे म्हणणे ऐकून घेतो. डॉक्टर जे औषध सांगतात ते औषध आणून त्याचे सेवन करतो तेव्हा तो रोगमुक्त होतो. जर तो डॉक्टरांचे म्हणणे ऐकूनसुध्दा त्यांनी सांगितल्यानुसार औषधाचे विधिपूर्वक सेवन करणार नाही तर तो कधीही रोगमुक्त होऊ शकणार नाही. त्याप्रमाणे संसार रोगाने ग्रस्त संसारी जीव श्रीगुरुंच्या जवळ जाऊन संसार रोगापासून सुटण्याचा उपाय जाणून घेतो. त्यांनी सांगितलेल्या विधीनुसार उपयाचे सेवन करतो अर्थात आचरण करतो तेव्हा तो संसार रोगापासून मुक्त होतो. जर सद्गुरूंचा उपदेश ऐकून सुध्दा त्यांनी दाखविलेल्या मार्गावरून गमन करणार तर दु:खमुक्त होऊ शकणार नाही.

आचार्य येथे म्हणतात की ज्ञानाशी अविरुध्द अशा चारित्राला धारण करा. आचार्य स्वयं तर आचरण करतातच दुसऱ्यांना पण आचरण करण्यासाठी प्रेरित करतात. –

**एवं पणमिय सिध्दे जिणवरवसहे पुणो पुणो समणे ।**
**पडिवज्जदु सामण्णं जदि इच्छदि दुक्खपरिमोक्ख ।।**

**अन्वयार्थ – (जदि)** जर ह्या आत्म्याला **(दुक्खपरिमोक्खं)** दु:खातून मुक्त होण्याची **(इच्छदि)** इच्छा असेल तर **(एवं)** पूर्वोक्त दोन अधिकारानुसार **(सिद्धे)** सिध्दांना **(जिनवरवसहे)** जिनवरवृषभांना **(समणे)** श्रमणांना (साधूंना) **(पुणो पुणो)** पुन्हापुन्हा **(पणमिय)** नमस्कार करून **(सामण्णं)** मुनिपणाचा **(पडिवज्जदु)** स्वीकार करावा.।।२०१।।

**१) साधकांचे प्रथम लक्षण मुमुक्षुता :–**

मुमुक्षु अर्थात् मुक्त होण्यास इच्छुक

ज्याला दु:खातून मुक्त होण्याची खरी इच्छा आहे. तोच हिताच्या मार्गावर आरूढ होऊन साधक बनू शकतो. आम्ही साधकाचा वेश धारण केला, पण अजून लौकिक यश, ख्याती, पूजा प्रतिष्ठेची आशा आहे तर तो खरा साधक बनू शकत नाही. साधना करण्याचा मूळ उद्देशच आहे की संसार दु:खातून सुटणे. संसार सुख वाढविण्यासाठी साधना करणे म्हणजे रोग वाढविण्यासाठी औषध सेवन करण्यासारखे आहे. दु:खातून सुटण्याची तर सर्वच जीवांना इच्छा असते तर मग सर्वांच्यामध्येच मुमुक्षुपणा प्राप्त होईल. परंतु सर्वांच्या मध्ये मुमुक्षुता प्राप्त होऊ शकत नाही. ज्यांनी संसारालाच दु:खमय जाणले आहे. सांसारिक सुख असो अथवा दु:ख दोन्ही वास्तविक दु:खच आहेत. कारण सांसारिक सुख क्षणभंगुर आहे व पराधीन आहे. त्यामुळे ते दु:खरूप व दु:खाला कारणच आहे, असे ज्यांनी जाणले. ते जीवच संपूर्ण संसार बंधनातून सुटण्याची इच्छा करतात. त्यांच्याठिकाणीच मुमुक्षुपणा प्रगट होतो व तेच खरे साधक होतात. ज्यांना अद्यापि लौकिक सुखाची अभिलाषा आहे, ते मुमुक्षु नाहीत. त्यांना आत्महिताचा मार्ग प्राप्त होऊ शकत नाही.

**२) पंचपरमेष्ठींचे पुन्हापुन्हा स्मरण :–**

आत्महिताचा प्रथम उपाय–

जो ज्या कलेचा उपासक असतो तो त्या कलेमध्ये निष्णात असणाऱ्या पुरूषांच्या गुणांचे स्मरण करतो, त्यांचे चरित्र वाचतो, त्यांनी कोणत्या मार्गाने जाऊन त्या कलेमध्ये सफलता प्राप्त केली हे जाणून घेतो. हा त्याच्या कलासाधनेमधला महत्त्वाचा भाग आहे. जो आत्महिताचा इच्छुक पुरूष आहे त्याचे हे मुख्य कर्तव्य आहे की जे परिपूर्ण आत्महिताला प्राप्त झालेल्या सिध्दांचे, तसेच अरिहंतांचे स्मरण तसेच जे आत्महिताच्या मार्गावर अग्रेसर आहेत असा आचार्य, उपाध्याय व साधूंचे

स्मरण करावे. त्यांचे चरित्र वाचावे व त्यांनी त्या मार्गाचा अवलंब केला, तो मार्ग जाणून घ्यावा. त्यांना केवळ द्रव्य नमस्कार (शरीराने व वचनाने) नमस्कार करून काम होणार नाही तर भावनमस्कार केल्याने आपल्या कार्याची सिध्दी होते. भावनमस्कार म्हणजे त्यांच्या गुणांचे स्मरण करणे. त्यांच्या गुणांचे स्मरण केल्याने त्यांच्यासमान गुण आपल्यामध्ये प्रकट करण्याची शक्ती आपल्यामध्ये आहे. याची जाणीव होते व ते गुण प्राप्त करण्याचा पुरूषार्थ जागृत होतो. त्या कलेमध्ये पारंगत होण्याचा उत्साह वाढतो. एकलव्याला धनुर्विद्येमध्ये पारंगत व्हायचे होते तर त्यांनी द्राणाचार्यांचा पुतळा स्थापन करून त्यांची उपासना केली. त्यांना गुरू मानून त्यांचा दररोज आशीर्वाद घेत असे. जर निशाना साधला तर त्यांचे उपकार मानायची कधी चूक झाली तर येऊन क्षमा मागायचा. अशाप्रकारे तो सतत त्यांना जीवंत मानून भाव नमस्कार करीत होता तर तो एक दिवस धनुर्विद्येमध्ये पारंगत झाला. त्याचप्रमाणे जर आपण अरिहंत, सिध्द व साधूंची भावपूर्वक उपासना केली तर सहजपणे आत्महिताला प्राप्त होऊ यात शंका नाही. अष्टन्हिका पर्वामध्ये सिध्दचक्र विधान करण्याची प्रथा पण आत्महितासाठी सुरू झाली आहे असे वाटते. जेव्हा दररोज वाढत्या क्रमाने त्यांच्या गुणांची आराधना करतो तर अंतरंगामध्ये गुणांचा बहुमान येत जातो. त्यांचा खरा महिमा येतो व अंतरंगामध्ये गुणांचा बहुमान येत जातो. ते गुण आपल्याला प्राप्त व्हावेत अशी भावना निर्माण होते. अशी भावना झाली तर ती खरी सिध्दांची आराधना केली असे समजावे. नाहीतर केवळ रूढी पार पाडली याचे समाधान मानून बसतो.

गाथेमधील जिनवरवृषभ शब्दाचा अर्थ करताना जयसेनाचार्य म्हणतात, सासादन गुणस्थानापासून ते क्षीणकषाय गुणस्थानापर्यंतचे जीव एकदेशजिन आहेत. शेष दोन गुणस्थानवर्ती सामान्य केवली जिनवर म्हटले जातात व त्यामध्ये जे मुख्य आहेत असे तीर्थंकर केवली जिनवरवृषभ म्हटले जातात. येथे जे सम्यक्त्वापासून च्युत झाले अशा सासादन गुणस्थानवर्तींना सुध्दा एकदेशजिन म्हटले आहे. कारण त्यांनी एकवेळा तरी अनादिकालीन मोठा शत्रू मिथ्यात्वावर विजय प्राप्त केला होता, म्हणून ते जिन आहेत. चौथ्या गुणस्थानापासून वरवर जिनत्वगुण वृध्दिंगत होत जातो कारण चौथा गुणस्थानवर्ती दर्शनमोह व अनंतानुबंधी कषायावर विजय मिळवतो. पंचम गुणस्थानवर्ती ७ प्रकृती व अप्रत्याख्यान कषायांवर विजय मिळवितो. मुनिराज पुन्हा प्रत्याख्यान कषायांवरही विजय मिळवितात म्हणून उत्तरोत्तर श्रमणपणा वृध्दिगंत होत होत दहाव्या गुणस्थानापर्यंत मोहसेनेचा परिपूर्ण नायनाट करून ते पूर्ण मोहविजयी होतात. बाराव्या गुणस्थानात शेष तीन घातिकर्मांवर विजय प्राप्त करून हा अर्धचक्रवर्ती होतो. यांच्या शौर्याचे स्मरण केल्याने आपल्यातले वीर्यपण स्फुरायमान होते, हाच श्रमणांना भावनमस्कार करण्याचा उद्देश आहे. जो जितकी गुणवंतांची आराधना करतो तो तितक्या भावविशुद्धीला प्राप्त होऊन गुणांनी अत्यंत समृध्द बनतो.

**दु:खातून मुक्त होण्याचा खरा उपाय :–**

श्रामण्याचा स्वीकार –

या जीवावर संकट आहे. अंतरंग शत्रूमुळे याला त्रास देणारे खरे अंतरंग शत्रू आहेत मोह, राग, द्वेष. बाहेरच्या पदार्थांपासून याला काही संकट नाही. जरी बाह्य पदार्थांचा संयोग सोडल्याशिवाय संकट मिटणार नाही तरी पण संकट मिटवण्याचा मूळ उपाय सम्यग्ज्ञान आहे. परद्रव्य व परभावांपासून स्वत:चे भेदविज्ञान करून निज–आत्म्याशिवाय सुखाचा मार्ग सापडत नाही. ज्यांचा संसारकिनारा जवळ आला आहे, ज्यांची कर्मनिर्जरा होत आहे अशा निकट भव्य जीवाला चारित्राची प्रेरणा करीत आचार्य म्हणतात. –

हे भव्यजीवांनो जर तुम्ही दु:खातून सुटू इच्छित असाल तर या श्रामण्याचा स्वीकार करा. श्रामण्य म्हणजे समता भाव अर्थात मुनिधर्म आहे. तुमचा ज्या कुटुंबावर, धनावर, वैभवावर विश्वास

आहे ते शेवटी साथ देणार नाहीत. त्यांच्यामुळे तुम्हाला शांती मिळणार नाही. शेवटी रिकाम्या हातानेच जावे लागणार म्हणून आताच विचार करा. जरा स्वत:कडे पहा. हा स्वयं ज्ञान व अनंतगुणधारी आहे. शुध्द परिपूर्ण स्वरूप आहे. येथे नवीन काही बनवायचे नाही. मोह, राग, द्वेषांनी या स्वरूपाला झाकले आहे जरा राग द्वेष मोहाचा पडदा हटवा तर अंतरंगामध्ये स्वयं शांतमय परमात्मदेव विराजमान आहे त्याचे दर्शन होईल.

पूर्वकाळी महापुरूषांनी सुध्दा या धनवैभव–राज्याच्या मागे लागून अनेक संकटे सहन केली. रामचंद्र, सीता यांचे चरित्रसुध्दा आपल्याला काय शिकविते ? जोपर्यंत परिग्रह वैभवाच्या सान्निध्यात राहिले तोपर्यंत त्यांनी किती छोटीमोठी संकटे सहन केली. राज्याभिषेक होताच १४ वर्षे वनवास भोगला. वनवास पूर्ण होण्याची वेळ आली तोपर्यंत रावणाने सीतेचे अपहरण केले. सीतेच्या वियोगाने अति व्याकुळ होऊन संक्लेश परिणाम झाले. त्या व्याकुळतेमध्ये पशुपक्ष्यांना सुध्दा विचारतात की तुम्ही माझी सीता पाहिली का ? मोहामुळे क्षायिक सम्यग्दृष्टीची ही दशा तर अज्ञानीचे काय सांगावे ? खूप प्रयत्न करून सीतेचा शोध लागला की सीताजी लंकेमध्ये रावणाच्या बागेत आहे. अनेक विद्याधरांचे साहाय्य घेऊन रावणाशी महाभंयकर युध्द झाले. त्या युध्दामध्ये पुन्हा लक्ष्मणाला रावणाची शक्ती लागली व तो बेशुध्द झाला. ते पुन्हा संकट ओढावले त्यावेळी क्लेश झाले. रावणावर विजय प्राप्त करून सीतेला घेऊन अयोध्येला परतले तर पुन्हा लोकापवादाचे संकट. गर्भवती, प्राणप्रिय सीतेला पुन्हा वनात सोडावे लागले त्यामुळे क्लेश झाला. लव व कुश पुत्रसहित सीतेचा शोध लागला तर तिला निर्दोष सिध्द करण्यासाठी पुन्हा अग्निपरीक्षा देण्याचा निर्णय देताना किती संक्लेश झाले असतील. अग्निपरीक्षा देऊन सीता निर्दोष सिध्द झाली. सीतेला घरी येण्यासाठी प्रार्थना करतात. पण सीता नकार देत विरक्त होऊन आर्यिका होण्यासाठी पुन्हा वनाचा मार्ग धरते. पुन्हा सीतेच्या वियोगाने दु:ख, क्लेश. एवढ्यावर रामचंद्रजींच्या दु:खाचा अन्त झाला नाही तर देवांनी रामलक्ष्मणामध्ये किती प्रेम आहे याची परीक्षा घेण्यासाठी राम मेल्याचे लक्ष्मणला सांगितले 'राम गेला' हे ऐकताच तत्क्षणी लक्ष्मण गतप्राण झाला. लक्ष्मणाच्या इष्ट वियोगामध्ये सहा महिनेपर्यंत त्याचे प्रेत घेऊन रामचंद्रजी फिरले. या दु:खाला कुठे अंत आहे का ?

**संकटातून मुक्तीचा उपाय –**

भगवान रामाचे दु:ख, क्लेश कधी संपले ? जेव्हा परिग्रहाचा, वैभवाचा, परिवारजणांचा मोह सोडून शुध्दा आचरणामध्ये व ब्रह्मस्वरूप आत्म्यामध्ये लीन झाले तेव्हा श्रीरामाचे संकट संपले. क्लेशांचा क्षय करून राम भगवान झाले. याचप्रमाणे कित्येक महापुरूषांनी किती तरी संकटे सहन केली. ती सर्व संकटे परवस्तूच्या सम्बन्धाने प्राप्त झाली. त्यांचा संबंध सोडताच संकटे संपली. म्हणून संकटे मिटतात ती ज्ञान व आनन्दमय, आत्म्याची संगत केल्याने म्हणून म्हटले आहे –

परसे खस, स्वमें बस । तो आयेगा आत्मा का अतिन्द्रिय आनन्द का रस.. इतना करे तो बस....

गृहस्थावस्था एक समस्या सोडवत नाही की दुसरी समस्या तयार असते. या विकल्पांच्या मालिकेमध्ये निर्विकल्प ध्यान कसे होऊ शकणार म्हणून त्यांना सोडण्याचे भाव करीत नाही. कारण ज्याला सुखाचे कारण मानतो त्याला सोडण्याचे भावच कसे होतील ? परामधील सुखबुध्दी सुटली तर पर द्रव्ये आपोआप सुटतील. गृहस्थावस्था म्हणजे विकल्पांचे उत्पत्तिस्थान आहे. जन्मापासून मरेपर्यंत विकल्पांची मालिकाच सुरू असते. बालपण अज्ञानात निघून जाते. नंतर शिक्षणाची विवंचना, शिक्षण पूर्ण झाले की उपजिविकेसाठी धन मिळविण्याची विवंचना. तो प्रश्न सुटला की लग्नाची चिंता, लग्न झाले की पुत्रोत्पत्तिची चिंता, पुन्हा त्यांचे पालनपोषण, शिक्षण, विवाह पुन्हा नातू–पणतू इत्यादी विकल्पांचा शेवट कधी होत नाही. पण या जीवाचा मात्र त्या भवाचा शेवट होतो.

एकदा एक वाटसरू साधुपुरूष एका

विहीरीजवळ पोहचला. चालण्याच्या श्रमाने थकल्यामुळे तेथेच विश्राम करण्याचा त्याने विचार केला. विहीरीतील पाणी काढून हात पाय धुतले, बांधून आणलेली शिदोरी खाल्ली आणि पाणी पिऊन तेथेच विहीरजवळच्या कट्ट्यावर झोपला. थकला तर होताच त्यामुळे लगेच त्याला गाढ झोप लागली. त्याला स्वप्न पडले की त्याचे विवाह झाला आहे व त्याला एक मुलगा पण झाला आहे. पत्नी झोपण्यासाठी येते. जागा लहान पडते म्हणून त्याला म्हणते. 'थोडे तिकडे सरक, मुलाला पण झोपवायचे आहे.' तो वाटसरू स्वप्नामध्ये पलंगावर थोडा सरकला, परंतु तो वाटसरू विहीरीत पडला. सकाळपर्यंत तसाच विहीरीच्या बाजूला कट्ट्याला धरून बसला. सकाळ झाल्यावर दुसरी एक व्यक्ती तेथे आली. वाटसरू जोराने ओरडू लागला. त्याचे ओरडणे ऐकून त्याला दोरीच्या साहाय्याने विहीरीतून वर काढले. वाटसरू आपल्याला मदत करणाऱ्याच्या प्रती कृतज्ञता प्रकट करीत त्याला विचारतो, 'बंधु, तुम्ही कोण आहात ?' तो म्हणतो, 'मी या गावाचा रहिवासी एक गृहस्थ आहे.' यावर तो वाटसरू म्हणतो, 'मी स्वप्नामध्ये गृहस्थ झालो तर माझे हे हाल झाले तुम्ही खरोखर गृहस्थ होऊन सुध्दा कसे काय जिवंत आहात ?'

गृहस्थ अवस्थेत एक समस्या सोडवत नाही की दुसरी समस्या तयार असते असंयत सम्यग्दृष्टी गृहस्थ अवस्थेमध्ये असतात स्वत:ची निंदा-गर्हा करतो. **'हा धिक् गार्हस्थ्यम्'** या गृहस्थ अवस्थेचा धिक्कार असो. मला सर्व समजत असूनसुध्दा मी यात का अडकलो आहे. सतत निर्ग्रन्थ पणाची भावना करतो. म्हणून आचार्य याठिकाणी प्रेरणा करतात, जर तुला दु:खातून सुटायचे असेल तर तू श्रामण्याचा अंगीकार कर.

**( क्रमश: )**

## बाहुबली येथे धर्मसंस्कार शिबिर संपन्न...

श्री अतिशय क्षेत्र बाहुबली येथे ब्र. माणिकचंदजी भीसीकर (गुरुजी) यांच्या संस्मरणार्थ दि. २ मे ते १० मे २०२५ या दरम्यान धार्मिक बाल संस्कार व प्रौढ शिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले. २ मे रोजी प्राचार्य डॉ. श्री. शांतीकुमारजी पाटील यांच्या शुभहस्ते ध्वजारोहण करून या शिबिराचे उद्घाटन करण्यात आले. श्री. तात्यासाहेब अथणे यांच्या अध्यक्षतेखाली या शिबिराचे उद्घाटन झाले. यावेळी स्वागत व प्रस्ताविक डॉ. नेमिनाथ बाळीकाई यांनी केले. शांतीकुमारजी पाटील यांनी या धर्म संस्कार शिबिराच्या आयोजनामागील मुख्य हेतू व आजच्या बदलत्या पीडीला त्याची नितांत आवश्यकता कशाप्रकारे आहे? हे त्यांनी आपल्या मनोगतून व्यक्त केले. त्यावेळी संस्थेचे संचालक गोमटेश बेडगे सर तसेच एम. जी. शहा विद्यामंदिरचे सर्व पदाधिकारी उपस्थित होते. संपूर्ण दहा दिवसांमध्ये बाल वर्गातील विद्यार्थ्यांनी भद्र-आनंद व छहढाला तसेच प्रौढ वर्गातील शिबिरार्थींना मोक्षमार्ग प्रकाशक, इष्टोपदेश व तत्त्वार्थसूत्र या ग्रंथांचे मार्गदर्शन करण्यात आले. यामध्ये पं. जिनचंद अलमान, पं. शीतल शेट्टी, डॉ. स्वयंप्रभा पाटील, पं. बाबगोंडा पाटील, डॉ. विजयसेन पाटील, पं. संतोष मिणचे, पं. सूरज पाटील, पं. धीरज पाटील, पं. प्रदीप धोतरे, पं. अक्षय चव्हाण, पं. हर्षवर्धन पाटील, पं. सोहम बाळीकाई, पं. अरिहंत किणीकर, पं. प्रवीण पाटील यांचे मार्गदर्शन लाभले. यामध्ये एकूण जवळपास २०० विद्यार्थ्यांनी या धार्मिक संस्कार शिबिरामध्ये सहभाग नोंदवला होता.

दि. १० मे रोजी या संस्कार शिबिराचे समापन श्री. गोमटेश बेडगे सर यांच्या अध्यक्षीय उपस्थितीमध्ये करण्यात आले होते. त्यावेळी त्यांनी समाजातील विद्यार्थ्यांना लौकिक शिक्षणाबरोबर आध्यात्मिक व नैतिक शिक्षण देण्याची ही काळाची गरज आहे असे सांगितले. स्वागत व प्रास्ताविक संतोष मिणचे यांनी केले. सर्व मार्गदर्शन करणाऱ्या

( पुढे पा. नं. ३१ वर)

# योगसार चिंतन

(लेखांक ६)

प्रियदर्शन जैन, नागपूर

**इच्छारहिउ तप करहि, अप्पा अप्प मुणेहिं ।**
**तउ लहु पावइ परमगइ, पुण संसार ण एहिं ।।१३।।**

**परिणामे बंधुजि कहिउ, मोक्ख वि तह जि वियाणि।**
**इउ जाणेविणु जीव तुहुँ, तहु भावहु परियाणि।।१४।।**

येथे आचार्य देव सांगतात की–हे जीवा! तू जर इच्छारहित होऊन तप केले व आपल्या आत्म्याचा अनुभव केला तर तू शीघ्र मोक्षाची प्राप्ती करशील. ।।१३।।

आपले परिणाम हेच बंध व मोक्षाला कारण आहेत, हे परम सत्य जाणून त्यावर श्रद्धा कर. संसारातून पार होण्याचा हाच एकमेव मार्ग आहे.।।१४।।

आत्मस्वरूप जाणल्याशिवाय तप कसे होणार? ज्ञानाच्या द्वारेच अज्ञानाचा नाश होतो, म्हणूनच जो सर्वप्रथम आत्मज्ञान करून त्याचे स्वरूपावर विश्वास (श्रद्धा-ज्ञान) करील आणि पश्चात आपल्या स्वरूपात स्थिर होईल तरच, होणारे तप हे खरे तप होईल.

येथे आचार्यदेव सांगू इच्छित आहेत.- स्वरूप दृष्टीने विचार केला तर आत्मा इच्छेने रहित आहे. तो तर ज्ञान, आनंद आणि अनंत गुणांचा घन पिंड आहे. त्याला प्राप्त करायचे असेल तर सर्व प्रथम त्याचे विशुद्ध स्वरूप समजावून घे.. मग इच्छेने रहित अशा आपल्या आत्मतत्त्वाचे ज्ञान करून त्याचीच श्रद्धा कर आणि त्यातच लीन हो..या द्वारेच संवर, निर्जरा आणि मोक्ष प्रगट होणार..अन्य दुसरा कोणताच मार्ग नाही !

किती सूक्ष्म विवेचन केले आहे आचार्यदेवांनी येथे!! इच्छांनी रहित होणे हे कथन नास्ति रूपाने केले आहे. द्रव्यदृष्टीने आत्मा इच्छेने रहितच आहे आणि अस्तिने आपल्या ज्ञायकरूपी आत्म्याचे भान होणे..त्यातच रममाण होणे..हाच इच्छांनी रहित होण्याचा खरा मार्ग आहे, असे ते सांगत आहेत.

पुण्य, पाप आणि धर्म या तीन वेगवेगळ्या संकल्पना आहेत. अशुभ भावांनी पापबंध, शुभ भावांनी पुण्य बंध आणि शुभ-अशुभ या दोन्ही भावांच्या पलीकडे जाऊन सर्व दोषांनी रहित अशा आपल्या आत्मदेवाचे ज्ञान, श्रद्धान आणि त्यात लीन होणे हा धर्म होय. आणि या धर्माचा अंगीकार करणे हेच वास्तविक तप होय. पुण्य-पाप मीमांसा समजली की शुभ आणि अशुभ दोन्ही आस्रवाच्या खात्यात जातात असे आचार्य कुंदकुंददेव का बरे सांगतात, याचा आपल्याला उलगडा होतो.

श्रावक अवस्थेत भूमिकेनुसार सर्व क्रिया होतातच. 'अशुभापासून दूर होण्याकरिता शुभात शिरावेच लागेल आणि शुद्ध तत्त्व प्राप्त करण्याकरिता शुभाचा सुद्धा त्याग करावाच लागेल..' या आगम वचनाचा अर्थ नीट समजून घ्यावा लागेल आणि या करिता सम्यक् स्वाध्याय हाच एकमेव प्रशस्त मार्ग आहे. यामुळेच आपल्याला खऱ्या धर्माचे स्वरूप समजते.

आचार्य देव सांगू इच्छितात- 'सर्वात प्रथम मी कोण आहे, माझं स्वरूप काय आहे, याचा शोध घ्या. वस्तुस्वातंत्र्याचा सिद्धांत समजून घ्या नि आपला उपयोग आत्मसन्मुख करण्याचा प्रयत्न करा...'

आपल्या आत्मदेवाच्या स्वरूपाचे ज्ञान होणे हाच अज्ञानाला दूर करण्याचा खरा मार्ग आहे.. यासाठी भेदविज्ञानाच्या अभ्यासाद्वारे व्यक्ती हळू-

हळू धर्माच्या जवळ येते आणि त्याची शुभाप्रति असलेली मूर्च्छा सुद्धा कमी कमी होऊ लागते. ज्ञानी जीव आपापल्या भूमिकेनुसार कर्म करतानाही दृष्टी शुद्ध तत्त्वावर ठेवतात.. त्यामुळे त्यांची पर-पदार्थांविषयीची आसक्ती आपोआपच कमी होते, कारण ते आत्मानुभवी असतात. म्हणूनच आगम सांगते, 'आत्मबोधाशिवाय केलेले कोणतेही कर्म धर्म या संज्ञेस पात्र होत नाही. मग ते तप का असेना..'

आत्मदेवास जाणल्यानंतरच तप हे 'तप' या संज्ञेस पात्र होते अथवा खरे तप तर आपल्या आत्मदेवास जाणणे हेच आहे.. या दोन्ही एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. आपल्या स्वभावाची रुची जागृत करणे याला सुद्धा तप म्हटले तर काहीच वावगे ठरणार नाही. याकरिता ज्ञायकतेचा अभ्यास आवश्यक आहे, म्हणूनच इच्छा आणि कांक्षा यांनी रहित अशा आपल्या आत्मदेवास जाणणे, हेच तप आहे, हे आचार्यदेव येथे सांगत आहेत.

भगवंतानी परिणामांनीच बंध-मोक्ष सांगितले आहेत. जसे आपले अशुद्ध परिणाम (मिथ्यात्व, शुभाशुभभाव, अव्रत, प्रमाद, काषायिक भाव) बंधाला कारण आहेत व शुद्ध भाव (शुद्ध आत्मस्वरूपाचे सन्मुखतेचे परिणाम) मोक्षाचे कारण आहेत. संसाराच्या नाशाचा हाच एकमेव मार्ग आहे, अन्य कोणताच मार्ग नाही.

परसन्मुखतेचे परिणाम हेच बंधास कारण तर स्वसन्मुखतेचे परिणाम हे मुक्तीस कारण असतात, हेच आचार्यदेव येथे सांगत आहेत... मी केले, माझ्यामुळे झाले, मी नसतो तर काय माहित काय झाले असते? या प्रकारचे कर्तृत्व मूलक भाव मिथ्यात्वाचे पोषण करणारे भाव आहेत. आपल्या शुद्ध स्वभावास विसरून शुभ-अशुभात सुख मानणे ही विपरीत मान्यताच संसारास कारण आहे. याचे उलट आपल्या शुद्ध स्वभावास जाणणे आणि त्यातच रममाण होण्याचा पुरुषार्थ करणे हेच मोक्षाचे कारण आहे.. आपल्या परिणामांना शुद्ध करण्याकरिता आपल्या स्वभावाची रुची जागृत करणे हीच एकमेव औषधी आहे.

परवस्तुमध्ये आनंद, ज्ञान मिळणे, ही गोष्ट तीन काळातही शक्य नाही, त्या मध्ये काही फेर बदल करण्याचे परिणामच (भावच) बंधास कारणीभूत असतात, हे आगम वचन विसरून आपण आपले खरे स्वरूपही विसरलो नि परद्रव्यात रमलो. त्यांनाच आपले सर्वस्व समजून आपल्या स्वरूपाचा अनादर केला आणि म्हणूनच १४८ कर्मप्रकृतींच्या कैदेत अडकलो आहोत.

व्यवहाराने खरे देव-शास्त्र-गुरु यांना यथार्थतेने जाणणे आणि परमार्थाने ज्ञान-आनंदमयी आपल्या निजध्रुवाची पक्की श्रद्धा करणे आणि त्यातच रममाण होण्याचे परिणामच मोक्षास कारणीभूत आहेत. आपले देव काही देत-घेत नाहीत. आपल्याच परिणामांचे फळ आपल्यास भोगावे लागते. आपला आत्मा सर्व परद्रव्यांपासून भिन्न आहे. याचे पक्के श्रद्धान ज्याला झाले, तो आपल्या स्वभावात वापस येतो नि आपल्या ध्रुव स्वभावाच्या आश्रयाने सुखी होतो.... आणि हे श्रावक अवस्थेतही सहज साध्य आहे....!

कर्तृत्व बुद्धीचे पोषण न करता आपले परिणाम सतत आत्मसन्मुख असावेत, हेच आचार्यदेव येथे सुचवीत आहेत.

**( क्रमशः )**

---



Happy to share with you that my grand son **Gaurav Arwade** obtained doctorate in AI - enabled precision health care of Iowa State University. He also got job in leading IT firm K. L. A. incorporation, California,USA

- Sanatkumar Arwade

# पट्टमहादेवी–शब्दांपलिकडील अन्वयार्थ
## लेखांक (२२)

**–विपुल खेडकर,** नागपूर मोबा.८८८८८५४४३४

आजही जे चेन्नकेशव मंदिर होयसळांची कीर्ती गात उभे आहे, त्या मंदिराचा निर्माणकर्ता कोण ठरतो, मंदिर निर्माण कार्यात शांतलादेवींकडून वेगवेगळ्या कल्पना कशा प्रकारे प्रत्यक्षात आणल्या जातात....या भागात वाचू या......!

**तडजोड अथवा......?**

पूर्वनिश्चित मुहूर्तावर समस्त राजगौरवां-सहित पंचमहावाद्यांचा घोष निनादू लागला.... होयसळांच्या विजय यात्रेला प्रारंभ झाला! सगळा युवा वर्ग उत्साहात विजययात्रेत निघून गेला... मोजकेच वीर सैनिक, युवक–युवती, वृद्ध, महिला आणि बालक वर्ग राजधानीत मागे राहिल्याने वेगळीच शांतता सर्वत्र जाणवत होती. युद्ध सुरू होण्यापूर्वीच गुप्तहेर मायण आणि चट्टला हे पती–पत्नी आपल्या तीन महिन्यांच्या बाळाला पट्टमहादेवींच्या ओटीत घालून राजकार्यासाठी रवाना झाले होते. यावेळी देखील प्रत्यक्ष युद्धात उतरण्याची संधी मिळाली नाही, म्हणून बिट्टिगा नाराज होता .

नवीन शिल्पकाराला दोन दिवस दोन महिन्यांसारखे भासले. रविवारची सकाळ झाली. पूर्व नियोजित शिल्पकारांच्या सभेकरिता सर्व शिल्पकारांची गर्दी होऊ लागली. नवीन शिल्पकार यायावर आणि मुख्य शिल्पकार हरीश दोघे दोन दिशांनी पण एकाच वेळी राजमहालाच्या महाद्वारात प्रवेशले! पूर्व परिचय नसल्याने दोघेही एकमेकांशी बोलले नाहीत, पण एकमेकांच्या अस्तित्वाची दखल मात्र दोघांनीही घेतली होती. मुख्य स्थपती हरीशने पुढे होऊन चौकशी केली, 'आपण कोण आहात ? शिल्पकार ? कोठून आलात ? आपले नाव– गाव? या आधी कधी बघितल्याचे स्मरत नाही.....'

परंतु नवीन शिल्पकार पट्टमहादेवींसमोर आपली ओळख न देता कामाला लागला होता, तर इथे काय दाद देणार होता? नेहमी सारखेच अधिक बोलणे टाळून, आपण केवळ शिल्पकार असून मिळाल्यास कोणतेही शिल्पकाम करण्यास तयार आहोत, न मिळाल्यास दुःख नाही–एवढे बोलून मागे रेंगाळला, तर हरीशजी मात्र सभास्थानी पोहोचून आपल्या राखीव आसनावर विराजमान झाले. लगेच सभेला सुरुवात करण्याची आज्ञा पट्टमहादेवींनी बिट्टिगाला दिली. एक मोठी प्रस्तावना देऊन नवीन चित्रकाराने काढलेले मंदिर आरेखन सभेसमोर ठेवले गेले. सर्व शिल्पकारांना ते न्याहाळण्याकरिता दोन तासांचा अवधी देण्यात आला. त्यानंतर दुपारच्या जेवणानंतर परत सभेला सुरुवात करू, असे सांगून पट्टमहादेवींनी सभास्थानाहून प्रस्थान केले.

चकित होण्याची पाळी शिल्पकारांची होती... आपण काहीतरी अद्भुत बघतो आहोत....हे जर प्रत्यक्षात अवतरले तर 'न भूतो न भविष्यति' असे शिल्प अस्तित्वात येईल. प्रत्येक शिल्पकाराला यात स्वतःच्या कलेला उजागर करता येईल.....अशा प्रतिक्रिया येऊ लागल्या. राजकीय प्रतिनिधी त्या प्रतिक्रिया टिपून घेत होते.

मधल्या वेळात नवीन शिल्पकारासोबत पट्टमहादेवींनी कला, कलाकृती, निर्माण करण्याचे तंत्र याविषयी दीर्घ संवाद साधला.

दुपारच्या सत्रात सभेला प्रारंभ झाला. यावेळी प्रथमत: पट्टमहादेवींनी सभेला संबोधित करून प्रत्येक तरुण शिल्पकाराला आपल्या नव्या रेखाटनाबद्दलचे मत मांडण्यास सांगितले. हळूहळू

अनुभवी शिल्पकारांची पाळी आली. एकंदरीतच सर्व शिल्पकार नव्या कलाकृतीने भारावलेले दिसत होते! आता मुख्य स्थपती हरीशजींना विचारले गेले. त्यांनी देखील रेखाटनाबद्दल चांगले मत व्यक्त केले. परंतु लगेचच स्पष्टपणे सांगितले की, ही नवी कलाकृती अन्य कोणत्याही स्थळी उभी करावी, कारण या ठिकाणी आता मुहूर्तमेढ झालेली आहे.

राजमहालाचे जुने शिल्पकार गंगाचार्य बोलते झाले. 'रेखाटन सुंदर आहे, तर ते मूर्त रूपात राजधानीतच शोभा देते......'

'आता कसे शक्य आहे? अगोदर जी रूपरेखा स्वीकृत झाली होती, त्यानुसार शंकू स्थापित करून पाया रचला गेला आहे! परत शंकू स्थापना करणार का?'– इति शिल्पकार हरीश !

'शंकू न हलविता, आजपर्यंत जो पाया तयार आहे तो तसाच ठेवून, या रेखाचित्रानुसार मंदिर निर्माण होऊ शकेल, याप्रमाणेच हे रेखाटन आहे.'– पट्टमहादेवींनी शांतपणे सांगितले .

'म्हणजे राजमहालाकडून मंदिर निर्माणाचे कार्य अन्य कोणत्या शिल्पकाराकडे सोपविले गेले आहे तर.... आपल्या इच्छेचा आम्ही विरोध कसा करू शकणार ?....' थोड्या असंतोषाच्या सुरात शिल्पकार हरीश बोलू लागले .

'व्यर्थ शंका उत्पन्न करून व्यक्त होऊ नये!' अशी समज पट्टमहादेवींनी दिली आणि नव्या शिल्पकाराला बोलावून आणण्यास सांगितले. हरीशजींच्या चेहऱ्यावरील भाव पट्टमहादेवींनी टिपले होते. नवीन शिल्पकार येताच त्याचा सर्वांसोबत फक्त शिल्पकार हाच परिचय करून दिला गेला.

मुख्य शिल्पकार हरीश थोड्या हेटाळणीच्या स्वरात म्हणाले, 'नवीन रेखाचित्र काढणारे आपण आहात तर.... ज्याच्या जवळ नाव, गाव, वंश, कुळाचा ठिकाणा नाही........'

'मी अशी कलाकृती रेखाटित करू शकतो, यावर आपला विश्वास नाही का?' थोड्या खेदपूर्वक आवाजात शिल्पकाराने विचारले.

'आता आपला काय विचार आहे, हरीशजी ?' पट्टमहादेवींनी विचारले.

'मी माझ्या विचारांवर ठाम आहे. ही कलाकृती अन्यत्र कोठेही निर्माण करावी... मी पूर्ण सहयोग देईन... येथे निर्माण होत असेल, तर मात्र मी या कार्यातून बाहेर पडेन...!' इति मुख्य शिल्पकार !

'रेखाटन माझे असले तरी, मी आपल्या निर्देशानुसार काम करण्यास तयार आहे. मला मुख्य शिल्पकाराचे पद मिळविण्याची अभिलाषा नाही.'– नवीन शिल्पकार विनम्रतेने थोड्या दुःखी स्वरात बोलला....

'दुसऱ्यांच्या कृतीला स्वतःचे नाव लावणे, त्यावर प्रमुख पदी राहून काम करणे माझ्या तत्त्वात बसत नाही! तेव्हा राजमहालाने योग्य तो निर्णय घेऊन मला या जबाबदारीतून मुक्त करावे ही विनंती...!' पुन्हा हरीशजींनी आपलाच सूर आळविला .

'देश, समाजाचे काम करतांना हट्टीपणा नसावा! व्यक्तीपेक्षा कार्य महत्त्वाचे असावे... तरीसुद्धा आपली इच्छा ! आपल्या मनात कोणतीही कटुता नसावी, अशी आमची भावना आहे. यापुढील कार्य नवीन शिल्पकारांच्या कल्पनेनुसार पार पडेल. शिल्पकार हरीश, आपण उद्या सकाळी आम्हास भेटावयास या!' असे बोलून शांतलादेवी निघाल्या आणि सभा विसर्जित झाली.

**नवप्रभात–नवसंधी**

नाव–गाव–कुल–गोत्र न सांगणाऱ्या नव्या शिल्पकाराच्या नेतृत्वात कामाने गती घेतली. पाया खणून होईपर्यंत सगळ्या शिल्पकारांना एकत्र करून कोणते काम कोणी करायचे, कोणते काम करण्यास कोण उत्सुक आहेत, हे जाणून घेऊन त्यानुसार कामांची निश्चिती करण्यात आली, कामाचा कालावधी निश्चित करण्यात आला. प्रत्येक शिल्पकाराला आपल्या कला–कौशल्याचा जागर करण्यासाठी वेळ दिला गेला आणि संधी सुद्धा दिली गेली. प्रत्येक शिल्पकाराला काम मिळेल आणि त्यानंतर कामाचं पूर्ण मूल्यमापन होईल, अशा पद्धतीने कामाची विभागणी झाली. नक्षत्राकार

वास्तुशिल्पाची कुशल कारागिरी वेगाने गतिमान होत होती, त्यामुळे पट्टमहादेवींना देखील नवीन स्फूर्ती आली.... दिवसाचा अधिकाधिक वेळ मंदिर निर्माणाच्या स्थानी व्यतीत होऊ लागला. जसे जसे दिवस पुढे सरकू लागले, प्रमुख शिल्पकारासोबत रोजच्या भेटीगाठींमुळे त्यांच्या संकोचाच्या भिंती दूर होऊ लागल्या. शिल्पकाराच्या कलेची उंची, कलेबद्दलची समर्पण वृत्ती, मनाचा सच्चेपणा पट्टमहादेवींच्या लक्षात येऊ लागला. तसेच पट्टमहाराणींचे विशाल व्यक्तित्व, दयापूर्ण प्रवृत्ती, कलेची समज, पारखी नजर आणि जनतेमध्ये त्यांच्या प्रति असणारा आदर शिल्पकाराला ज्ञात होऊ लागला ! कोणापुढेच व्यक्त न होणारा शिल्पकार पट्टमहादेवींच्या वात्सल्याने अतिशय प्रभावित झाला. सततच्या सहवासाने दण्डनायक बिट्टीगाची जन्मकथा, महादेवींचे त्यांना थोरल्या पुत्राप्रमाणे सांभाळणे, भ्रष्ट चारित्र्याच्या चट्टलाला पुन्हा पतिप्रेम प्राप्त करून देणे, थोरले महाराज आणि त्यांच्या तीन राण्यांचा त्यांच्या जीवनातील प्रभाव इत्यादी सर्व गोष्टींत असणारी पट्टमहादेवींची भूमिका समजू लागली. तरी देखील शिल्पकाराला त्याच्या वैयक्तिक गोष्टींबद्दल कोणीही विचारणा केली नाही. या सर्व घटनांचा त्याच्यावर आपोआपच परिणाम होऊ लागला.... त्याच्या मनातल्या गाठी सैल व्हायला सुरुवात झाली!

**प्रयत्ने विजयपताका फडकविती!**

तळकाडूमधे युद्धाने चांगलाच रंग धरला होता. महाराज युद्धात गुंतले असले तरी, रोज तिकडील समाचाराचा सांगावा दूतामार्फत प्राप्त होत होता. भाषा आणि प्रदेश नवीन असल्याने युक्तीने काम घ्यावे लागत होते. अर्धे युद्ध गुप्तचरांच्या मदतीनेच जिंकले जाते, याचे प्रत्यंतर येथे देखील आले. सेनानायक दामोदर याला आपल्या आकर्षणात गुंतवून, त्याचेच कपडे आणि वेष परिधान करून होयसळांची गुप्तहेर चट्टला मोठ्या शिताफीने निसटून आपल्या युद्धशिबिरात परतली. दोन-तीन दिवसांतच संपूर्ण तळकाडूमधे युद्ध नायकांना होयसळांनी बंदी बनविल्याची बातमी आणि पाठोपाठ होयसळ सैन्याचे आगमन होऊन अवघ्या तीन दिवसांतच गंगवाडीचा प्रदेश होयसळांच्या ताब्यात आला. चार महिन्यांपासून सुरू असलेल्या युद्धाने पलटी मारली...

तळकाडूच्या अर्ध्या भागावर होयसळांची विजयपताका फडकू लागली. राज्यव्यवस्था, नव्या नियुक्त्या, राज्यकार्य विश्वासू व्यक्तींच्या सुपूर्द करून महाराज बिट्टीदेव आणि राणी बम्मलदेवी यादवपुरीकडे निघाले.

**सर्वोत्तमाचा ध्यास**

इकडे वेलापुरीमधे मंदिर निर्माण कार्य वेगात सुरू होते. पौराणिक कथा निरूपित करणारी शिल्पे भिंतींमधे स्थान घेऊ लागली. मधून मधून राष्ट्र आराध्य देवी-देवतांच्या मूर्त्यांनी जागा व्यापली. मंदिराच्या छताचे काम देखील पूर्णत्वाकडे वळू लागले, एके दिवशी पट्टमहादेवी शांतलादेवी, दण्डनायक बिट्टिगा आणि मुख्य शिल्पकार मंदिराचे निरीक्षण करीत असतांना महाद्वाराजवळ उभे होते. शिल्पकार आपल्या मनातील कल्पना सांगू लागला,'या महाद्वाराच्या छतावर होयसळ राजसभेचे शिल्पचित्र निर्माण करण्याची इच्छा आहे...'

'सन्निधान परत आल्यावर त्यांच्या संमतीनेच करणे योग्य होईल....' पट्टमहादेवी म्हणाल्या.

'जशी आज्ञा !' शिल्पकार उद्गारला.

'मंदिराच्या शिल्पचित्राचा तुम्ही बारकाईने अभ्यास केलाच आहे. आता हे जे मंदिर उभे झाले आहे, ते रेखाचित्रानुसार आहे ना?' पट्टमहादेवींनी दण्डनायक बिट्टिगाला प्रश्न केला .

'रेखाचित्रावरून उंचीची कल्पना आली नव्हती. परंतु या उंचीमुळे मंदिराची भव्यता बघून डोळ्यांचे पारणे फिटते...! मात्र वर चढता चढता काहीसा सपाटपणा जाणवतो...'

'अगदी बरोबर! याचसाठी काही आकर्षक शिल्पे

बनवून येथे लावावीत,असे वाटत आहे. त्यानुसार काही रेखाचित्रेही तयार केली आहेत.' शिल्पकाराने सांगितले.

'आजपर्यंत बोललात नाहीत? चित्रे बघायला मिळतील ?' –शांतलादेवी

'नक्कीच !'

'किती चित्रे आहेत ?'

'चोवीस!'

'कुठे सजविण्याचा विचार आहे ?'

'अजून निश्चित केले नाही.. मूळ रेखाचित्रात नव्हते हे....ही कल्पना आता सुचली... आपणास दाखविण्याचा आणि विचार विमर्श करण्याचा मानस होताच....आपल्याला याकरिता योग्य स्थान सुचत असेल तर सुचवावे.'

'अर्धवतुर्ळाकार खिडक्यांच्या बाजूला असणाऱ्या स्तंभांवर या रेखाचित्रानुसार शिल्पांची स्थापना करावी, असे वाटते. त्यामुळे मंदिराच्या सुंदरतेत भर पडेल...!' पट्टमहादेवींनी सूचना केली .

'सुंदर कल्पना ! आतापर्यंत आमच्या मनात आलेच नाही. खरेच त्या स्तंभांना वेगळेच सौंदर्य प्राप्त होईल ! परंतु त्यासाठी छत्तीस शिल्पे लागतील !'

इतक्यात ती रेखाचित्रे आली.

ती बघत असतांनाच पट्टमहादेवी स्वतःशीच उद्गारल्या, 'विविध नाट्य भंगिमांचे उत्कीर्णन देखील सुंदर भासेल...'

'मी असे ऐकले आहे की, आमच्या दण्डनायकांनी स्त्री वेषात नाट्य प्रस्तुत करून पट्टमहादेवींना देखील चकित केले होते... आतादेखील दण्डनायकांनी तशीच वेशभूषा धारण करून नाट्यमुद्रा आम्हास दाखविल्या तर आम्ही त्याची रेखाचित्रे तयार करून शिल्प तयार करू !'– शिल्पकाराने आपल्या मनातील गोष्ट ओठावर आणली.

'आणि माझ्या या मिशांचे काय? माझ्यापेक्षा चांगल्या नाट्यमुद्रा तर माझ्या गुरु पट्टमहादेवी देऊ शकतात !' दण्डनायक बिट्टीगा म्हणाले.

'बिट्टी !' मोठे डोळे करून रागावत पट्टमहादेवी बोलल्या.

'सर्व शिल्पकारांना आपण बोलवा, याबाबतीत आपण सर्वांशी बोलू .'

तो विषय तेथेच संपवून पट्टमहादेवी राजमहालात परतल्या. परंतु तो विषय त्यांच्या डोक्यातून जात नव्हता, कारण अशा मूर्त्यांनी मंदिराच्या सौंदर्यात विशेष भर पडली असती.

दुसऱ्या दिवशी शिल्पकारांच्या बैठकीत पट्टमहादेवींनी सर्व शिल्पकारांना आवाहन करीत नवनवीन मूर्तींसाठी नव्या कल्पनांवर आधारित रेखाचित्रे काढायला सांगितली. त्यावेळी एका नव्या तरुण शिल्पकाराने थोडे घाबरतच आपले एक रेखाचित्र प्रस्तुत केले. अतिशय सुंदर असे ते रेखाचित्र होते!

'ही कल्पना आपणास कशी वाटते ?' धीर करून त्याने विचारले

'ज्ञानाधिदेवता सरस्वती प्रतीत होते...' मुख्य शिल्पकाराने आपले मत मांडले.

'चतुर्भुज आहे म्हणून सरस्वती ?' पट्टमहादेवींनी विचारले.

'सगळ्याच देवतांना चतुर्भुज दाखवितात. ऊर्ध्व बाहूंमधे नृत्य विन्यास, उभे राहण्याच्या पद्धतीतून नाट्यमुद्रा, उरलेल्या दोन हातांपैकी उजव्या हातात मण्यांची जपमाळ आणि डाव्या हातात ताडपत्र ! हे सर्व ज्ञानाचे संकेत आहेत, म्हणून या मूर्तीला नाट्यसरस्वती म्हणू शकतो !... पट्टमहादेवींना काय वाटते ?'

'ही नाट्य–नाद सरस्वती असली तर.....?' पट्टमहादेवी म्हणाल्या, 'हे रेखाचित्र अतिशय भावपूर्ण आणि सांकेतिक आहे... म्हणूनच ते नाद प्रतीक बनावे असे आम्हाला वाटते.'

' पण दगडात नाद कसा उत्पन्न करायचा, हे आम्हास माहित नाही. आपण मार्गदर्शन कराल तर मी निश्चित प्रयत्न करेन !' तरुण शिल्पकार उत्साहाने बोलला.

' नादाची उत्पत्ती कशी होते ?'

' स्पंदनाने.....!'

' मूर्ती तयार करण्यासाठी स्पंदित होणारा दगड उपयोगात आणा !'

' दगड स्पंदित होतो ?'
' जेथे गती, लय असते तेथे स्पंदन व्हायलाच हवे ! दगडावर दगड आपटला तर काय होईल ?'
' ध्वनी निर्माण होईल !'
'ध्वनी निर्माण झाला, म्हणजेच स्पंदन झाले. आपल्या कंठातून नाद बाहेर पडण्याचे कारण ध्वनी तंत्राचे स्पंदन ! श्वासक्रियेने हे स्पंदन घडते...तसेच दगडाचे ! आपणास जो हवा तो नाद आपण निर्माण करू शकतो. मला काय म्हणावयाचे आहे, ते शिल्पकारांच्या लक्षात येते आहे ना ?' पट्टमहादेवींनी विचारले.
'आपण जेव्हा बोलता, तेव्हा तर सगळे ठीकच वाटते. परंतु भिन्न भिन्न नाद उत्पन्न कसे करायचे ? कोणते नाद मूर्तीत हवे हे देखील माहित असायला हवे ! आपण मार्गदर्शन करा...मला काम करायला आवडेल!'– भारावलेला शिल्पकार बोलला.
' सरस्वती ही साहित्य आणि संगीत म्हणजेच ज्ञान आणि कलेची अधिष्ठात्री देवता आहे. म्हणूनच या वीणारहित नाट्य सरस्वतीच्या संपूर्ण आकृतीमधून संगीताचे आधारभूत सप्तस्वर उमटावेत, असे आम्हास वाटते.'
' ठीक आहे ! पट्टमहादेवींची कल्पना मूर्तरूपात आणण्यासाठी मी मार्गदर्शन करण्याचा अवश्य प्रयत्न करेन, पण यशस्वी होईनच असे सांगू शकत नाही. कारण एका दगडात एक नाद भरणे संभवनीय आहे, परंतु येथे तर एकाच दगडातून सातही स्वर निर्माण करायचे, म्हणजे मोठी साधनाच आहे...' मुख्य शिल्पकार आपले मत सांगू लागले.
' वीणेची एक तार जेव्हा सात स्वरांना निनादित करू शकते, तेव्हा दगडातही हे व्हायला हवे ना ? स्पंदनाची लांबी जशीजशी कमी होते तसे तसे स्वर स्थान वाढत जाते, हे वीणावादनाचे सूत्र आहे. हेच सूत्र वापरून आपण दगडात सूर निर्माण करू शकतो !'–पट्टमहादेवी विश्वासपूर्ण शब्दात मार्गदर्शन करीत होत्या.

पट्टमहादेवींच्या निर्देशानुसार नाट्य–नाद सरस्वतीचे काम करतांना तरुण शिल्पकार दासोज स्वतःला धन्य समजू लागला....स्वतःच्या आयुष्यातील श्रेष्ठ कलाकृती निर्मितांना आनंदाने विभोर झाला! मंदिराचे काम पूर्णत्वाकडे जात होतेच, तर महाराजांनी पट्टमहादेवींना बोलविल्याचे पत्र यादवपुरीहून प्राप्त झाले. त्यामुळे मंदिराचे काम मुख्य शिल्पकारावर सोपवून पट्टमहादेवी दुसऱ्याच दिवशी यादवपुरीकडे निघाल्या.

यादवपुरीचे हे प्रस्थान पट्टमहादेवींच्या जीवनात कोणते नवीन वादळ निर्माण करते.... ? अलौकिक मंदिर कलाकृतीत पट्टमहादेवींच्या आणखी कोणत्या कल्पना प्रत्यक्षात येतात...? बघू या पुढील भागात!!

( क्रमशः )

---

## आर्जव

**अविचारात गडू नका,**
**सुवर्णसंधी दवडू नका,**
**कुणासाठी अडू नका,**
**विनाकारण चिडू नका ।।**

**कुसंगतीत सडू नका,**
**कुंठित होऊन रडू नका,**
**सत्संगती सोडू नका,**
**योग्य नियम तोडू नका।।**

**अनुचित ते जोडू नका,**
**हितवचन झाडू नका,**
**आळसामध्ये पडू नका,**
**अंधश्रद्धेत घडू नका।।**

**कुकर्मात कीडू नका,**
**अन् हवे ते ताडू नका,**
**अशक्तांना पीडू नका,**
**वायफळ बडबडू नका।।**

**अज्ञानात कुडू नका,**
**अहंकाराने उडू नका,**
**भांडणाशी भिडू नका,**
**भवसागरात बुडू नका।।**

**पं. श्री. जिनचन्द्र अलमान,**
**शास्त्री–हेरले**

# ‘सोलहकारण भावना भाय....!’

(लेखांक १०)

हर्षा वेखंडे, नागपूर,९८२२६९०८६०

## साधुसमाधी भावना

साधुसमाधी या नावातच दोन शब्द येतात.... साधू आणि समाधी! साधू म्हणता क्षणी नजरेसमोर उभे राहतात ते.. व्रती, संयमी, आत्मसाधना करणारे योगी, तपस्वी! समाधीचे अधिकारी!!

समाधी हा शब्द जिथे जिथे जोडला जातो तिथे तिथे सज्जनांची भावना उचंबळून येते. संसाराच्या चक्राची भीती बाळगणारे आणि या भवसागरातून तरु पाहणारे ‘समाधी’ या शब्दावर येऊन थांबतात-विसावतात. या शब्दावर त्यांची दृष्टी खिळून राहते.

कोण ते सत् जन?

सत् म्हणजे अस्तित्व.

अस्तित्व जीवाचं...

माझं तुझं प्रत्येकाचं...

स्व-अस्तित्वाप्रती जिज्ञासा ठेवणारे..

त्याला ओळखू पाहणारे...

त्याची आस बाळगणारे...

ते सत् जन!

स्वतःची जीव रूपाने ओळख जपणारे.. स्वतःच्या सुख स्वभावाची जाण असणारे.. आनंदनिधान आत्म्याचा सुगावा लागलेले.. ज्यांनी स्पर्श केला आहे त्या अनुभूती स्वरूप आत्म्याला....ते सम्यग्दृष्टी..

तेही सत् जन!

ज्यांना कळलं आहे स्वतःचं स्वरूप...

आणि सहजतेने सुटताहेत काही विकार ज्यांचे.....

बाह्य रूपात प्रकाशित होत आहेत अणुव्रतं, प्रतिमा...

काही अंशाने सत् स्वरूपाकडे वळलेले...

अशा पायवाटेचे पथिक, जे चारित्ररूपी हमरस्त्यावर येऊ पाहत आहेत.... ते देशव्रती!

तेही सत् जन!

तर सम्यग्दर्शन, सम्यग्ज्ञान, सम्यक्चारित्र या मोक्षमार्गाचे पथिक..

आत्मसाधनेच्या आनंद लहरींत डुंबणारे महाव्रती...

तेही सत् जनच!!

यातले काही आत्मसाधनेची इच्छा धारण करणारे...

तर काही त्या मार्गावर मार्गक्रमण करणारे...

हे सारे साधनेशी जुळलेले साधक...

अंशाने वा पूर्णत्वाने...

ते साधू!!

ज्याच्या अंतरंगात जितक्या प्रमाणात सज्जनता तेवढ्या प्रमाणात तो साधू!!

या साऱ्यांना ‘समाधी’ हा शब्द भुरळ घालतो. सारे साधकच आत्म्याचे!

समाधीत स्थिर होण्याची वर्तमानकालीन योग्यता कोणाची? हे मानधन कोणाचं?

तर साधूंचं-महाव्रतींचं!

जीवराजाने स्वतःचं सर्वस्व चैतन्यधन ज्यांना अर्पण केलं आहे त्या तपस्वींचं!!

समाधी म्हणजे मृत्यू समयी धारण करण्यात येणारी सल्लेखना, असा मर्यादित अर्थ साधुसमाधी या भावनेत अभिप्रेत नाही बरं का!

समाधी हा शब्द तयार झालाय् --सम्+आ+धृ

सम- म्हणजे एकत्र समान.

आ-म्हणजे दिशा.

धृ- म्हणजे धारण करणे.

अर्थात् दहाही दिशांतून एके ठिकाणी स्व-ला केंद्रित करणे... समताभावात केंद्रित होणे...समताभावात स्वतःला धारण करणे म्हणजे समाधी!

मुनींची ओळख सांगणारी गाथा श्री प्रवचनसार शास्त्रात येते. ‘चारित्तं खलु धम्मो!’

चारित्र हाच धर्म आहे. धर्म म्हणजे 'समताभाव'. तो मोह आणि क्षोभ यांनी रहित असा परिणाम आहे. अर्थात् वीतरागी भाव आहे आणि तेच शुद्धात्मस्वरूप आहे. या आत्मस्वरूपात लीन असणारे ते मुनिराज होत. ते आहेत वास्तवात साधू. तप त्यांची ओळख. समाधीचा प्रत्यक्ष संबंध त्यांच्याशी...!

**'तप: संधारणं समाधिः।'**

मुनी महाराजांची निर्विघ्न तपस्या म्हणजे समाधी.

त्यासाठी सजग राहणं ही व्रतींसोबत गृहस्थांचीही जबाबदारी... चालते बोलते सिद्ध म्हणतात मुनी महाराजांना....धर्म बघावा तो त्यांच्यात! धर्म हे सुखाचं नाव आहे. मुनी स्वतःचं आत्मकल्याण करणारे आत्मार्थी! त्यांच्या सान्निध्यात येणाऱ्या जीवांना स्वतःच्या चर्येतून प्रेरणा देणारे!!

समयसारच्या चौथ्या गाथेच्या टीकेत अमृतचंद्र आचार्य म्हणतात,'या अज्ञानी जीवाला आजपर्यंत आत्म्याचं स्वरूप समजलं नाही, कारण ज्यांना ते गवसले आहे, अशा मुनींच्या निकट तो कधी राहिला नाही, त्यांच्याशी परिचय केला नाही, त्यांची सेवा केली नाही. अर्थात त्यांची चर्या, त्यांचे श्रद्धान, ज्ञान, तप अर्थात समाधी जवळून बघितली नाही, ती त्याच्या हृदयात उतरली नाही.. त्याला आत्मस्वरूप कसं समजेल? '

मुमुक्षु जीवाला मुनिराज आदर्श असतात. ते भव्य जीवाच्या कल्याणामध्ये निमित्त बनतात. त्यांच्यापासून प्रेरणा घेऊन तो स्वतःमध्ये सत् गुण रुजवतो... हा साधूशी असणारा श्रावकाचा संबंध....! त्यांच्याकडून हे अमूल्य वैभव घेता घेता परतफेडीची जबाबदारीही श्रावकाची ठरते.

साधू त्यांच्या आत्मसाधनेत मग्न राहावेत, यासाठी त्यांच्या व्रतनियमांना धक्का लागू न देता त्यांच्या व्रतांची सुरक्षा करणे, हे आम्हा गृहस्थांचेही कर्तव्य आहे. ही जाणीव देणारी साधुसमाधी भावना आहे. ही साधुसमाधी भावना जीवाला तीर्थंकर पदापर्यंत पोहोचवते.

मौल्यवान वस्तूंनी ज्याचं भांडार भरलेले आहे, त्याच्या भांडारगृहाला आग लागली, तर गृहस्थ जीवाच्या आकांताने आग विझवतो. कारण त्याला ठाऊक असतं की, त्याचं जीवन त्या वस्तूंवर अवलंबून आहे. त्याचप्रमाणे सम्यग्दर्शन, सम्यग्ज्ञान आणि सम्यक्चारित्र ही मूल्यवान रत्नं ज्यांचं निधान आहे, असा रत्नांचा करंडक ज्यांचं सर्वस्व आहे, त्या मुनींना कुठल्याही प्रकारचं विघ्न आलं आणि ते आपल्या तपसाधनेपासून चलायमान होऊ लागले तर, त्या साधूंना-व्रतींना समता भावात अर्थात् तपस्येत स्थिर करण्यासाठी सहायता करणे हे गृहस्थांचं कर्तव्य आहे.

मुनींचे आहार, विहार, वसतिका संबंधाने गृहस्थ व्रतींच्या जवळ येतो, यासंबंधी कर्तव्यात सजगता असावी, विवेक असावा. पाच इंद्रियांसंबंधी विषयांचा संपूर्ण त्याग करून अतींद्रिय आनंदाच्या मार्गावर विहार करणारे हे मुनिराज.. तपस्या हे साधन आहे त्यांचं! इंद्रिय-भोगाची साधनं नव्हे तर, भोगाच्या साधनांचा परिपूर्ण त्याग हे त्यांचं वैभव! त्यात गृहस्थांच्या अविवेकाने, अति उत्साहाने बाधा येऊ नये.

जसे आहारात अनेक प्रकारच्या पदार्थांचा समावेश, तेलकट-तुपकट, गरिष्ठ पदार्थांची आहार व्यवस्था त्यांच्या तप:साधनेत उपसर्ग ठरू शकते, त्यांच्या ध्यानसाधने पासून चळण्यासाठी निमित्त ठरू शकते. आम्ही जी भौतिक सुखाची साधनं मानतो ती हीटर, एसी आदि सुविधा त्यांना समाधीपासून दुरावा निर्माण करणारी उपसर्गाची साधनं ठरू शकतात.

त्यामुळे त्यांच्या ध्यान धारणेत कुठल्याही प्रकाराने व्यत्यय येऊ नये, अशा पद्धतीने गृहस्थांनी अत्यंत जागरूकपणे त्यांच्या व्रतांची रक्षा होईल अशा पद्धतीने व्यवस्था करावी, जेणेकरून साधू निर्विघ्न आत्मसाधना करू शकतील. ही साधुसमाधी भावना होय.

गृहस्थाच्या जीवनातही समाधीला अत्यंत महत्त्व आहे. दुर्धर व्याधी जडली, मृत्यूचा सुगावा लागला, इष्टजनांचा वियोग झाला, अनिष्टाचा संयोग

झाला, तर ज्ञानीच्या विचारांमध्ये तत्त्वज्ञान धावतं.....!

इंद्रियांचा समूह रूप शरीर, मन-वचन-कायेचं बळ, किती जगतो आहे ती आयू, श्वासोच्छ्वास हे दहा प्राण वास्तवात जीव नाहीत. माझं चैतन्य.. माझा ज्ञान स्वभाव हाच मी....हा अजर-अमर आहे.... त्याला मरण नाही....तो अनादि अनंत आहे.

मी तर चैतन्य प्रभू..
मज कोणाची भीती !

वास्तवात प्राप्त देह आणि आत्म्याचा वियोग म्हणजे मरण. हे तर अनादि काळापासून होतच आलं आहे. जोपर्यंत शरीर मिळत राहील तोपर्यंत त्याचा वियोग ही काळ्या दगडावरची रेष ! शरीराचं हे बंधनच नको आता, असा निर्णय करून जीव मोक्षमार्गाकडे वळतो. कुठलंही संकट-अडचण येऊ दे, ही पूर्वकर्मांची निर्जरा होते आहे....कर्मांचा भार हलका झाला हे उमजून सम्यग्दृष्टी अत्यंत दृढतेने शांत राहण्याचा प्रयत्न करतो, हे स्वतःला समाधीच्या दिशेने अग्रेसर करणं आहे. साधुसमाधी भावना तीर्थंकर पदप्राप्तीचं कारण ठरते.

गृहस्थांना अनंत सुखाचा रस्ता दर्शवणारी ही भावना आहे. ही भावना सत्स्वरूपाशी जुळण्याची प्रेरणा देते. ज्यांनी आत्म्याची सुंदरता अनुभवली, त्यांची संगत-परिचय देते. त्यांच्याशी जुळण्याची प्रेरणा देते.... कल्याणकारक मार्गाशी जोडते. ही भावना, ज्यांच्या ज्यांच्यात आत्मसाधनेची योग्यता आहे, उमंग आहे त्यांच्याशी जोडते आणि साधर्मींचा एक परिवार तयार होतो, जो भवभवांमध्ये मोक्षमार्गावर पुढे पुढे जाण्यासाठी साहाय्यक ठरतो.

आगळावेगळा परिवार !
मुक्तीसाठी झटणारा!!.....
तीर्थंकर पदापर्यंत पोहोचवणारा....!!

( क्रमशः )

## भद्र - भारती

### महत्त्वाकांक्षा म्हणजे काय?-

दिव्य वस्तूच्या प्राप्तीची लालसा म्हणजेच महत्त्वाकांक्षा होय. **महत्त्वाकांक्षी मनुष्य जीवनातील प्रत्येक बाबतीत आदर्श प्रस्थापित करण्याचा चिकाटीने प्रयत्न करीत असतो. तो बोलेल कमी, परंतु करील अधिक.**

**अल्पज्ञानी आपल्या जवळील तुटपुंजा बुद्धिवैभवानेही गर्विष्ठ होऊन जगाला लागलीच दोन उपदेशाच्या गोष्टी सांगण्यास आतुर होतो. परंतु तो जसजसा अधिक जनसंपर्कात येतो तसतसा त्याच्या ज्ञानातील उथळपणा इतरांच्या निदर्शनास आल्याशिवाय रहात नाही. अशा उथळ पाण्याच्या खळखळाटाला लोकही तेवढीच किंमत देतात. महत्त्वाकांक्षी मनुष्य अशी क्रियाहीन वाचाळता व्यर्थ समजतो. ज्या गोष्टीचे स्वत:कडून आचरण होत नाही ती गोष्ट दुसऱ्यास सांगण्याचे साहस करीत नाही.**

### महत्त्वाकांक्षी पुरुषांचे पहिले कर्तव्य कोणते?-

**स्वत:चे मन आणि इंद्रिये ज्याच्या स्वाधीन राहतील तोच कामक्रोधादी विकारापासून अलिप्त राहू शकेल आणि जीवनात शांती मिळवू शकेल.**

**देहाभिमानी मूढ मनुष्य प्रथम दुसऱ्याला सुधरविण्यास आतुर होतो; परंतु विवेकी पुरुष सुविचारादी योग्य मार्गाने प्रथम स्वत:ला सुधारण्याचा प्रयत्न करतो. ज्याला जग सुधारण्याची खरी इच्छा व तळमळ आहे त्याने प्रथम स्वत:ला सुधारले पाहिजे.**

**- परम पूज्य गुरुदेवश्री समंतभद्र महाराज**

# रामायण आणि महाभारतातील व्यक्तिरेखांचे तौलनिक विवेचन

अमृत महोत्सवी वर्ष
सन्मति
प्रकाशन
स्थापना : १५ ऑगस्ट १९५०

(लेखांक-३)

**डॉ. सौ. लीना चवरे,** कारंजा-लाड
(९४२२५८८३३५)

*** रामायणातील वानर**

रामायणातील वानर आणि राक्षस या संज्ञांच्या संदर्भात जैन आणि जैनेतर रामायणात अंतर आढळून येते. दोन्ही रामायणात वानर आणि राक्षस यांचा उल्लेख आलेला आहे, परंतु अगदी भिन्न रितीने. वाल्मिकी रामायणात वानरांचा उल्लेख सरळ पशू या अर्थाने आला आहे आणि राक्षसांचे वर्णन अतिमानुष स्वरूपाचे आहे. परंतु जैन रामायणात मात्र वानर आणि राक्षस - दोहोंनाही व्यक्तित्व लाभलेले आहे.

वाल्मिकी रामायणात बालकाण्डातील सतराव्या सर्गामध्ये वानरांच्या उत्पत्तीविषयी उल्लेख आहे. त्यात त्यांच्या शेपटीचा स्पष्ट उल्लेख आहे. परंतु पुढेही वानरांविषयीचे जे उल्लेख आले आहेत ते सुद्धा त्यांच्या पशुत्वाची पुष्टी करणारेच आहेत. उदा. वानरश्रेष्ठ म्हणून संबोधला जाणारा हनुमान जेव्हा रामाचा दूत बनून लंकेत जातो, तेव्हा क्रोधित झालेला रावण आज्ञा देतो की, 'शेपूट हे वानरांना मोठे प्रिय व भूषण असते. ह्यास्तव त्याचे ते शेपूटच तुम्ही पेटवून द्या.' ( संदर्भ : प्रा. भालबा केळकर संपादित श्रीवाल्मिकीरामायण भाग २ पृ. ३४८) त्याचप्रमाणे हनुमानाच्या ताम्रमुखाचाही उल्लेख आलेला आहे. उदा. राक्षसस्त्रिया सीतेला सांगतात की, 'अगं सीते, ज्या ताम्रमुख वानराने तुझ्याशी संभाषण केले, त्याच वानराला त्याचे शेपूट प्रदीप्त करून सर्व बाजूंनी हिंडवीत आहेत.' अशी अनेक वर्णने रामायणात आलेली आहेत. तसेच काही वर्णनांमध्ये त्याच्या अंगावरील लोमांचाही उल्लेख आला आहे. म्हणजे लोम, शेपूट, ताम्रमुख तसेच काही ठिकाणी त्यांच्या 'वनचर' म्हणून करण्यात आलेल्या उल्लेखांवरून त्यांचा पशुयोनीत्वाला पुष्टी मिळते.

याउलट नमूद करण्यासारखी गोष्ट म्हणजे जैन रामायणातील वानर ही संज्ञा पशुत्व दर्शक मुळीच नसून वानर हे एका वंशाचे (वानरवंश) नाव आहे. जैन रामायणातील वर्णनानुसार जगात प्रमुख चार वंश आहेत. - पहिला इक्ष्वाकू वंश, दुसरा ऋषिवंश किंवा चंद्रवंश, तिसरा विद्याधर वंश आणि चवथा हरिवंश. ज्याप्रमाणे भेदाचे अनेक पोटभेद असतात त्याप्रमाणे या प्रमुख वंशाचे नंतर अनेक उपवंश आहेत. या चार प्रमुख वंशांपैकी जो तिसरा विद्याधर वंश आहे, त्या वंशातील पुरुष विद्या धारण करीत असल्यामुळे विद्याधर म्हणून ओळखले जातात. या विद्याधर वंशात जे अनेक राजे होऊन गेले त्यापैकी एक म्हणजे अमरप्रभ नावाचा राजा. या राजाच्या विवाहप्रसंगी विवाहवेदीवर वानरांची चित्रे काढण्यात आली. तेव्हा अमरप्रभ राजा वृध्द मंत्र्यांना याचे कारण विचारतो. तेव्हा ते वृध्द मंत्री सांगतात, 'आपल्या वंशामध्ये श्रीकंठ नावाचा एक प्रसिध्द राजा होऊन गेला. त्याने किष्कीपूर नावाचे सुंदर नगर वसविले. एक दिवस माणसांच्या आकाराच्या वानरांना या नगरामध्ये पाहून तो राजा प्रथम आश्चर्यचकीत झाला व नंतर आनंदित होऊन त्यांच्याबरोबर निरनिराळ्या क्रीडा करू लागला. त्याने शुद्ध भोजन वगैरेंनी ह्या वानरांना अत्यंत सुखी केले होते. तेव्हापासून अत्यंत कांतिमान अशा त्या श्रीकंठ राजाच्या वंशामध्ये जे राजे जन्मले, ते सर्वजण श्रीकंठ राजावरील भक्तीमुळे या वानरांवर प्रेम करीत असत. आपल्या पूर्वजांनी या वानरांचा मंगल वस्तूंमध्ये अंतर्भाव केला म्हणून आपल्या विवाहाच्या या मंगल प्रसंगी चित्ररूपाने यांची

स्थापना केली आहे. त्यावर अमरप्रभ म्हणाला की आमच्या पूर्वजांनी जर या वानरांची मंगलरूपाने उपासना केली तर मग जेथे पाय वगैरे लागतात त्या जमिनीवर यांना का बरे चित्रित केले आहे? मी आता यांना मोठ्या गौरवाने नमस्कार करुन मस्तकावर धारण करीन. तेव्हा रत्ने वगैरेंमध्ये या वानरांची चिन्हे कोरून ती मुकुटांच्या अग्रभागी, ध्वजांवर, घरांच्या शिखरांवर, तोरणांच्या अग्रभागी, छत्रांच्या माथ्यावर ताबडतोब धारण करा. अमरप्रभाने अशी आज्ञा दिल्यावर मंत्र्यांनी त्याप्रमाणे केले आणि मग सगळीकडे वानरच दिसू लागले. तेव्हापासून ज्या विद्याधरांच्या छत्र, मुकुट वगैरेंवर वानरांची चिन्हे अंकित होती ते विद्याधर जगामध्ये 'वानर' म्हणून प्रसिध्द झाले.' ( संदर्भ : प्रा. महावीर कंडारकर संपादित – पद्मपुराण भाग १ – पृ. ११४)

हनुमान हा याच विद्याधरांचा वंशज असल्याने तोही वानर म्हणून ओळखला जातो. प्रत्यक्षात वानराच्या रूपाशी त्याचा संबंध नाही. त्याला शेपूट असल्याचा उल्लेख जैन रामायणात कोठेही आढळून येत नाही. उलटपक्षी जेथेही हनुमानाचे वर्णन आलेले आहे तेथे तो एक आत्यंतिक सुस्वरूप, गुणवान, महापराक्रमी पुरुष होता हेच प्रतीत होते.

वरील विवेचनावरून एक गोष्ट स्पष्ट होते की जैन रामायणात हनुमानादिकांना जे वानर म्हणून संबोधण्यात आले ते वानर नावाच्या पशूशी त्यांचे साम्य होते म्हणून मुळीच नव्हे तर वानरांचे चिन्ह ते धारण करीत होते.

**✻ रामायणातील राक्षस :**

वाल्मिकी रामायणात बालकाण्डातील तिसाव्या सर्गामध्ये राक्षसांचे वर्णन आलेले आहे. विश्वामित्राच्या यज्ञामध्ये विघ्न आणणाऱ्या राक्षसांचे जे अक्राळविक्राळ स्वरूपाचे वर्णन आहे ते अतिमानुष असेच आहे. नंतरही इतर अनेक ठिकाणी जी राक्षसांच्या संदर्भात वर्णने आलेली आहेत त्यावरून ते सामान्य मानव असावेत असे वाटतच नाही. त्यांचे रूप, त्यांच्या लीला यांचे विस्तृत वर्णन वाल्मिकी रामायणात आहे. रावणाच्या लंकेतील राक्षसांचे वर्णन अंगावर शहारे आणणारे असेच आहे. उदाहरणार्थ, रावण सीतेला लंकेत पळवून आणून तिला तेथे अशोकवनात ठेवतो व तिचे रक्षण करण्यासाठी अक्राळविक्राळ मुद्रेच्या राक्षसस्त्रिया ठेवतो. हनुमान लंकेत पोहोचल्यानंतर तो अशोकवनात जाऊन एका वृक्षावर बसतो. त्यावेळी त्याला जेव्हा सीतेचे दर्शन होते तेव्हा त्याच्या मनात विचार येतो. 'अरेरे ! पृथ्वीसारखी क्षमा आणि कमलांसारखे नेत्र यांनी युक्त असलेल्या ज्या सीतेचे राम–लक्ष्मणांनी रक्षण केले, तिचे रक्षण सांप्रत वृक्षाच्या मुळाशी अक्राळविक्राळ मुद्रेने युक्त असलेल्या राक्षसस्त्रिया करीत आहेत!'

नंतर हनुमान राक्षसींचे अवलोकन करतो, 'हनुमानाने ज्या राक्षसीचे अवलोकन केले, त्यापैकी कोणाला एकच डोळा, तर कोणाला एकच कान होता. कोणाचे कान वस्त्राप्रमाणे पांघरता येतील इतके लांब होते, तर कोणाला मुळीच नव्हते आणि कोणाला शंकूप्रमाणे होते. कोणाचे मस्तक शरीराच्या मानाने फारच मोठे होते, तर कोणाची मानच अगदी बारीक व लांब होती. कोणाचे केसच नाहिसे झाले होते, तर कोणाला मुळीच नव्हते, आणि कोणी तर केसांच्या योगाने काळी घोंगडीच पांघरून बसल्यासारख्या दिसत होत्या...... कोणाचे तोंड डुकरासारखे. तर कोणाचे हरिणासारखे, कोणाचे वाघासारखे तर कोणाचे म्हशीसारखे.... कोणाचे घोड्यासारखे तर काहींची तोंडेच कबंध राक्षसाप्रमाणे आंत गेलेली. काहींना एकेकच हात, तर काहींना एकेकच पाय. अशाप्रकारच्या भयंकर मुद्रेने युक्त, तामसी, कलहप्रिय, भयंकर व धूमवर्ण केस आणि अक्राळविक्राळ मुद्रा धारण करणाऱ्या आणि दिसण्यातही भयंकर असून हातामध्ये शूल व मुद्गर घेतलेल्या राक्षसी त्याने अवलोकन केल्या.' (संदर्भ: प्रा. भालबा केळकर संपादित श्रीवाल्मिकीरामायण – भाग २ – पृ. २४९ – २५०)

अजूनही बरेच सविस्तर वर्णन पुढे दिलेले आहे. युध्दाच्या वेळी आलेले राक्षसांचे वर्णनही

त्यांच्या भयंकर रूपाची पुष्टी करणारे असेच आहे. रावण हा रामायणातील खलनायक. त्याचे वर्णन करतांनाही वाल्मिकी एके ठिकाणी म्हणतात, 'दहा मस्तकांनी आणि वीस भुजांनी युक्त दशग्रीव रावण हातात धनुष्य घेतलेल्या अवस्थेत मैनाक पर्वतासारखा दिसत होता.' (डॉ. प्र. न. जोशी संपादित सार्थ श्रीवाल्मिकी रामायण - खंड -४ , पृ. १०३ ) दहा तोंडे आणि वीस हात असले तर दिसण्यात किती भयंकर दिसणार!

थोडक्यात वरील वर्णनांकडे बघितल्यास वाल्मिकी रामायणातील 'राक्षस' ही संज्ञा परीकथेत जशी राक्षसांची वर्णन आलेली असतात, तशा अक्राळविक्राळ राक्षसांचे प्रतिनिधित्व करतांना दिसते. आता जैन रामायणात राक्षसांविषयी कशाप्रकारचे उल्लेख आलेले आहेत ते बघू.

*** जैन रामायणातील राक्षस :**

आधीच्या भागात उल्लेख केलेला जो विद्याधर वंश त्याचाच आणखी एक उपवंश म्हणून राक्षसवंशाचा उलेख जैन रामायणात आलेला आहे. - 'मनोवेग नावाच्या राजास राक्षस नावाचा पुत्र झाला व त्याच्या नावावरून हा वंश राक्षसवंश म्हणून संबोधला जातो. 'या राक्षसवंशातील राजे 'राक्षस' म्हणून संबोधिल्या जाऊ लागले. रावण हा सुध्दा याच वंशातील असल्यामुळे त्यालाही 'राक्षस' म्हटल्या जाऊ लागले. हे राक्षसवंशी विद्याधर ज्या द्वीपावर राहत होते त्या द्वीपाचे 'राक्षसद्वीप' असे नामकरण झाले. - 'राक्षसवंशी विद्याधर राक्षस जातीच्या व्दीपाचे रक्षण करीत होते. म्हणून ते व्दीप 'राक्षसद्वीप' म्हणून प्रसिध्द झाले व त्या द्वीपाचे रक्षण करणारे विद्याधर 'राक्षस' म्हणून ओळखले जाऊ लागले.' (संदर्भः प्रा. महावीर कंडारकर संपादित 'पद्मपुराण' भाग -१ पृ.९७ ) म्हणजे राक्षस नावाच्या राजावरून त्या वंशाला राक्षसवंश म्हणून व त्या वंशातील राजांना 'राक्षस' म्हणून नाव पडले व नंतर हे नामकरण ते राक्षस राक्षसद्वीपाचे रक्षण करीत होते म्हणून अधिकच दृढ झाले.

रावण हा याच राक्षसवंशातील होता. म्हणून त्याला व लंकेतील इतरही लोकांना राक्षस म्हणून संबोधिले गेले. रावणाला राक्षस म्हणण्याची ही अशी संगती लागते. प्रत्यक्षात रावण आणि इतर राक्षस जैन रामायणानुसार अक्राळविक्राळ स्वरूपाचे मुळीच नव्हते. उलट अत्यंत सुस्वरूप व पराक्रमी पुरूष म्हणूनच रावणाचे वर्णन जैन रामायणात आलेले आहे. वाल्मिकी रामायणामध्ये रावणाला दहा मुख आणि वीस भुजा होत्या असे वर्णन आलेले आहे. परंतु जैन रामायणात मात्र असे वर्णन मुळीच नाही. त्याला सामान्य माणसाप्रमाणे एकच मुख होते, हे जैन रामायणावरून प्रतीत होते. जैन रामायणात त्याच्या 'दशानन' या नावाचा उल्लेख आहे व त्याच्या जन्मानंतर दशानन हे नाव सर्वप्रथम ठेवले गेले हेसुध्दा दिसून येते. बाकी नावे नंतर पडली. परंतु दशानन हे नाव त्याला दहा मुखे होती म्हणून पडलेले नाही. तर 'दशानन' या नामकरणाचे कारण अत्यंत भिन्न वर्णिलेले आहे. रावणाच्या मेघवाहन नामक एका पूर्वजास राक्षस राजांच्या इंद्राने (प्रमुखाने) एक रत्नहार भेट म्हणून दिलेला होता. त्या हाराचे रक्षण प्रत्यक्षात नागेंद्र करीत होता, त्यामुळे त्या हारास हात लावण्याची हिंमत कुणी करीत नव्हते. परंतु रावणाचा जन्म झाल्यानंतर त्याने मात्र तो हार लीलया उचलला व ते बालक त्या हाराशी सहज खेळ करू लागले हे बघून त्याचे मातापिता आश्चर्यचकीत झाले. माता हे बघून गोंधळून गेली, परंतु नंतर तिने तो हार त्याच्या गळ्यात घातला.- 'त्यावेळी तो हार आपल्या किरणसमूहांनी दाही दिशा प्रकाशित करीत होता. त्या हारामध्ये गुंफलेल्या मोठमोठ्या स्वच्छ रत्नांमध्ये त्या बालकाचे मुख अन्य नऊ प्रकारे प्रतिबिंबित होत होते, म्हणून त्याचे नाव 'दशानन' असे ठेवण्यात आले.' (संदर्भ : प्रा. महावीर कंडारकर संपादित पद्मपुराण भाग - १, पृ. १५८ ) असा 'दशानन ' ह्या नामकरणासंबधी जैन रामायणात उल्लेख आहे व तो संयुक्तिकही वाटतो.

अशाप्रकारे वानर आणि राक्षस या दोहोंबद्दल दोन रामायणांमध्ये कमालीची

मतभिन्नता आढळून येते. एकाने वानरांना सरळ पशुयोनीत नेऊन बसविले तर दुसऱ्याने त्यांना व्यक्तित्व बहाल केले. एकाने राक्षसाला अतिमानुष स्वरूप बहाल केले तर दुसऱ्याने त्यांना माणसात आणले. यापैकी सत्याच्या जवळ नेणारे चित्रण कोणते ? अधिक सुसंगत काय वाटते? यासाठी वाल्मिकी रामायणाचे संपादन करणाऱ्या काही विद्वानांनी व्यक्त केलेल्या विचारांवरही नजर टाकू. जैन रामायणाने तर इतक्या स्पष्टपणे राक्षस आणि वानरांना व्यक्तित्व बहाल केले आहे की, त्यासंबंधी चर्चा करण्याची जैन रामायणाच्या संपादकांना आवश्यकताच वाटली नाही. परंतु वाल्मिकी-रामायणाच्या अभ्यासू संपादकांना मात्र स्वतंत्र लेखांची किंवा टीपांची पुस्ती संपादित रामायणांना जोडून या गोष्टीवर प्रकाश टाकावासा वाटला, सत्य शोधावेसे वाटले. त्यांच्या मतांचा परामर्श पुढील भागात .

( क्रमशः)

## बाहुबली येथे सम्यक् विद्या ज्ञान संस्कार शिबिर संपन्न



प. पू. संतशिरोमणी आचार्यश्री १०८ विद्यासागरजी महामुनिराज यांचे परम शिष्य अध्यात्मयोगी आचार्यश्री १०८ समयसागरजी महाराज यांच्या आशीर्वादाने व प. पू. मुनिश्री १०८ विशालसागरजी महाराज ससंघ, प. पू. मुनिश्री १०८ विदेहसागराजी महाराज, प. पू. आर्यिका सुव्रतमती माताजी यांच्या सानिध्यामध्ये अतिशय क्षेत्र बाहुबली येथे दिनांक १४ मे २०२५ ते २५ मे २०२५ या कालावधीमध्ये सम्यक् विद्या ज्ञान संस्कार शिबीर सानंद संपन्न झाले.

ध्वजारोहण व मंडप उद्घाटन धर्मानुरागी मा. प्रशांतजी जैन, मुबंई आणि धर्मानुरागी मा. प्रभातजी जैन, मुबंई यांचे हस्ते झाले. यावेळी बाहुबली ब्रह्मचर्याश्रमचे पदाधिकारी उपस्थित होते. मुख्य संघटक बा.ब्र. तात्या भैय्याजी यांच्या मार्गदर्शनाखाली १५००हून अधिक पुरुष -महिला शिबिरार्थींनी ज्ञानार्जन केले. या शिबिरामध्ये जिनसंस्कार भाग १ व २, छहढाला, रत्नकरंडक श्रावकाचार, द्रव्यसंग्रह, तत्त्वार्थसूत्र आणि चौवीस ठाणा या विषयांचे अध्ययन करण्यात आले. बा. ब्र. भैय्याजी, ब्रह्मचारी दीदी तसेंच प्रतिमाधारी यांचेकडून ज्ञानार्जन करण्यात आले. सकाळी योगा, ध्यान, मुलांच्यासाठी लाठी-काठी प्रशिक्षण, अभिषेक, पूजन व विषयानुसार क्लासेस, शुद्ध भोजन याचे सुयोग्य नियोजन करण्यात आले. यावेळी अभय बरगाले, किरण सिदनाळे, बा. ब्र. द्वारपाल भैय्याजी, आदिनाथ मादनाईक, मुख्य संयोजक निलेश शिरोटे, महिला संयोजिका सौ. निर्मला चौगुले तसेच अन्य संयोजन टीम व शांतिविद्याचे सर्व ट्रस्टी तसेच सर्व पुरुष कार्यकर्ते व महिला कार्यकर्ते यांनी हे शिबिर यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतले. बाहुबली विद्यापीठ व ब्रह्मचर्याश्रम यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

# प्रथमानुयोग

**मीना किरण गरिबे (जैन),** अमरावती.

आ म्हणजे जे आप्तांद्वारे कथिले गेले आहे,
ग म्हणजे जे गणधरांद्वारे गुंफले गेले आहे,
म म्हणजे जे मुनीद्वारे लिहिले गेले आहे.

अशा जिनवाणीला आगम असे म्हटले जाते. हा जैनागम चार भागात विभाजित करण्यात आला आहे. प्रथमानुयोग, करणानुयोग, चरणानुयोग आणि द्रव्यानुयोग या चार भागांनाच अनुयोग असे म्हणतात.

जिनवाणीच्या उपदेशांच्या पद्धतीला अनुयोग असे म्हणतात किंवा ज्याच्या माध्यमातून आगमज्ञान किंवा जैन तत्त्वज्ञान जाणले जाते, त्याला अनुयोग असे म्हणतात.

क्रियाकलाप मधील समाधी भक्तीमध्ये या चार अनुयोगांना नमस्कार केला आहे.

**प्रथमं करणं चरणं द्रव्यं नमः।**

ह्या चारही अनुयोगांना नमस्कार केला आहे. कारण मोक्षसाधनेत या चारही अनुयोगात निबद्ध झालेल्या जिनवाणीचे स्वतंत्र स्थान आहे. मोक्षपथावर मार्गक्रमण करताना ह्या अनुयोगाचे सहाय्य इच्छित गंतव्यप्राप्ती म्हणजेच मोक्षप्राप्तीसाठी उपयुक्त ठरते.

वर्तमान जिनधर्म तीर्थाचे मूल कर्ता, परम भट्टारक महादेवाधिदेव श्री महावीर स्वामींची दिव्यध्वनी खिरली. त्या दिव्यध्वनीला गौतम गणधरांनी बारा अंगांमध्ये निबद्ध केले. त्यापैकी बाराव्या दृष्टिवाद अंगाचे पाच भेद आहेत.- परिकर्म, सूत्र, प्रथमानुयोग, पूर्ववत आणि चुलिका.

दृष्टिवाद अंगाच्या तृतीय प्रथमानुयोग भागामध्ये ५००० पदांच्या द्वारे पुराण ग्रंथाचे वर्णन केले आहे.

**बारस विहं पुराणं, जग दिठ्ठा जिनवरेहिं सव्वेहिं।**
**तं सव्वं वण्णेदी हु, जिनवंसे रायवंसे य।।**

गाथार्थ - जिनेन्द्र भगवंतांनी बारा प्रकाराच्या पुराणांचा उपदेश दिला आहे. भगवंतांनी या सर्व पुराणांमध्ये जिनवंश आणि राजवंशाचे वर्णन केले आहे.

ह्या बारा पुराणांची नावे अशी आहेत.
१) अरिहंत अर्थात तीर्थंकर पुराण
२) चक्रवर्ती पुराण
३) विद्याधर पुराण
४) नारायण प्रति नारायण पुराण
५) चारणवृद्धिधारी पुराण
६) प्रज्ञाश्रमण वंश वर्णन पुराण
७) कुरुवंश पुराण
८) हरिवंश पुराण
९) काश्यप वंश पुराण
१०) इश्वाकुवंश पुराण
११) वादींच्या वंशाचे वर्णन करणारे पुराण
१२) नाथवंश पुराण म्हणजेच प्रथमानुयोगात ६३ शलाकापुरुष आणि १६८ महापुरुषांच्या जीवन कथांचा समावेश आहे. १६८ पुण्यपुरुषांमध्ये २४ तीर्थंकर, २४ तीर्थंकर पिता, २४ तीर्थंकर माता, २४ कामदेव, नऊ नारायण, नऊ प्रतिनारायण, नऊ बलभद्र, नऊ नारद आणि अकरा रुद्र यांचा समावेश होतो. यांचे चरित्र कथन म्हणजे प्रथमानुयोग होय.

**प्रथमानुयोगाचे लक्षण –**

रत्नकरंड श्रावकाचार ह्या ग्रंथात सर्वप्रथम आचार्य समंतभद्र यांनी प्रथमानुयोगाचे वर्णन केले आहे.

**प्रथमानुयोगमर्थाख्यानं चरितं पुराणमपि पुण्यम्।**
**बोधिसमाधिनिधानं बोधति बोध: समिचीनं।।**

प्रथमानुयोगात धर्म अर्थ काम आणि मोक्ष या चार पुरुषार्थांचे वर्णन केले आहे. त्यामध्ये धर्माचे, धर्माच्या फलाचे, पंचेद्रियांच्या विषयापासून

निवृत्ती म्हणजे संयम आणि त्याच्या माध्यमातून संसाराच्या दुःखापासून निवृत्ती म्हणजेच मोक्षाची प्राप्ती याचे वर्णन, चरित्र आणि कथा, पुराण यांच्या माध्यमातून केले आहे. ६३ शलाका पुरुषांच्या पुण्यकथा त्यात वर्णिल्या आहेत. म्हणून त्याला पुराण म्हटले जाते. ह्यात बोधी म्हणजे सम्यग्दर्शन आणि बोधीच्या माध्यमातून रत्नत्रयाच्या उत्पत्तीचे आणि पूर्णतेचे म्हणजे समाधीचे वर्णन आहे.

प्रथमानुयोगाचे कथन करणारा वक्ता आणि श्रवण करणारा श्रोता या दोघांनाही पुण्य प्राप्त होते आणि पुण्यवान पुरुषांच्या भक्तीला कारणीभूत आहे; म्हणून प्रथमानुयोग पुण्यरूप आहे.

प्रथमानुयोगात संसाराची विचित्रता, पाप-पुण्याचे फळ, महान पुरुषांचे चारित्र्य पालन इत्यादीचे वर्णन केले जाते. यातून संसारी जीवांना धर्मामध्ये स्थिर करण्याचा प्रयत्न केला जातो. जे जडबुद्धी जीव खूप सूक्ष्म आणि क्लिष्ट धार्मिक विवेचन जाणू शकत नाहीत, ते लौकिक कथा जाणू शकतात. प्रथमानुयोगात मोठमोठ्या राज्यांच्या विविध कथा, पुराण, आख्यायिका यांचे विवेचन असते. मनोरंजन करणाऱ्या गोष्टींचाही त्यात समावेश असतो. राजाच्या पापकारक वृत्ती बरोबरच त्यांच्या धर्माचरणाचे ही त्यात वर्णन असते. प्रथमानुयोगाच्या अध्ययनाने पापाला वाईट आणि पुण्याला, धर्माला सुकर्म मानले जाते. अशा प्रकारे सर्वसाधारण लोकांना समजाविण्याचा, धर्मात रुची उत्पन्न करण्याचा, प्रयत्न प्रथमानुयोगात केला गेला आहे.

१६८ महापुरुषांच्या जीवनकथा सामान्य माणसातल्या सुप्त चैतन्य शक्तीला आणि पुरुषार्थाला आकार देतात. रंजीत अतिरंजीत कथा यांच्या माध्यमातून पापभ्रष्ट लोकांमध्ये धर्माविषयीचा अनुराग उत्पन्न करणे, हे प्रथमानुयोगाचे महान कार्य आहे.

प्रथमानुयोगाचे साहित्य निरूपणात्मक आहे. ह्या सर्व कथा पुण्यतत्त्व ठसविण्यासाठी सांगितल्या गेल्या आहेत. पुण्याचे उत्तम फळ आणि पापाचे कुफळ कथन करणाऱ्या ह्या कथा आहेत. ६३ शलाका पुरुषांचे जीवन ही उत्कृष्ट कथा बीजे आहेत.

ही चरित्रे मानवाला उत्क्रांतीचा, ध्येयाचा मार्ग दाखवितात. मानवी जीवन पुनीत, पावन, सुखकर होण्यासाठी ही चरित्रे मानवाला मार्गदर्शक ठरतात. यांच्या अध्ययनाने मानवी विचारात नव्या शक्तीचा, चेतनेचा, दिशाबोधाचा, नव्या प्रेरणेचा अधिकाधिक सात्त्विक प्रवृत्तीने जगण्याचा, तप, त्याग पूर्ण जीवन आचरण्यातच मानवी जीवनाची सार्थकता आहे. या विचारसरणीचा उद्भव होतो, म्हणूनच सर्वप्रथम प्रथमानुयोगाचा अभ्यास करण्याचा परिपाठ आहे. प्रथम म्हणजेच अनुत्पन्न मिथादृष्टी होय. त्या विषयाचा अनुयोग तो प्रथमानुयोग होय.

प्रथमानुयोग- **प्रथमं मिथ्यादृष्टीमविरतिकम व्युत्पन्नं वा प्रतिपाद्यमाश्रित्य प्रवृत्तोऽनुयोगोऽधिकारः प्रथमानुयोगः।** असे गोमटसार जीवकांडमध्ये प्रतिपादित केले आहे.

**प्रथमानुयोगातील पद्धतीची विशेषता-**

प्रथमानुयोगात अलंकारशास्त्र आणि काव्यशास्त्र ही पद्धती प्रमुख असून वाचकांचे मनोरंजन करणे हा त्यांचा प्रधान हेतू असतो. हे मनोरंजन अलंकार आदीकांच्या साहाय्याने करणे सुलभ होते. एखादी गोष्ट सहजपणे सांगण्यापेक्षा अलंकारांनी रंगवून सांगितली तर वाचकांच्या मनावर त्वरित बिंबविले जाते. धर्माचरणापासून दूर राहून पापाचरणात मग्न असणाऱ्या जीवांना धर्मात स्थित करण्यासाठी प्रथमानुयोगात काव्यशैली, भाषाशैली, अलंकार यांचा वापर केला जातो. जैन साहित्यातील सौंदर्य अनुभवण्यासाठी प्रथमानुयोगाचा अभ्यास करावा लागतो.

सर्व बुद्धीच्या जीवांशी सुसंवाद स्थापन करण्याचे कार्य प्रथमानुयोग करतो. आत्म्यामध्ये करुणा, अनुकंपा रूप पायाभूत संवेदनशीलता निर्माण करण्याचा प्रयत्न करतो. कथा रंगतदार बनविण्यासाठी लालित्य, प्रसाद, ओज, तेज हे भाषेचे सगळे गुणधर्म प्रगट होतात.

# जैन धरोहर की रक्षा : आचार्य शान्तिसागर फौंडेशन का प्रसिद्धिपराङ्मुख, लेकिन शक्तिशाली योगदान

भारतभर में जैन मंदिरों और ग्रंथ भंडारों में सदियों पुरानी पाण्डुलिपियां संरक्षित हैं । ये तीर्थंकरों की शिक्षाओं की, आचार्यों की टिप्पणियों की और गहरे आध्यात्मिक ज्ञान की वाहक हैं। ये पाण्डुलिपियां, जो भक्ति के साथ हाथ से लिखी और सजाई गई हैं, समय के साथ घिस चुकी हैं, लेकिन इनका महत्त्व आज भी बरकरार है। पर अब ये समय के खिलाफ जंग लड़ रही हैं । उपेक्षा, पर्यावरण के नुकसान और पुरानी गलत मरम्मत की वजह से खतरे में हैं।

यहीं पर आचार्य शांतिसागर फाउंडेशन (ASSF) अपनी शांत, वैज्ञानिक और भक्ति भरी सेवा के साथ सामने आता है।

**आचार्य शांतिसागर फौंडेशन(ASSF) का परिचय–**

सन २०१९ में शुरू हुआ ASSF एक रजिस्टर्ड नॉन–प्रॉफिट ट्रस्ट है, जो जैन धरोहर को सुरक्षित रखने और जैन समाज को आगे बढ़ाने के लिए काम करता है। हमारा उद्देश्य है कि जैन संस्कृति–चाहे वो साहित्य हो, वास्तुकला हो या आध्यात्मिक ज्ञान हो। एक जीवंत परंपरा है, जिसे सिर्फ याद नहीं, बल्कि संरक्षित और नूतनीकरण करने की जरूरत है।

**हमारे तीन मुख्य प्रकल्प–**

**१. पाण्डुलिपियां और कलाकृतियों की सुरक्षा :** पुरानी जैन पाण्डुलिपियां, पेंटिंग्स और इलस्ट्रेशन्स को वैज्ञानिक और रिवर्सिबल तरीकों से सुरक्षित करना।

**२. स्वावलंबन योजना :** जैन समाज के युवाओं और महिलाओं के लिए वोकेशनल ट्रेनिंग और स्किल डेवलपमेंट।

**३. मंदिर रेस्टोरेशन :** पुराने जैन मंदिरों और मठों की मरम्मत करना और उन्हें पुनर्स्थापित करना।

इनमें से पाण्डुलिपियों का संरक्षण आज सबसे अहम् चुनौती है। भारत में हजारों पवित्र जैन ग्रंथ/पोथियां खराब हो रहे हैं। अगर अब इन्हें नहीं बचाया जाएगा, तो ये हमेशा के लिए नष्ट हो सकते हैं।

**कुंभोज–बाहुबली : एक ऐतिहासिक शुरुआत**

हमारा पहला बड़ा कंजर्वेशन प्रोजेक्ट कुंभोज–बाहुबलीस्थित श्री कुंदकुंद सिद्धांत भवन, अनेकांत शोधपीठ में दो वर्ष पूर्व शुरू हुआ। यहां **१२०० से ज्यादा पाण्डुलिपियां और १,०६,००० से ज्यादा फोलियो** थे, जिनमें से कई सदियों पुराने और बहुत नाजुक हालात में थे।

इन पाण्डुलिपियों की निम्नलिखित समस्याएं थीं :

१–प्लास्टिक लेमिनेशन

२–फंगल इन्फेक्शन

३–पिगमेंट खराब होना

४–सेलो टेप से हुई मरम्मत

५–फटे या कमजोर फोलियो

ASSF की प्रशिक्षण प्राप्त कंजर्वेटर टीम ने ग्लोबल टेक्निक्स और आर्काइवल–ग्रेड मटेरियल्स का इस्तेमाल करके हर फोलियो को पूरी हिफाज़त से ठीक किया, जैसे–

१–पेज साफ किए और फ्लैट किए।

२–पुराने ग्लू और लेमिनेशन हटाए।

३–नाजुक पिगमेंट्स को स्टेबल किया।

४–जापानी टिश्यू से फटे हिस्सों को ठीक किया।

५–हर पाण्डुलिपि को कैटलॉग और बॉक्स में रखा।

६–हाई–रिजॉल्यूशन डिजिटाइजेशन शुरू किया (जारी है)।

यह प्रोजेक्ट सिर्फ टेक्निकल नहीं, बल्कि आध्यात्मिक भी था। **भूले हुए ज्ञान को फिर से जीवित करना और सदियों की साधना का सम्मान करना।**

**वर्तमान प्रोजेक्ट : श्री महावीर ब्रह्मचर्याश्रम (जैन गुरुकुल), कारंजा–लाड(महाराष्ट्र)**

कुंभोज–बाहुबली के काम में सफलता के बाद, फाउंडेशन ने श्री महावीर ब्रह्मचर्याश्रम जैन ग्रंथ भंडार, कारंजा–लाड में गत एक वर्ष से काम शुरू किया है । यहां पर पाम–लीफ और पुराने हैंडमेड पेपर पाण्डुलिपियों का अनमोल संग्रह है, कुछ ३०० साल से ज्यादा पुराने।

**यहां नई चुनौतियां थीं:**

१–टाइट प्लास्टिक शीट्स हटाना बिना पिगमेंट खराब किए

२–पानी के दाग या फंगस से प्रभावित पाण्डुलिपियों को साफ करना

३–टूटी सिलाई वाले नाजुक फोलियो ठीक करना

४–पेंटिंग्स से पिगमेंट फ्लेक्स उठाना और फिर लगाना

५–नाजुक चीजों को कम से कम हैंडलिंग के साथ डिजिटाइज करना आदि।

यह साइट अब कंजर्वेशन इंटर्न्स के लिए ट्रेनिंग ग्राउंड भी है। सीनियर विशेषज्ञों के मार्गदर्शन में, युवा तंत्रज्ञ पुराने पाण्डुलिपियों के संरक्षण के तंत्र और मंत्र सीख रहे हैं।

**आनेवाला प्रोजेक्ट–**

जल्द ही श्री मूलसंघ चंद्रनाथ स्वामी दि. जैन बालात्कार मंदिर, कारंजा–लाड में अगला बड़ा प्रोजेक्ट शुरू होगा। यहां पर है–

**१२०० से ज्यादा पेपर मैनुस्क्रिप्ट्स (१,१०,००० फोलियो)**

**५४ पाम–लीफ मैनुस्क्रिप्ट्स (२६०० फोलियो)**

**३० लेमिनेटेड पेंटिंग्स**

कई कागज़ोंपर प्लास्टिक लेमिनेशन है, जो अब पिगमेंट और पेपर को नुकसान पहुंचा रहा है। सेलो टेप और एसिडिक ग्लू ने भी हालत खराब की है। अगर प्रक्रिया जल्दी शुरू नहीं की जाती, तो नुकसान हमेशा के लिए हो सकता है।

ASSF ने **१६ महीने का कंजर्वेशन और डिजिटाइजेशन प्लान बनाया है :**

१–१४ कंजर्वेशन प्रोफेशनल्स की टीम

२–रोजाना निश्चित लक्ष्य

३–फेज–वाइज एक्जीक्यूशन

४–सुरक्षित, एथिकल और रिवर्सिबल मेथड्स

५–डिटेल्ड डॉक्यूमेंटेशन, मेटाडेटा और आर्काइवल बॉक्सिंग

**यह इस प्रदेश का सबसे बड़ा जैन पाण्डुलिपि संरक्षण–संवर्धन प्रकल्प होगा।** चुनौतियां जो रास्ते में आती हैं । पुरानी जैन पाण्डुलिपियोंको बचाना आसान नहीं। ये हैं कुछ बड़ी चुनौतियां :

**पिगमेंट डिटैचमेंट–** नेचुरल पिगमेंट्स (जैसे लैंप ब्लैक, वर्मिलियन, इंडिगो) हल्के टच से भी उड़ सकते हैं।

**प्लास्टिक लेमिनेशन–** ये नमी फंसाता है, पेपर को टेढ़ा करता है और पिगमेंट को चिपकाकर फाड़ देता है।

**पुरानी मरम्मत–** सेलो टेप, ग्लू या नायलॉन धागों से दीर्घकालिक नुकसान।

**पर्यावरण का असर–** फंगस, कीड़े और पानी के दाग।

**कॉम्प्लेक्स मीडिया–** कुछ पाण्डुलिपियां में कपड़ा और कागज़ दोनों का इस्तेमाल हुआ हैं, जिनपर विशेष प्रक्रिया करनी पड़ती है।

हर फोलियो को उसकी स्थिति के अनुसार कस्टम केयर चाहिए। कुछ प्रक्रिया में एक पेज के लिए कई घंटे लगते हैं, वो भी मैग्निफाइंग लैंप और प्रिसीजन टूल्स के साथ।

**मान्यवर लोगों का समर्थन एवं प्रेरणा–**

कुंभोज–बाहुबली और कारंजा में हमारे काम को कई जैन संतों, मंदिर महंतों, ट्रस्टीज, इतिहासकारों और कंजर्वेशन प्रोफेशनल्स ने देखा है और आशीर्वाद दिया है। उनके शब्द प्रेरणादायक हैं :

'ये सिर्फ प्रिजर्वेशन नहीं, पुण्य कार्य है। हर फोलियो जो ठीक होता है, वो **एक वचन आगम को सुरक्षित करता है।**'



– कुंभोज–बाहुबली में आए आचार्य विशुद्धसागरजी

'ये कार्य मूक है, अप्रसिद्ध है, पर बड़े–बड़े नारों से ज्यादा टिकेगा। आप वो बचा रहे हैं, जो कोई और नहीं कर सकता।'

– महाराष्ट्र के कल्चरल स्कॉलर

'हर कागज़ एक कहानी कहती है। आप सिर्फ कागज़ की सुरक्षा नही कर रहे हैं, शास्त्र, भक्ति और ज्ञान को चिरस्थाई बना रहे हैं।'

– कारंजा के जैन मंदिर ट्रस्टी

**ASSF की आवाज –**

'हमारी जैन पाण्डुलिपियां सिर्फ ऐतिहासिक विरासत नहीं हैं, ये सत्य, भक्ति और अनुशासन की जीवंत अभिव्यक्ति हैं। इन्हें खोना मतलब खुद का एक हिस्सा खोना है। कंजर्वेशन लग्जरी नहीं, हमारा कर्तव्य है।'

– श्री अनिल सेठी, प्रेसिडेंट, ASSF

'हर मैनुस्क्रिप्ट जो हम रीस्टोर करते हैं, वो जैन परंपरा का साइलेंट रिवाइवल है। काम शांत है, लेकिन इसका असर पीढ़ियों तक गूंजेगा।'

– श्री विनोद दोड्डनावार, ट्रस्टी, ASSF

'हम इस काम को सेवा मानते हैं। हमारे धरोहर की आत्मा की सेवा। हर फोलियो जो ठीक होता है, वो एक आगम वचन सुरक्षित करता है।'

**ASSF ट्रस्टीज का सामूहिक बयान –**

**साथ मिलकर काम करने का अनुरोध**

ASSF में हम इस पवित्र जिम्मेदारी के लिए समर्पित हैं । सिर्फ साधनों से और ट्रेनिंग से नहीं, बल्कि **श्रद्धा और संकल्प के साथ!** हमारा संकल्प है कि जैन श्रुत भंडार







धूल में दबे ना रहे या समय के साथ खो न जाए, बल्कि संरक्षित, सम्मानित और साझा किया जाए।

हम मंदिर ट्रस्ट्स, जैन मठों को, विद्वानों को, विशेषज्ञों को, शोधकर्ताओं को और पूरे समाज को इस महान कार्य में जुड़ने के लिए आमंत्रित करते हैं । को लैबोरेशन, आर्थिक-सामाजिक सहयोग और आशीर्वाद के जरिए। क्योंकि **जब हम एक पाण्डुलिपि बचाते हैं, तो एक संदेश बचाते हैं। जब हम एक फोलियोकी सुरक्षा करते हैं, तो एक दर्शन को बचाते हैं। और जब हम अपनी विरासत एवं परम्परा को बचाते हैं, तो हम स्वयं के अस्तित्वकी सुरक्षा करते हैं।** अगर आप ASSF के काम में सहयोग करना चाहते हैं, तो कृपया हमारे ऑफिशियल चैनल्स से संपर्क करें।

– **अनिल सेठी,** प्रेसिडेंट, आचार्य शांतिसागर फौंडेशन

---

**आचार्य कुंदकुंद जैन संस्कृति सेन्टर, पोन्नूरमलै एवं श्री कुन्दकुन्द-कहान पारमार्थिक ट्रस्ट, मुम्बई द्वारा संचालित**
**जिनवाणी संवर्द्धन केन्द्र**

## आत्मकल्याण की ओर एक पवित्र यात्रा

**जिनवाणी का महत्त्व –**

जिनवाणी अर्थात् वीतराग-सर्वज्ञ तीर्थंकर भगवान की दिव्य वाणी। यह वह अमृतरूपी वाणी है जो संसार में भटकते जीवों को मोक्षसुख प्रदान करने हेतु प्रकट होती है। तीर्थंकर प्रभु की दिव्यध्वनि से जो जिनवाणी प्रकट होती है, उसका असंख्यातवां भाग ही गणधरदेव ग्रहण करते हैं, और वह भी जितना अपने शिष्यों को बताते हैं, उसका भी असंख्यातवां भाग उनके शिष्य ही ग्रहण कर पाते हैं। समय के साथ-साथ यह जिनवाणी लुप्त हो रही है। अवसर्पिणी काल में बुद्धि, आयु, शक्ति आदि का भी ह्रास होता गया। ऐसे में आचार्य धरसेन को जिनवाणी को लिपिबद्ध करने की भावना हुई। उन्होंने मुनिराज पुष्पदंत एवं भूतबली को षट्खण्डागम का उपदेश दिया। ज्येष्ठ शुक्ल पंचमी के दिन इस ग्रंथ की रचना पूर्ण हुई और तभी से श्रुतपंचमी महापर्व मनाया जाने लगा।

**प्राचीन आचार्यों और श्रावकों का योगदान –**

कालांतर में अनेक आचार्यों ने जिनशास्त्रों को ताड़पत्रों पर लिपिबद्ध किया, जिससे यह ज्ञान आज तक सुरक्षित रह सका। उन आचार्यों के साथ-साथ उन श्रावकों का भी विशेष योगदान रहा जिन्होंने शास्त्रों की वनस्पति अर्क से रक्षा की, प्रतिलिपियाँ तैयार कीं, और उन्हें अगली पीढ़ी तक पहुँचाया। उनके अथक प्रयासों से हम आज जिनवाणी का अध्ययन कर आत्मकल्याण की ओर बढ़ पा रहे हैं।

**जिनवाणी संवर्द्धन केन्द्र, पोन्नूरमलै में संचालन –**

इसी पावन परंपरा को आगे बढ़ाते हुए, श्री कुन्दकुन्द-कहान पारमार्थिक ट्रस्ट, मुम्बई द्वारा पोन्नूरमलै में जिनवाणी

संवर्द्धन केन्द्र का संचालन किया जा रहा है। यह स्थान आचार्य कुन्दकुन्द की तपोभूमि भी है, जिससे इसका महत्त्व और भी बढ़ जाता है।

यहाँ भारत के विभिन्न राज्यों के गांव-गांव से जिनमंदिरों में सुरक्षित जिनवाणी को विनयपूर्वक लाया जाता है। मयूरपंख से जीवदया का ध्यान रखते हुए प्रत्येक पत्र को सावधानी से स्वच्छ किया जाता है। ताड़पत्रों को क्रमबद्ध कर उच्च गुणवत्ता(High Resolution) में स्कैन किया जाता है।

पारंपरिक वनस्पति अर्क से उनकी संरक्षण प्रक्रिया की जाती है। तमिलनाडु में पोन्नूरमलै के निकटवर्ती अनेक ग्रामों के तथा कर्नाटक में बैंगलोर के निकटवर्ती कुछ ग्रामों के माननीय ट्रस्टीगणों के भी समर्पण से उन ग्रामों के जिनमंदिरों में विराजमान अनेक ताड़पत्र एवं हस्तलिखित प्राचीन ग्रंथों का डिजिटलीकरण (Digitiliazation) एवं संरक्षण कार्य सफलतापूर्वक सम्पन्न होने के पश्चात अब महाराष्ट्र की धार्मिक नगरी कारंजा (लाड), जिसे जैनों की काशी कहा जाता है । यहाँ के जिनमंदिरों में विराजमान प्राचीन ताड़पत्र एवं हस्तलिखित ग्रंथों का डिजिटलीकरण (Digitiliazation) कार्य प्रगति पर है। भविष्य में यह अभियान भारत के अन्य राज्यों के जिनमंदिरों तक भी पहुँचेगा।

**डिजिटल डेटा संग्रहण और पुनः प्रतिष्ठापन–**

स्कैन किए गए ग्रंथों के विषय, रचनाकार, टीकाकार, लिपि, भाषा, रचना का समय एवं स्थान आदि जानकारियाँ विशेषज्ञों की सहायता से एकत्र की जाती हैं। इन विवरणों के साथ जिनवाणी को नवीन शुद्ध वस्त्र में सुरक्षित रख, उसी जिनमंदिर में ससम्मान पुनः प्रतिष्ठित किया जाता है, जहाँ से वह लायी गई थी।

यह समस्त कार्य श्री कुन्दकुन्द-कहान पारमार्थिक ट्रस्ट, मुम्बई ट्रस्ट के निर्देशन में श्री विजयभाई शाह और ट्रस्ट की समर्पित टीम द्वारा अत्यंत श्रद्धा व सावधानीपूर्वक संपन्न किया जाता है।



**वेबसाइट पर ताड़पत्र एवं हस्तलिखित शास्त्रों की सहज उपलब्धता :–**

ताड़पत्र एवं हस्तलिखित जिनवाणी का ये सारा डाटा हमारी वेबसाइट Vitragelibrary.org पर PDF Format में अपलोड किया जाता है। Vitrag e-library Website पर Manuscrits के अलावा अनेक प्रकाशित धार्मिक शास्त्र तथा अनेक संस्थाओं से प्रतिमाह प्रकाशित होने वाली मासिक पत्रिकाएं भी पढ़ सकते है, तथा अनेक भक्ति, पाठ, स्तोत्र आदि भी सुन सकते है।

**अप्रकाशित ग्रंथों का संशोधन और प्रकाशन–**

श्री कुन्दकुन्द-कहान पारमार्थिक ट्रस्ट द्वारा पं. जम्बूकुमारजी शास्त्री चेन्नई, डॉ. एन. सुरेशकुमारजी मैसूर, डॉ. राकेशजी शास्त्री नागपुर, पं. शिखरचंदजी शास्त्री सागर, डॉ. संजयजी शास्त्री दौसा, पं. आलोकजी शास्त्री कारंजा, पं. चिंतामनजी शास्त्री, कारंजा आदि विशेषज्ञ विद्वानों की सहायता से प्राचीन अप्रकाशित शास्त्रों को भी संशोधित कर प्रकाशित करने का कार्य सतत जारी है। विशेष रूप से तीन महत्त्वपूर्ण आगम ग्रंथों की अप्रकाशित टीकाओं सहित प्रस्तुति शीघ्र ही की जाएगी।

**उद्देश्य : आत्मकल्याण एवं ज्ञान की सुरक्षा**

इस पवित्र प्रयास का उद्देश्य केवल आत्मकल्याण है। जैसे पूर्वज श्रावकों ने जिनवाणी की रक्षा कर हमें यह अमूल्य निधि सौंपी है, वैसे ही अब यह हमारी जिम्मेदारी है कि हम जिनवाणी का अध्ययन कर, आचरण में उतारें और साथ ही इसे वैसी ही निर्दोष व सुरक्षित स्वरूप में भावी पीढ़ियों तक पहुँचाएँ। इसी में हमारी श्रद्धा है, सेवा है, और आत्मकल्याण का मार्ग भी।

– आचार्य कुन्दकुन्द जैन संस्कृति सेन्टर, पोन्नूरमलै एवं
श्री कुन्दकुन्द-कहान पारमार्थिक ट्रस्ट, मुम्बई परिवार

**सम्पर्क सूत्र –**

श्री. राजीवजी जैन, पोन्नूरमलै ९९७६९७५०७४
पं. सम्भव जैन शास्त्री, पोन्नूरमलै ८३०२८४७२१६



धर्म हे जीवनाचे महत्त्वपूर्ण अंग आहे. धर्म जीवनाचे नियमन करणारी प्रभावी शक्ती असते. साहित्यावरही या धर्ममूल्यांचा प्रभाव हा प्राचीन काळापासून आहे. साहित्यातही धर्मच असतो. ललित साहित्यातही धर्मदृष्टीच प्रधान असते.

**हितेन सहितं यत् तत् साहित्यम्–** जे हितकारक असते ते साहित्य.

प्रथमानुयोगामध्ये मूळ कथा जशी असेल तसेच वर्णन असते. प्रसंगानुसार त्यात इतर वर्णन येते. कधी तपशीलातही थोडा फरक पडत जातो. ग्रंथकर्त्याच्या विचारसरणीचा देखील साहित्यावर प्रभाव पडतो. परंतु सद्बुद्धीचे उन्नयन हे प्रयोजन मात्र कायम असते.

अलौकिक प्रतिभेचे, कल्पकतेचे अद्वितीय धनी असलेल्या पूज्य जिनसेन आचार्यांनी महापुराणाची रचना केली आणि आदिनाथ भगवंतासह ईक्ष्वाकुवंशाचे वर्णन केले आहे. आचार्य जिनसेन महापुराणात साहित्यासंबंधी महत्त्वपूर्ण विचार मांडतात.

**पुण्यानुबंधिनी या स्यात् कविता सैव शस्यते।**
**शेषा पापाश्रवा यैव सप्रयुक्तापि जायते।।**

साहित्य हे पुण्यपंथास कारणीभूत असावे. ते रचनेच्या दृष्टीने कितीही सुंदर असले तरीही ,जर पाप भावनेला चालना देत असेल तर ते साहित्य निरूपयोगी आणि अनर्थकारक होईल म्हणून साहित्यापासून मिळणारा आनंद सात्त्विक असावा.

प्रथमानुयोगाच्या माध्यमातून जैन संस्कार, तत्त्वज्ञान सर्वसामान्य जनांपर्यंत पोहोचविण्याची परंपरा सुरू आहे. जे काम तत्त्वज्ञानाचा ग्रंथ करू शकत नाही. ते संयम, त्याग, प्रेम, सत्य, अहिंसा इत्यादी मानवी मूल्यांची जपणूक आणि संवर्धन करण्याचे कार्य प्रथमानुयोग करतो. गोळी छोटीशी असते पण परिणाम दाखवते आणि रोग दूर करते.

मॅन मेकिंग लिटरेचर–

–माणूस घडविणारे साहित्य म्हणजे प्रथमानुयोग. पद्मपुराण, हरिवंशपुराण, चौबीसी पुराण, आदिपुराण, उत्तरपुराण, प्रद्युम्नचरित्र, श्रेणिक चरित्र, भरतेश वैभव ही काही उदाहरणे आहेत.

---

**विशेष वार्ता...** (पा. नं. १४ वरून)

अध्यापकांचा सत्कार करण्यात आला. त्यावेळी बा. ब्र. श्रीधर मगदूम अण्णा हे म्हणाले की, आपणच खरे धर्मरक्षक आहात. जीवनात येथे आपण जे शिकलात ते उतरवण्याचा प्रयत्न करा. धर्म, न्याय व नीतीने वागला तर कधीही दुःख मिळणार नाही. हे मानव जीवन धर्माच्या रक्षणासाठीच आहे. तसेच डॉ. स्वयंप्रभा पाटील, पं.सूरज पाटील यांची मनोगते झाली. शिबिरार्थींमध्ये श्री. रघुनाथ देसाई, चि. अभिनंदन पाटील यांचे मनोगत झाले. त्यानंतर पारितोषिक वितरण करण्यात आले. याप्रसंगी श्री ए. ए. खाडे , श्री. अनिल हिंगलजे, श्री. रवींद्र देसाई, श्री. अरुण चौगुले इत्यादी मान्यवर उपस्थित होते.

या संपूर्ण शिबिराचे सहसंयोजक म्हणून श्री बाबगोंडा पाटील यांनी केले. शेवटी आभार प्रदीप धोतरे यांनी मानले.

**पाळणागीत**

**(चाल - हले हा नंदाघरी पाळणा )**

**हले हा त्रिशला घरी पाळणा**
**त्यात देखणा गोजिरवाणा हसतो कुंडलपूर राणा ।।धृ.**

**गाल गोबरे चिमणी डोळे,**
**लाल ओठ ते डाळिंब दाणे**
**हास्य वदनी फुले माणिके, मोहून घेई मना ।।१।।**

**रत्नवृष्टी ही झाली भूवरी,**
**इंद्रादि देव येऊन खाली**
**सहस्र नेत्रे मूर्ती पाहूनी, हर्ष दाटे मना ।।२।।**

**स्फटिक शिलेवर आणूनी बालक,**
**सहस्र कलश करिती अभिषेक**
**गंधर्व किन्नर गुण हे गाती,आनंद दाटे मना ।।३।।**

**सिद्धार्थ त्रिशला करिती कौतुक**
**आनंदाचे अमाप ते सुख**
**महावीर हे नाव ठेवुनी,आनंद नाचे मना ।।४।।**

**–श्रीमती विजयमाला चंद्रकांत सोवितकर,** छ. संभाजीनगर

# करणानुयोग

**सौ. विजया अविनाश संगई,** अंजनगाव सुर्जी

जैन तत्त्वज्ञान चार अनुयोगात निबध्द आहे. अनादी-अनंत हे चिरकालीन सत्य प्रत्येक काळात ग्रहण करण्यायोग्य आहे! चिरनूतनतेचा वरदान लाभलेले हे तत्त्वज्ञान म्हणजे सर्व समस्यांचे समाधान आहे! जैन तत्त्वज्ञान शुष्क किंवा शाब्दिक तत्त्वज्ञान नसून जीवंत अक्षय ज्ञानस्रोत आहे! जीवनाला सुंदर बनविण्याची ती जीवनपद्धती आहे !

षट्खंडागमाचे ज्ञानप्रदायक परमपूज्य १०८ धरसेन आचार्य, रचनाकार आचार्य भूतबली, पुष्पदंत, धवला जयधवला आर्ष टीका ग्रंथ, गुणधर स्वामी रचित कषायपाहुड, हे ग्रंथ म्हणजे कर्म शास्त्राचे दीपस्तंभ आहेत! त्यांनी या पंचम काळाच्या काल तुफानातही अद्भुत अलौकिक, न विझणारा दीप प्रज्वलित केला, की जो कालजयी ठरला. या आचार्यांनी सजगतेने निर्ग्रंथतेची कठीण साधना करत असतानाच ग्रंथांना देखील दीप्तीमान केले ! साधनहीनता असतानाही भोजपत्राचा कागद बोरूचा पेन व नैसर्गिक शाई वापरून ही ज्ञानगंगा आम्हाला दिली. श्रुतपंचमी, ज्येष्ठ शुक्ल पंचमी ही तिथी, म्हणजे आमच्यासाठी केवळ श्रुतावतरणाचा दिवस नाही तर पुनर्चिंतनाचाही दिवस आहे ! ज्ञान शक्तीचा दिवस आहे ! अक्षर वाङ्मय हृदयस्थ करण्याचा दिवस आहे. आज आपण विचार करूया कारणानुयोगाचे महत्त्व काय आहे.

जैन कर्मशास्त्र एक शास्त्रशुद्ध, तार्किक, वैज्ञानिक व प्रत्यक्ष प्रमाणाने सिद्ध अशी पद्धती आहे. प्रत्येक जीवाचे पृथक् अस्तित्व आहे व तो आपल्याच सत्तात्मकतेने स्वयम् परिणमन करतो अनादिकालीन अज्ञानाने हा जीव विकार ग्रस्त व विभाव रूप परिणती करत आहे. पण याच जीवात सर्वोच्च परमात्मा पदाला पोहोचण्याची शक्ती पण विद्यमान आहे.

करणानुयोगात जीवाची व कर्माची विशेषता सांगितली आहे. जीव जसे परिणाम करतो त्याला त्याच समयात तशाच प्रकारचा कर्म बंध होतो व त्याचे फलही त्याला भोगावे लागते. ही एक न्याय संगत, नैसर्गिक प्रक्रिया आहे. ठोकळमानाने आम्ही हवाई जहाजाचे उदाहरण घेऊ शकतो. विमानात अनेक उपकरणे असतात. त्यात एक ब्लॅक बॉक्स असतो. त्यात सर्व प्रकारचे ध्वनी रेकॉर्ड होतात. विशेष हे की, बहुतांश दुर्घटना होताना हा ब्लॅक बॉक्स नष्ट होत नाही. सर्व रेकॉर्डिंग वरून प्रत्यक्ष काय घडले त्याचे अनुमान काढता येते. कर्माची पण अशीच स्वयंचलित स्वाभाविक प्रक्रिया आहे. आमच्या मन-वचन-कायेच्या प्रत्येक कार्याची रेकॉर्डिंग कर्माकडे विद्यमान आहे. थोडक्यात जीव आणि कर्म यांचा निमित्त-नैमित्तिक संबंध आहे. हेच परमपूज्य समंतभद्र आचार्य यांनी आपल्या रत्नकरंड श्रावकाचार या ग्रंथात लिहिले आहे.

**लोकालोकविभक्तेर्युगपरिवृत्तेश्चतुर्गतीनां च।**
**आदर्शमिव तथा मतिरवैति करणानुयोगं च।।**

करणानुयोग शब्दाचा अर्थ आहे, अगदी काटेकोरपणे गणितीय पद्धतीने परिणामांची शहानिशा करून कशाप्रकारे कर्मबंध होतो हे सांगणे. म्हणजे करणानुयोगात सूक्ष्मतेने व निर्णयात्मक कथन असते. पण बरेचदा असा विचार प्रवाह असतो की,कर्म हे तर पर आहे. गुणस्थान, मार्गणा, कर्माच्या प्रकृती, त्यांचे स्थिती, अनुभाग, प्रदेश बंध जाणून काय फायदा ? आमचे तर आत्मानुभूतीचे प्रयोजन आहे. त्यासाठी भक्ती, पूजा, जप, व्रत, दानादि महत्त्वपूर्ण आहे. व त्यांनीच जीवाचे कल्याण पण होते. मग त्याच गोष्टीचा उपदेश देणे व त्यातच रमणे हेच योग्य आहे. पण आज आपण इथे करणाणुयोगाची उपयोगिता जाणून घेणार आहोत.

(१) जेव्हा जीव गुणस्थान मार्गणा आदि तसेच कर्माचे उदय, सत्त्व, बंध, उदीरणा हे प्रकरण वाचतो व त्याचा अभ्यास करतो तेव्हा लक्षात येते की, कोणते परिणाम केले असताना कशाप्रकारे कर्मबंध होतो. उदाहरणार्थ– नरकायुच्या बंधाचे कारण सांगताना आचार्य उमास्वामी तत्त्वार्थसूत्र या ग्रंथात लिहितात की, बहु आरंभ व बहु परिग्रह (मूर्छा तीव्र आसक्ती) हे कारण आहे. सहजच जीव त्यापासून विमुख होतो व परिग्रह परिमाण कसे साधता येईल व आसक्ती कशी कमी होईल हे बघतो. म्हणजेच तीव्र कषाय कमी करून मंदकषायी बनतो. याचाच अर्थ तो अंतर्मुख बनतो. आत्म्याच्या निकट जातो.

(२) जेव्हा जिनेन्द्र कथित सूक्ष्म तत्त्वांचे काटेकोर विश्लेषण वाचतो तेव्हा जिनमताचा महिमा ज्ञात होतो. सर्वज्ञ प्रणित धर्म हा किती विशाल, व्यापक व सर्वव्यापी आहे हे समजल्याने जिनमताचा प्रगाढ श्रद्धांनी बनतो. व हेच तर सम्यग्दर्शन आहे. आत्मानुशासन या ग्रंथात आचार्य गुणभद्र स्वामींनी जे दहा प्रकारचे सम्यक्त्व सांगितले, त्यात एक सूत्र सम्यक्त्व आहे त्याचे कारणच कारणानुयोगाची ग्रंथसंपदा आहे.

(३) करणानुयोगाच्या अध्ययनाने बुद्धी तरल बनते. प्रथमतः हा ज्ञानी विषयांच्या स्थूल कथनाला जाणतो. परंतु पुढे उत्तरोत्तर करणानुयोगाचा अभ्यास करताना त्यातील सखोलता जाणवते, विशेषता प्रतीतीत येते. शिवाय 'हे असे का' या प्रश्नांची उत्तरे आगमात त्याला प्राप्त होतात. त्यावेळेस जैन तत्त्वज्ञानाविषयी आदर वृद्धिंगत होतो. उदा.– ज्या जीवाने नरकायू, तिर्यंचायू, मनुष्यायू यांचा बंध केला असेल तर तो व्रत नियम घेऊ शकत नाही हे सत्य त्याला कळते. तेव्हा श्रेणिक राजा व्रत ग्रहण कां करू शकला नाही? हे रहस्य त्याला कळतं. व आज आम्हाला जी सुविधा प्राप्त झाली आहे तर नक्कीच आम्ही जीवनात व्रत नियमांच्या चौकटीत राहायलाच हवे, हे अंतर्मनाला कुठेतरी जाणवतं. आणि हीच आहे करणानुयोगाची सार्थकता!

(४) जेव्हा करणानुयोगाच्या विषयात मन रमते, तेव्हा वेळेचं भान राहत नाही. भूक, तहान, दुःख, वेदना पण जाणवत नाही. आर्यिका परमपूज्य १०५ विज्ञानमती माताजी म्हणतात, जेव्हा करणानुयोगात २४ ठाण चर्चा चालते तेव्हा जेष्ठ वैशाखाचं ऊन पण जाणवत नाही. स्वास्थ्य चांगले नसले तरीही उपयोग एकाग्र होतो. वेदना विसरल्या जातात व समता भाव मनात येतो; म्हणून मी तर म्हणेन की करणानुयोग म्हणजे 'पेन किलर'प्रमाणे आहे .

शेवटी

**ये यजन्ते श्रुतं भक्त्या ते यजन्ते अञ्जसा जिनम्।**
**न किंचिदन्तरं प्राहुराप्ता हि श्रुतदेवयो:।।**

जे श्रुताची भक्तीपूर्वक पूजा करतात अर्थात् अध्ययन करतात, ते वस्तुतः आप्त तीर्थंकर ऋषभ देवांची पूजा करतात. कारण श्रुत व जिनेन्द्र भगवान यात काहीच अंतर नाही.

जे भव्य जीव द्रव्यानुयोगानुसार निज ज्ञायक आत्म्याचा आश्रय घेतात, त्याला करणानुयोगानुसार कर्माचे उपशमादि होतात व गुणस्थानांचे आरोहण करीत तो जीव सिद्ध पदाची प्राप्ती करतो. हीच आहे करणानुयोगाची उपयोगिता ! शेवटी ११२ कोटी ८३ लाख ५८ हजार ५ श्रुतपदांना कोटी कोटी वंदना..!!

---

## भद्र - भारती

**✻ हातातील चिमटा ज्याप्रमाणे नेमका इष्ट पदार्थ उचलून घेतो त्याप्रमाणे आपणास दुसऱ्याजवळील नेमके गुण तेवढे उचलता आले पाहिजे. असा गुणग्राही मनुष्यच स्वतः गुणी बनतो व दुसऱ्यालाही गुणी बनवितो. गुणविकासाचा हा राजमार्ग आहे.**

**✻ ध्येयवाद हीच जीवनाची खरी शक्ती आहे, ध्येयहीन जीवन हे खरे जीवन नसून ते एक प्रकारचे मरण होय.**

**- परम पूज्य गुरुदेवश्री समंतभद्र महाराज**

# चरणानुयोग

**अनुपमा नेगीसागर अंबुडकर,** डोंबिवली (पू)
मो. ९८११०७४४७३

पहलगामचे हत्याकांड मनात क्षोभ उत्पन्न करणारे आहे. किती ही अमानुषता? या युगाचे प्रथम धर्मप्रवर्तक भगवान ऋषभदेवांनी संसारी अवस्थेत सर्वप्रथम असि अर्थात तलवार, शस्त्र चालवण्याचे शिक्षण प्रजेला दिले. स्वसंरक्षण, समाजसंरक्षण, देश संरक्षण, धर्म संरक्षण करण्यासाठी जैन धर्मात विरोधी हिंसा सांगितली आहे. स्व संरक्षण केले तरच चारित्र्य संरक्षण होईल, आत्म्याचे संरक्षण होईल, अशी हिंसा ही अहिंसाच आहे. वर्तमानात सुद्धा self defence शिक्षण अत्यंत आवश्यक आहे.

ऋषभदेवांनी सर्वप्रथम उपजीविकेसाठी असि, मसि, कृषि, वाणिज्य, शिल्प आणि विद्या या षट् कार्याचे शिक्षण प्रजेला दिले. प्रजेला धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष पुरुषार्थ सांगितला, समाजाची संरचना केली आणि त्या नंतरच आत्मकल्याण करण्याचा उपदेश दिला. हाच उपदेश परंपरेने जैन आगामाच्या माध्यमातून आपल्या पर्यंत पोहोचविण्याचे महान कार्य अनेक आचार्यांनी केलेले आहे. आप्त म्हणजेच जिनेंद्र भगवंतांनी सूक्ष्मातील सूक्ष्म गोष्टींचा सुद्धा उपदेश केलेला आहे, गणधर स्वामींनी तो उपदेश शब्दात गुंफून समजावून सांगितला आणि मुनींनी तो उपदेश लिहिला, चिंतन करून चारित्र्यात उतरवला. जिनवाणीला चार अनुयोग रूपी म्हणतात. या अनुयोगांचे वर्णन श्रुतपंचमी पूजनाच्या जयमालेत असे वर्णन आहे–

**पुण्य कथा प्रथमानुयोग द्रव्यानुयोग ही तत्त्व प्रधान।**
**एक्सरे करणानुयोग चरणानुयोग कॅमेरा महान।।**

प्रथमानुयोगात ६३ शलाका पुरुषांच्या चारित्र्याचे चित्रण आहे. करणानुयोगात सुद्धा अशुभ भावांपासून विरक्त होऊन शुभ परिणामांमध्ये लीन होत कर्मशुद्धी करण्याचा मार्ग दाखवला आहे. इसवी सनाच्या प्रथम शताब्दीच्या प्रारंभी रचलेला ग्रंथाधिराज 'प्रवचनसार' आणि 'समयसार'! प्रवचनसाराच्या ज्ञानाधिकारामध्ये आद्याचार्य कुंदकुंद देवांनी ग्रंथारंभामध्येच 'चारित्र हाच निश्चयाने धर्म आहे' असे घोषित केले आहे. कुंदकुंदाचार्य चारित्राची परिभाषा करतात. –

**चारित्तं खलु धम्मो धम्मो जो सो समो त्ति णिद्दिट्ठो।**
**मोहक्खोहविहिणो परिणामो अप्पणो हु समो ।।७।।**

(प्रवचनसार)

अर्थात मोह (दर्शनमोह, मिथ्यात्व) आणि क्षोभ (चारित्रमोह, रागद्वेष) रहित आत्म्याच्या परिणामाला समय म्हणतात. हा साम्यभाव हेच चारित्र आहे, चारित्र हाच खरा निश्चय धर्म आहे, असे जिनेंद्र भागवनांनी निर्दिष्ट केले आहे.

'चारित्र पाहुड' मध्ये कुंदकुंदाचार्य व्याख्या करतात, 'आत्म्याचे श्रद्धान सम्यग्दर्शन' आहे, आत्मस्वरूप जाणणे, श्रद्धान करणे हे सम्यग्ज्ञान आहे आणि या दोहोंच्या अवलंबनाने कर्मबंधांचा नाश करून मोक्ष प्राप्ती करणे हेच सम्यक्चारित्र आहे. दुसऱ्या शताब्दीत आचार्य उमास्वामींनी तत्त्वार्थसूत्र ग्रंथात प्रथम सूत्र लिहिले आहे.

**सम्यग्दर्शनज्ञानचारित्राणि मोक्षमार्गः।।१।।**

द्रव्यानुयोगाच्या महत्त्वाच्या प्रामाणिक ग्रंथांमध्ये चारित्र्याला प्राधान्य आहे.

जिनेंद्र देवांनी चारित्र्य दोन प्रकारचे सांगितले आहे. सकल चारित्र म्हणजेच श्रमण अर्थात मुनींचे चारित्र आणि एकदेश चारित्र म्हणजे श्रावकांचे चारित्र, ज्या ग्रंथांमध्ये श्रमण किंवा श्रावक धर्माचे विवेचन असते तो चरणानुयोग आहे. मुनिधर्म सांगणारे मूलाचार, भगवती आराधना, रयणसार, ज्ञानार्णव, अनगार धर्मामृत इत्यादी महत्त्वाचे ग्रंथ आहेत आणि त्यामध्ये पाच महाव्रत, पाच इंद्रिय

विजय, गुप्ती, समिति, पंचाचार, मुनींच्या षट् आवश्यक क्रिया, तप, ध्यान, मूलगुण, उत्तर गुण, परिषह जय, दशधर्म इत्यादींचे अत्यंत विस्तारपूर्वक सूक्ष्मातिसूक्ष्म गोष्टींचे विवेचन या आगम ग्रंथांमध्ये आहे. मुनिचर्या अत्यंत कठोर परिश्रमाने साध्य होते.

अनादिकाळापासून ग्रहण केलेल्या मिथ्यात्व इत्यादींचा त्याग करून मुनिधर्म स्वीकारण्याची शक्ती आज सामान्य मनुष्यांमध्ये नाही आणि म्हणूनच सर्वज्ञ देवांनी श्रावकधर्म सुद्धा सांगितला आहे. 'रत्नकरंडक श्रावकाचार' हा आचार्य समंतभद्र स्वामींनी दुसऱ्या/तिसऱ्या शताब्दीत लिहिलेला श्रावक धर्माचे वर्णन सांगणारा पहिला प्रामाणिक ग्रंथ मानला जातो. पुरुषार्थ सिद्ध्युपायमध्ये सुद्धा दहाव्या शतकात आचार्य अमृतचंद्रांनी श्रावकाचाराचे विस्तारपूर्वक वर्णन अद्वितीय शैलीत केले आहे. वसुनंदी श्रावकाचार मध्ये सुद्धा विस्तारपूर्वक श्रावकाच्या आचरण पद्धतीचे अनुपम वर्णन आहे. सागार धर्मामृत इत्यादी श्रावकाचाराचे प्रमुख आगम ग्रंथ मानले जातात.

वर्तमान काळात आचार्य सुनीलसागर यांनी वसुनंदी श्रावकाचार प्राकृतमध्ये रूपांतरित केले आहे आणि त्याची हिंदी व्याख्या सुद्धा लिहिली आहे. वर्तमानातिल पूज्य आचार्य वसुनंदी यांनी 'विज्झावसुसावयायारो' नावाच्या प्रधान प्राकृत ग्रंथाची रचना केली आहे. आपले गुरु श्वेतपिच्छाचार्य विद्यानंदजी महाराजांचे व स्वतःचे नाव असलेल्या या अनुपम ग्रंथात वैज्ञानिक व मनोवैज्ञानिक तथ्य सांगणाऱ्या ४५३ प्राकृत गाथा हिंदी टीकेसह लिहिल्या आहेत. आधुनिक आचरण पद्धती लक्षात घेऊन शास्त्रोक्त विवेचन या ग्रंथांमध्ये आहे.

चरणानुयोगात वर्णीत ठळक गोष्टी संक्षेपाने नमूद करत आहे. सर्व प्रथम गृहस्थ धर्माचे वर्णन आहे. खऱ्या देव-शास्त्र-गुरुंवर श्रद्धा ठेवणाऱ्या सद्‌गृहस्थास श्रावक ही संज्ञा आगमात दिलेली आहे.

**देव-पूजा, गुरुपास्तिः, स्वाध्यायः संयमस्तपः ।**
**दानं चेति गृहस्थानां, षट् कर्माणि दिने दिने ।।७।।**

(पद्मनंदी पंचविशंति)

गृहस्थांनी देवपूजा, गुरू उपासना, स्वाध्याय, संयम, तप आणि दान या सहा आवश्यक क्रिया प्रतिदिन अवश्य कराव्यात असे आचार्य पद्मनंदी यांनी सांगितले आहे.

श्रावक नेहमी श्रद्धाळू, विवेकी आणि क्रियाशील (सदाचारी) असतो. श्रावकाचे अष्ट मूलगुण तीन प्रकारांनी सांगितले आहेत. मद्य-मांस-मध या तीन मकारांचा व पंच उदुंबर फळांचा त्याग पहिला प्रकार आहे. दुसऱ्या प्रकारात तीन मकारांचा त्याग व पाच अणुव्रतांचे पालन सांगितले आहे. तिसऱ्या प्रकारात तीन मकारांचा त्याग, पाच उदुंबर फळांचा त्याग, रात्री भोजन त्याग, देव दर्शन, जीवदया पालन, पाणी गाळून पिणे व पाच अणुव्रत पाळणे या गोष्टींचा समावेश आहे.

हिंसा, असत्य, चोरी, कुशील व परिग्रह या पाच पापांपासून निवृत्त होण्याचा संकल्प म्हणजे व्रत. अहिंसाणुव्रत, सत्याणुव्रत, अचौर्याणुव्रत, ब्रह्मचर्याणुव्रत, परिग्रह-परिमाणाणुव्रत हे पाच अणुव्रत आहेत. या व्रतांमध्ये दृढता आणण्यासाठी तीन दिग्व्रत, देशव्रत आणि अनर्थदंडव्रत हे गुणव्रत सांगितले आहेत. संसाराच्या बंधनापासून मुक्त होऊन मुनिधर्माचे शिक्षण घेण्याच्या हेतूने सामायिक, प्रोषधोपवास, भोगोपभोग परिणाम आणि अतिथि संविभाग असे चार शिक्षाव्रत सांगितले आहेत. श्रावकाच्या गुणांमध्ये उत्तरोत्तर विकास कण्याच्या हेतूने जी अकरा पदे सांगितलेली आहेत त्यांना श्रावकाच्या प्रतिमा म्हणतात. या प्रतिमा आजीवन ग्रहण करतात, सीमित काळासाठी नाही. श्रावकाच्या ५३ क्रिया, भक्ष्य-अभक्ष्य पदार्थ, ग्रहण करण्यायोग्य नियम, जाप करण्याचे मंत्र इत्यादींचे सुद्धा वर्णन चरणानुयोगात केलेले आहे.

श्रावकाचे तीन भेद केले आहेत. पाक्षिक श्रावक, नैष्ठिक श्रावक व साधक श्रावक, जे श्रावक जैन धर्मावर दृढ श्रद्धा ठेवण्याच्या पक्षाचे असतात ते पाक्षिक श्रावक आहेत. पाक्षिक श्रावक संकल्पपूर्वक

त्रस हिंसेचा त्याग करतो. अष्ट मूलगुण आणि अणुव्रतांचे अभ्यासपूर्वक पालन करतो, श्रावकाच्या षट् आवश्यक क्रियांमध्ये तत्पर असतो. नैष्ठिक श्रावक श्रद्धापूर्वक व्रत, सामायिक इत्यादी अकरा प्रतिमा ग्रहण करतो. १ ते ६ प्रतिमा धारण करणारा जघन्य श्रावक, ७ ते ९ प्रतिमाधारी मध्यम श्रावक आणि दहावी व अकरावी प्रतिमा धारण करणारा उत्तम श्रावक असतो. यांनाच क्षुल्लक व ऐलक म्हणतात. साधक श्रावक जीवनाच्या अंतसमयी शरीर इत्यादीवरील ममत्व सोडून कषाय व शरीर कृश करीत समाधीमरणाची साधना करतो.

गृहस्थ धर्म पाळल्यामुळे सुख, शांती, यश, धन इत्यादींची सुद्धा प्राप्ती होते. श्रावकाच्या बारा व्रतांचे पालन केल्याने व्यक्तीमध्ये आत्मबल विकसित होते आणि मुनिधर्म स्वीकारण्याची शक्ती प्राप्त होते. विषयभोगापासून विरक्त भाव उत्पन्न होण्यासाठी अनित्य, अशरण इत्यादी बारा भावनांचे चिंतन करतात. यामुळे व्रतात दृढता येते, शुभ ध्यानात वृद्धी येते. दर्शनविशुद्धी इत्यादी सोळा षोडशकारण भावनांचे चिंतन केल्यामुळे तीर्थंकर प्रकृतीचा बंध होऊ शकतो. अर्थात हा तीर्थंकर प्रकृतीचा बंध केवली किंवा श्रुतकेवली यांच्या चरणकमलामध्येच होतो. आत्म्याचा दुखदायी कर्ममल नाहीसा करण्यासाठी जैनधर्मात उत्तम क्षमादी दशलक्षण धर्म सांगितले आहेत. मोह व योगाच्या निमित्ताने जीवाच्या श्रद्धा व चारित्र गुणांच्या होणाऱ्या तारतम्य रूप अवस्थेला गुणस्थान म्हणतात. गुणस्थान जीवाची पर्याय आहे. मोह, राग, द्वेष यांचा अभाव धर्म पालन केल्याने होतो आणि आत्मविशुद्धी वाढवत वाढवत जीव क्रमाने चौदा गुणस्थान चढून मोक्षप्राप्ती करू शकतो.

जैनागमातील चरणानुयोगाचे स्वरूप अत्यंत विस्तृत आहे. 'परस्परोपग्रहो जीवानाम्', 'जगा आणि जगू द्या' हे जैन दर्शनातील महत्त्वाचे संदेश जीवाला संयम, समताभाव, भेदविज्ञान, अनेकांत सिद्धांत शिकवतात. या आचरण पद्धतीचा वर्तमानात प्रचार-प्रसार झाला पाहिजे. सम्यग्दर्शन-ज्ञान-चारित्र यांचे महत्त्व विश्वातील लोकांना समजले तर पहलगाम सारखे हत्याकांड होणार नाहीत, अराजकता नष्ट होईल. समतेचा संदेश जनामनात पोहोचला तर नक्कीच विश्वशांती निर्माण होईल.

## यशाचा व सफलतेचा मार्ग-

**जे काम प्रथम करणे जरूर आहे ते प्रथम करावे. जसे खेळावयाच्या आधी अभ्यास, सुखोपभोगाच्या आधी कर्तव्य, स्वतःच्या आधी दुसऱ्याचे. हा एक सर्वोत्कृष्ट नियम कुणालाही वाईट मार्गाने जाऊ देत नाही.**

**योग्यप्रकारे आरंभिलेले कार्य म्हणजे अर्धी अधिक सफलताच होय. विद्यार्थी अभ्यासात चुकारपणा करील तर अपयशी होईल, पैलवान खोट्या अभिमानाने आखाड्यात उतरेल तर फजीती पावेल. व्यापारी अपमार्गाने पैसा मिळवू पाहील तर पत गमावून बसेल. सत्यशोधक आपल्या कार्याची सुरवात अन्याय्य मार्गाने करील तर जनतेचा विश्वास संपादन करू शकणार नाही.**

**कोणतेही काम खऱ्या मार्गाने सुरू करणे म्हणजे निर्मल अंतःकरण, पवित्र विचार, खरी नेकी, निःस्वार्थी वृत्ती, उच्च उद्देश व साधनांची शुचिता ठेवून प्रयत्नास लागणे होय. आणि याप्रमाणे क्रम ठेवला तर आपले जीवन यशस्वी, सुंदर व कृतार्थ होईल.**

**स्वतःची सुप्त अगर गमावलेली शक्ती परत मिळविण्याचा हाच एक मार्ग होय. ज्याप्रमाणे मूळ पाया पक्का असेल तर इमारत पक्की व सुडौल होते त्याप्रमाणे कोणतेही काम उच्च ध्येय, सद्विचार व आत्मविश्वासाने सुरू होईल तर ते खात्रीने यशस्वी होईल.** (समंतभद्रायण,पृ.१७३)

**- परम पूज्य गुरुदेवश्री समंतभद्र महाराज**

# द्रव्यानुयोग

सौ. भारती खंडारे

**आत्मरूप है जाती तुम्हारी निज आत्माही है घर ।**
**आत्मज्ञान है धर्म तुम्हारा आतम ही है ईश्वर ।।**

जिनवाणी सर्व समस्यावरील समाधानाची एक अद्भुत जीवनकला आहे. जिनवाणी जीवनाचे सर्वप्रथम कर्म व सर्वप्रथम धर्म आहे. कारण जिनवाणीत प्रतिपादित तत्त्वज्ञान वस्तुदर्शन करण्याची एक अलौकिक तत्त्वदर्शी प्रयोगशाळा आहे. विशुद्ध मानस भूमीतच तत्त्वज्ञानाचा जन्म होतो. म्हणून जिनवाणीच आत्मशांतीचा सुनिश्चित विधाता आहे.

संपूर्ण जिनवाणी चार अनुयोगात निबद्ध आहे. प्रथमानुयोग, करणानुयोग, चरणानुयोग व द्रव्यानुयोग. नदी वस्तुत: एकच असते, पण मार्ग अनेक आहेत. त्याप्रमाणे अनुयोगाचे प्रकार भिन्न, पण आशय एकच आहे. पणतीतील ज्योत, समईची, कंदीलाची, मेणबत्तीची ज्योत वेगवेगळी आहे, पण प्रकाशाचा मूळ गाभा मात्र एकच असतो. त्याप्रमाणे प्रत्येक अनुयोगाची कथनाची शैली भिन्न भिन्न आहे, पण अभिप्राय एकच आहे. सर्व अनुयोगाचा अभिप्राय एकच - स्वची ओळख होणे व स्वचे ज्ञान होणे, वीतरागता-समताभाव जागृत होणे.

**द्रव्यानुयोगाचे स्वरूप–**

द्रव्यानुयोगात द्रव्ये व सात तत्त्वे यांचे प्रामुख्याने निरूपण केले जाते. जो जीव जीवादी तत्त्वे व द्रव्ये यांना ओळखतही नाही. त्यांना हेतु-दृष्टांतांद्वारे किंवा प्रमाण-नय याद्वारे तत्त्वाची प्रत्यक्ष प्रतीती करवितात. द्रव्यानुयोगात प्रामुख्याने निश्चयनयाचीच प्रधानता आहे. निश्चयनयाद्वारेच जीवादीक तत्त्वांचे यथार्थ श्रद्धान होते. जीवादीक वस्तू खरंतर अभेदरूप आहेत. तथापि त्या वस्तूंना भेद कल्पना करून व्यवहाराने द्रव्य-गुण-पर्यायांचे भेद निरूपण करतात. त्याची प्रचिती येण्यासाठी द्रव्यानुयोग अनेक युक्ती द्वारे उपदेश देतो.

**द्रव्यानुयोगाचे शास्त्र –**

पंचास्तिकाय, प्रवचनसार, समयसार, नियमसार, परमात्मप्रकाश, तत्त्वार्थसूत्र, सर्वार्थसिद्धी इत्यादी ग्रंथ द्रव्यानुयोग प्रधान शास्त्र आहेत. समयसार तर पथदर्शक असा ग्रंथाधिराज अद्वितीय चक्षुच आहे.

**द्रव्यानुयोगाचे प्रयोजन –**

जैन धर्म तर प्रत्येक द्रव्याची स्वतंत्रता व स्वाधीनतेचा संदेश देतो. त्यामुळे एक द्रव्य दुसऱ्या द्रव्यात काहीच चांगले किंवा वाईट करू शकत नाही, पण द्रव्यानुयोग पद्रव्यासोबतच आत्मा व रागादी भाव यात भेद-विज्ञान करण्याची शिकवण देतो. रागादी भाव ही जीवाचीच पर्याय आहे. पण ती पर आहे, हे समयसार सांगतो, कारण रागादिकाची व्याप्ती कर्माशी असल्यामुळे तो जीवाचा स्वभाव नाही.

अज्ञानी जीव वस्तुस्वभावाला जाणत नाही, म्हणून तो रागादीला आपले मानतो व त्याचा कर्ता होतो. द्रव्यानुयोग अज्ञानीला वस्तुस्वभावाचे ज्ञान करून देतो व रागादीचा कर्ता न होता ज्ञातादृष्टा बनण्याचा उपदेश देतो.

ज्ञानी जाणतो की आत्मा द्रव्यदृष्टीने स्वयं शुद्ध स्वभावी आहे व पर्याय दृष्टीने मात्र पर द्रव्य निमित्त असताना स्वयं रागादी विकार भावाने परिणामन घडते. पर्यायदृष्टीला गौणता व द्रव्यदृष्टीची प्रधानता हीच प्रमुख विशेषता द्रव्यानुयोगाची आहे. नाव पाण्यात असेल तर समुद्राच्या पार लागू शकते, पण नावेत पाणी असेल तर नाव डुबेलच. त्याप्रमाणे राग पर्यायात असताना त्याला दृष्टीत उपादेय मानले नाही तर आम्ही संसार समुद्र पार करू शकतो.

रागादीक विकार भावापासून परावृत होण्याची शिकवण फक्त द्रव्यानुयोगच देतो.

**द्रव्यानुयोगाची फलश्रुती –**

१) द्रव्यानुयोगाच्या अध्ययनाने अनादी अज्ञानता दूर होते.

२) अन्य मत कल्पित तत्त्वादीक मिथ्या भासित होते.

३) जिनमताची प्रतीती येते.

४) सतत अभ्यासाने शीघ्र तत्त्वज्ञानाची प्राप्ती होते.

५) सतत चिंतनाने रागादी विकार भाव कमी होतात किंवा पूर्णपणे नष्ट होतात.

६) शीघ्र मोक्षाची प्राप्ती होते.

७) भगवती प्रज्ञाद्वारेच आत्मा व विकार भावात भेद विज्ञान करता येते. रागादीक भावांचा त्याग व शुद्धात्म्याचे ग्रहण हीच आहे, द्रव्यानुयोगाच्या अध्ययनाची फलश्रुती; म्हणून सुखप्राप्तीसाठी द्रव्यानुयोगाचा निरंतर स्वाध्याय करावा. कोणत्याही यात्रेला जाण्यासाठी आपण अगोदरच रिझर्वेशन करतो. त्यासाठी अधिक पैसेही देतो. पूर्व तयारी पूर्ण शक्तीनिशी करतो. त्याप्रमाणे अनंतकालीन भावी जीवन यात्रेसाठी रिझर्वेशन करण्याची आणि पूर्वतयारी करण्याची आवश्यकता आहे. हे कार्य द्रव्यानुयोगाचे अध्ययन केल्यानेच होते. म्हणून चार अनुयोगात द्रव्यानुयोगाचे अनन्य असाधारण महत्व आहे. जे वर्तमान काळात सुखी-समाधानाने जगण्यास अत्यंत उपयुक्त आहे.

---

# आचार्य तारण स्वामी कृत ग्रन्थों में श्रुतविवेचना

**: शोधार्थी :**
**मीनाक्षी नवनीतलाल जैन,**
**चोपडा (महा.) ८८०५९७०४५७**

: मार्गदर्शक :
प्रो. धर्मचंद जैन
तीर्थंकर महावीर विश्वविद्यालय, मुरादाबाद

**जिनवर प्रभु की दिव्यध्वनि जो शुध्द बोध स्वरूप है,**
**स्याद्वाद से जो है अलंकृत शारदे श्रुत रुप है।**
**सिद्धांत गुण पर्याय चतु अनुयोग मय विस्तार है,**
**महिमा मयी जिनवाणी माँ को वंदना शत बार है।।**

आचार्यों की परम्परा में सोलहवीं शताब्दी में हुए आचार्य श्री तारण स्वामी जी का नाम भी इसी शृंखला में लेना उचित होगा। आचार्य श्री के द्वारा उनके अनुभव से सिद्ध कि गई लेखनी से ५ मतों में १४ ग्रन्थों की रचना की। उन ग्रन्थों में भी आचार्य ने श्रुत का बड़ा ही महत्त्व दर्शाया है। **'ज्ञानं तिलोय सारं'** (न्यान समुच्चयसार गा. क्र. २५८)। ज्ञान ही तीन लोक में सारभूत है। ज्ञान से जीव सुखी होता है। आचार्य श्री कहते है 'अज्ञान प्रमाण दुःख, ज्ञान प्रमाण सुख, अनुभव प्रमाण मुक्ति।' जीव की निगोद से लेकर सिद्ध तक की यात्रा सब ज्ञान पर ही आधारित है। ज्ञान ही मुक्ति का सोपान है। ज्ञान के बल से जीव तीन लोक में वंदनीय एवं पूजनीय हो जाता है। पंडित दौलतरामजी भी छहढाला ग्रंथ में कहते है।

**ज्ञान समान न आन जगत में सुख को कारण।**
**इह परमामृत जन्म-जरा-मृत रोग निवारण।।**

(ढाल ४ थी छंद ३)

ज्ञान एक ऐसी एकमात्र औषधि है, जो हमें इहलोक में भी ओर परलोक में भी सुखी कर सकता है। अनंतकाल तक सुखी रहने का जन्म-मरण से छूटने का राज भी केवल और केवल ज्ञान में ही है। ऐसे ज्ञान को आचार्य श्री तारण स्वामी के द्वारा रचे हुए ग्रन्थों के माध्यम से जानने का प्रयास करते हैं। आचार्य श्री ने श्रावकाचारजी ग्रन्थ की गाथा क्र. ११ से १३ कहा है-

**सरस्वती सास्वति दिस्टं, कमलासने कंठस्थितं।**
**ऊवं हियं श्रियं सुध्दं, तिअर्थं प्रति पूर्नितं।।११।।**
**कुन्यानं त्रि विनिर्मुक्तं, मिथ्या छाया न दिस्टते।**
**सर्वन्य मुषवानी च, बुध्दि प्रकास सास्वती।।१२।।**
**कुन्यानं तिमिरं पूर्नं, अंजनं न्यानभेषजं।**
**केवलि दिस्टि सुभावं च, जिनकंठं सास्वती नमः।।१३।।**

कंठ कमल आसन पर स्थित उवंकार हीयंकार श्रीयंकार तीर्थ से शुध्द और परिपूर्ण सरस्वती

अर्थात जिनवाणी को शाश्वत जानो। जो तीन प्रकार के कुज्ञान (कुमति, कुश्रुत, कुअवधि) से रहित है तथा मिथ्यात्व की छाया भी दिखाई नहीं देती ऐसे सर्वज्ञ परमात्मा की दिव्य ध्वनि से निःसृत जिनवाणी ज्ञान को प्रकाशित करने वाली शाश्वत वाणी है। ऐसी जिनवाणी को मैं नमस्कार करता हूँ। कुज्ञान रूपी अंधकार से पूर्ण जीवों के लिए ज्ञानांजन रूपी औषधि है। केवल स्वभाव पर दृष्टि कराने वाली केवलज्ञानी जिनेद्र भगवान के कंठ से निःसृत शास्वत जिनवाणी को नमस्कार करता हूँ। ऐसे ही आचार्यश्री तारण स्वामी ने अन्य ग्रन्थों में श्रुत का महत्त्व बताया है।

श्री न्यान समुच्चयसारजी ग्रन्थ की गाथा क्रमांक १३,१४,१५,१७ तथा ११ अंग १४ पूर्व के अंतर्गत ४७, ४८ इन गाथाओं में शुद्ध उपयोग व अशुद्ध उपयोग का विवेचन कर श्रुत को एक नई दिशा में वर्णन कर श्रुत की महिमा बताई है।

**सरस्वती ऊर्ध आर्धं च, मध्यलोकसमं धुवं।**
**संपूर्नं सुध्द सर्वन्यं, न्यानं मूर्ति अमूर्तयं।।१३।।**

जिनवाणी ऊर्ध्व, मध्य, अधोलोक के समान ध्रुव है। सर्वज्ञ परमात्मा के समान परिपूर्ण एवं शुध्द है। मूर्त-अमूर्त का ज्ञान करानेवाली है।

**सरस्वती सर्व दर्स च, सम संपूर्न संजुतं।**
**लोकालोक प्रकासं च, दिनयर किरन संजुतं।।१४।।**

जिस तरह दिनकर के किरणों के संयुक्त होने से संपूर्ण जगत अर्थात लोक अलोक प्रकाशित हो जाता है उसी तरह जिनवाणी सभी शास्वत पदार्थों को दर्शाने वाली है।

**उत्पंनं जिनकंठं च, कमलासने च संस्थितं ।**
**न्यानं पंचमयं सुध्दं, सर्वन्यं सास्वती नमः।।१५।।**

जिनवाणी जिनेद्र वीतरागी सर्वज्ञ देव के कंठ कमल से निःसृत निरक्षरी वाणी है। पाँच ज्ञान से शुध्द केवलज्ञान को प्रकट करनेवाली ऐसे सर्वज्ञ प्रणीत शास्वत जिनवाणी को नमस्कार है।

**जिन उक्तं वयनसुद्धस्य, न्यानेन न्यान लंकृतं।**
**संसार सरनि मुक्तस्य, मुक्ति पंथं सुध्दं ध्रुवं ।।१७।।**

जिनेन्द्र द्वारा कहे गए वचन निर्दोष है जो संसार मार्ग को छुड़ाकर शुध्द शाश्वत मुक्ति का मार्ग बताकर ज्ञान से ज्ञान को अलंकृत करन वाले है ।

**अर्थांग तिअर्थ सुध्दं च, सम संपूर्नं सार्धयं।**
**सुध्दं तत्त्वं च सार्धं च, अर्थं च विंजनं पदं ।।४७।।**

व्दादशांग के शब्द व्यंजन पद के अर्थ से शुध्द रत्नत्रय से शुध्द तत्त्व को जानकर अपने आत्मा को पूर्ण रुप से श्रध्दान में दृढ़ रखता है।

**श्रुतांगं श्रुत जानाति सास्वतं अस्तितं श्रुतं।**
**न्यानेन न्यान सद्भावं शयते सास्वतं पदं ।।४८।।**

श्रुत ज्ञानमय व्दादशांग सर्व श्रुत ज्ञान को जानता है। जिनवाणी सुनने से अस्तित्व का जान होता है। 'ज्ञानेन ज्ञानसद्भावं' ज्ञान से ही ज्ञान का सद्भाव होता है, जिससे शास्वत पद को जाना जाता है। श्री उपदेश शुद्धसारजी ग्रन्थ की गाथा क्रमांक २९, १९१ से १९५ के अनुसार-

**अष्यर मति उववन्नं, षट त्रि त्रि उववंन न्यान सभावं।**
**सुतं च अष्यरमइओ, एकादस जानि सुध्दसहकारं।२९।**
**श्रुतं च श्रुत उववन्नं श्रुतं च दंसन समग्गं।**
**श्रुतं च मग उवएसं, दर्शनमोहंधकुश्रुत अन्मोयं। १९१।**
**श्रुतं च अष्यर मइओ, श्रुतं च सुरं विंजनस्य पद सहियं।**
**श्रुतं च जिनयती वयनं दर्सनमोहंध विकहश्रुतं च ।१९२।**
**श्रुतं षिपनिक रुवं, षिपिओ कम्मान तिविह जोएन।**
**विकहाविसन अश्रुतं दर्शनमोहंध अश्रुतं पिच्छई।१९३।**
**सास्वतय रुव संश्रुतं, अनिरत असत्य अश्रुतं जानेहि।**
**श्रुतं जिनउत्त परं, दर्शनमोहंध अश्रुतपरिनामं ।।१९४।।**
**श्रुत अश्रुतं न पिच्छदि, गुण दोसं नवि बुज्झइ अंधं।**
**अंधं अन्धसहावं, दर्शनमोहंध निगोयवासम्मि ।१९५।**

अर्थात् शास्त्र वह है जो द्वादशांग वाणी से उत्पन्न हुआ है, जो वीतरागी, सर्वज्ञ और हितोपदेशी आप्तद्वारा कही गई है । जो सम्यग्दर्शन, सम्यग्ज्ञान, सम्यक्चारित्र का निर्णय कराता हो जो मोक्षमार्ग का उपदेश हो, अक्षय स्वभाव को बतानेवाला अक्षरमयी है। जिसमें वस्तुस्वरूप का यथार्थ निर्णय किया हो, वह गद्य हो, चाहे पद्य में हो । जो जिनेद्र की वाणीरूप हो, वही सच्चे शास्त्र हैं। यही शास्त्रों का सच्चा स्वरूप है। शास्त्र वह है, जो क्षायिक स्वरूप अरिहंत परमात्माद्वारा कहा गया हो, जिसके पढ़ने से त्रिविध योग के द्वारा कर्मों का क्षय होता है। जिसमें विकथा, व्यसनों की चर्चा नहीं होती, गुण-दोषों की चर्चा नहीं होती, ऐसे

शास्त्र सत्शास्त्र है। लेकिन दर्शनमोह में अंधा जीव श्रुत को कुश्रुत मानता है । सत्शास्त्र को पढ़ता नहीं । संसारी विषय-कषाय का पोषण करनेवाली तथा विकथा अधर्मस्य मूलस्य को मानता है। अधर्म को बढ़ानेवाली राजकथा, चोरकथा, स्त्रीकथा, भोजनकथा आदि संसार के विषय-कषाय का पोषण करनेवाली पापवर्धक बाते हो, ऐसे कुशास्त्र को ही पढ़ता, सुनता और मानता है, ऐसे कुशास्त्र के साहाय्यता करने से जीव का निगोद में वास होता है इसलिए जो चारों अनुयोगों में से किसी एक अनुयोग का शास्त्र हो जो वीतरागता को बढ़ाए तथा मोह-राग-द्वेष आदि कषाय भावों को घटाएं, वहीं शास्त्र पढ़ने-सुनने योग्य है, ऐसा आचार्य तारण स्वामी ने उपदेश शुद्धसार की गाथा क्रमांक १९१ से १९५ में दर्शाया है।

तात्पर्य है कि, जिनशास्त्रों के अक्षर, व्यंजन, पद पढ़ने मात्र से तथा अपने आत्मस्वरूप के चिंतवन करने से, सच्चे एवं शुध्द उपयोग होता है। अपने निज शुद्धात्मतत्त्व का वेदन, अनुभवन होने से त्रिकालवर्ती अखंड सुख की प्राप्ति होती है। आचार्यश्री कहते है, साचे शास्त्र तो उन्हें ही कहिए, जाके सुने से जीव को बोधबीज की उत्पत्ति होय तथा आत्मस्वरूप का श्रद्धान और सम्यक्त्व का लाभ होय; इसलिए सच्चे शास्त्र को पहचान कर उनका नियमित स्वाध्याय करने से आत्मस्वरूप का बोध करे, तो इस निकृष्ट पंचम काल में भी सम्यग्दर्शन से मोक्षमार्ग प्रशस्त हो सकता है । तभी मनुष्य भव की सार्थकता होगी। हम सभी को सम्यग्दर्शन की प्राप्ति हो, ऐसी मंगल भावना...।

**संदर्भ सूची-**


१) श्री तारणतरण अध्यात्मवाणी (आचार्य तारण स्वामी) इ.स. १५७२ पांडुलिपी

२) श्री मालारोहण (टीकाकार स्वामी ज्ञानानंदजी) प्रकाशक- विजय बहादुर जैन (इंजि.), इ.स.१९१९

३) श्री पंडितपूजा (टीकाकार), इ.स. १९९९, स्व. पं. श्री कैलाशचंदजी जैन परिवार, जैन ट्रेडिंग कंपनी, भोपाल

४) श्री कमल बत्तीसी (टीकाकार ब्र. बसन्त) इ.स.२०००, प्रकाशक- ब्रहमानंद आश्रम, संत तारण तरण मार्ग, पिपरिया (म.प्र.)

५) श्री श्रावकाचार (टीकाकार स्वामी ज्ञानानंदजी), सन २०००, प्रकाशक- स्व. महात्मा गोकुलचंद तारण साहित्य प्रकाशन समिति, जबलपुर (म. प्र.)

६) श्री न्यान समुच्चयसार (टीका ब्र.शीतलप्रसादजी), सन १९९६, प्रकाशक- श्री दिगम्बर जैन तारण तरण चैत्यालय ट्रस्ट कमेटी, सागर (म. प्र.)

७) ज्ञानोदय (श्री ता.त. मुक्त महा. पाठ्यक्रम), २०१२ प्रकाशक- श्रीमद तारण तरण ज्ञान संस्थान, छिंदवाडा

८) ज्ञानपुष्प (श्री ता.त. मुक्त महा. पाठ्यक्रम), २०१२ प्रकाशक- श्रीमद तारण तरण ज्ञान संस्थान, छिंदवाडा

९) ज्ञानरत्न (श्री ता.त. मुक्त महा. पाठ्यक्रम), २०१२ प्रकाशक- श्रीमद तारण तरण ज्ञान संस्थान, छिंदवाडा

१०) ज्ञानवैभव (श्री ता. त. मुक्त महा. पाठ्यक्रम), २०१२, प्रकाशक- श्रीमद तारण तरण ज्ञान संस्थान, छिंदवाडा

११) ज्ञानरत्नाकर (श्री ता.त. मुक्त महा. पाठ्यक्रम), २०१२, प्रकाशक- श्रीमद तारण तरण ज्ञान संस्थान, छिंदवाडा

१२) अष्टांग आराधना (चिंतन व लेखन ब्र. दिव्यानंद), २०२४, प्रकाशक- श्री ता. त. दि. जैन सामाज अमरवाड़ा.

१३) उपदेश शुद्धसार - ब्र. शीतल प्रसाद, इन्द्रानी बहू भोगाबाई कस्तूरी बाई समैया ट्रस्ट, सागर, १९९९

१४) तारण तरण श्रावकाचार - ब्र. शीतल प्रसाद, श्रीयुत मथुरा प्रसाद बजाज, सागर, वी. सं. २०५९

१५) न्यान समुच्चयसार -ब्र. शीतल प्रसाद, दिगम्बर जैन तारण तरण चैत्यालय ट्रस्ट कमेटी, वी. सं. २०५३

१६) श्री तारण तरण अध्यात्मवाणी - आचार्यश्री तारण स्वामी, (पांडुलिपि १५७२, २०२३), अखिल भारतीय श्री सकल तारण तरण समाज

१७) ज्ञानोदय -प्रकाशक श्रीमद् तारण तरण ज्ञान संस्थान, छिंदवाडा (म.प्र.), सन २०१०

१८) उपदेश शुद्धसार - स्वामी ज्ञानानन्द, प्रकाशक- तारण तरण ज्ञान साहित्य प्रकाशन, गंज बासोदा, २००२



**वर्गणीदारांना विनंती...**

**कृपया वार्षिक व आजीवन वर्गणीदारांनी आपली वर्गणी पाठवून सहकार्य करावे..**

# श्रुतपंचमी

**वंदना दर्यापूरकर,** अमरावती
मोबा. ९४२२८४०६०४

'सानू, उद्यापासून मला जरा मदत कर बरं, देवघरातील पुस्तकांना नवीन कव्हर लावायला, श्रुतपंचमीपर्यंत लावून झाली पाहिजेत......'

'आजी, श्रुत म्हणजे काय ग? आणि हा कोणता श्रुतपंचमीचा सण?' सानिकाने अपेक्षेप्रमाणे प्रश्न केलाच, मी पण तयारीतच होते.

गोष्ट ऐकण्याची खूपच आवड असणाऱ्या सानूला मी सांगायला सुरुवात केली; 'सानू , तुला भगवान महावीर, आपले चोवीसावे तीर्थंकर माहितच आहेत! भगवान महावीरानंतर जवळपास सातशे वर्षांनी धरसेनस्वामी नावाचे महान आचार्य होऊन गेले. आचार्य धरसेनांना दुसऱ्या पूर्वातील काही अधिकारांचे विशेष ज्ञान होते. गिरीनगर म्हणजेच गिरनार येथील चंद्रगुंफेत आत्मसाधना करीत असताना; काल दोषामुळे मनुष्याचे - शिष्यांचे आयुष्य, बुद्धी आणि बल कमी कमी होत आहे हे जाणून घेऊन जवळ असलेल्या अनमोल अशा ज्ञान भांडाराला लिपिबद्ध करण्याची आवश्यकता आचार्य धरसेनांना वाटू लागली. या कार्यासाठी त्यांना दोन विद्वान अशा शिष्यांची आवश्यकता वाटली व तसे त्यांनी 'युग प्रतिक्रमण' नावाच्या साधू संमेलनाच्या प्रमुख आचार्यांना निरोपपत्र पाठवून सूतोवाच केले. प्रमुख आचार्यांनी दोन बुद्धिमान साधुंची निवड केली. ते आदेशानुसार गिरनारकडे निघाले. ते पोचण्यापूर्वीच आ.धरसेनांना दोन शुभ्र वृषभ त्यांची वंदना करताहेत, असा त्यांच्या आगमनाचा स्वप्नसंकेत मिळाला. त्या मुनिद्वयांची परीक्षा घेण्याच्या उद्देशाने त्यांनी त्या उभयतांना मात्रांचा फरक करून एकेक मंत्र दिला. मंत्र साधना केल्यानंतर विरूप देवता प्रकटलेल्या बघून या मंत्रामध्ये काही त्रुटी आहेत, हे त्या दोन्ही शिष्यांच्या लक्षात आले व त्यांनी त्या मंत्रासुधारणा केली. त्यांनी दिलेला मंत्र सिद्ध केलेला बघून आ. धरसेनांनी या शिष्यांची महान योग्यता जाणून, पुष्पदंत आणि भूतबली नावाच्या या साधुद्वयांना आपल्या जवळचे ज्ञान प्रदान केले. याच त्यांच्या शिष्यांनी या ज्ञानावर आधारित सत्कर्म प्राभृत अर्थात् षट्खंडागम या सूत्ररूप ग्रंथाची रचना पूर्ण केली; ती ज्येष्ठ शुध्द पंचमीच्या दिवशी. म्हणून श्रुतपंचमी हा महान पर्व या दिवशी साजरा करतात. हा इतिहास आहे बघ श्रुत लिपिबद्ध होण्याचा, श्रुतपंचमीचा.....'

सानूला श्रुतपंचमीचा उद्‌गम सांगताना मी मात्र भूतकाळात हरवत गेले.

'जया, भाऊ आणि तू शाळेचा गृहपाठ आटपून लवकर या बरं का, आपल्या मंदिरात ! बरोबर आठ वाजता पंडितजींचे प्रवचन सुरू होईल.' आई-बाबा पर्युषण पर्वात मंदिरात जाताना बजावून सांगायचे.

'अग आई, आम्हाला काही म्हणजे काहीच कळत नाही....पंडितजी काय सांगतात ते...त्यापेक्षा आम्ही जवळच्याच मंदिरात जातो. तिथे कसे छान आळवून आळवून भजनं, भक्तीपदं रसाळपणे म्हणतात. साथीला तबला, पेटी, झांज सगळा वाद्यवृंद असतो....छान मजा येते गं.... आपल्या मंदिरात किती गंभीर वातावरण असतं!'

पण आमची कोणतीही तक्रार ऐकून न घेताच शास्त्र ऐकणं, जिनवाणीचे दोन शब्द कानांवर पडणं ही अत्यावश्यक गोष्ट आहे, हेच आम्हाला न बोलता, न रागावता पण त्या बाबतीत कुठलीही तडजोड न स्वीकारता, कृतीने सांगितले जायचे. आम्ही पण मग अनिच्छेने का होईना, मंदिरात

जाऊन श्रवणभक्ती करण्याचा प्रयत्न करीत असू. ही दरवर्षीची पर्युषण पर्वातील परिपाठीच झाली होती. नंतर मात्र जैन सिद्धांत प्रवेशिकेपर्यंतचा अभ्यास झाल्यामुळे त्यामध्ये थोडा रसही वाढायला लागला होता. लग्न झाल्यानंतर मात्र गाव, मंदिर, पूजा, शास्त्र यापासून खूप दूर कंपनीच्या कॉलनीत रहावे लागले तिला....पण कानावर पडलेले ते श्रुत, धर्म शिकवण नकळतच मनाच्या ओल्या मातीवर संस्काराचा अमिट ठसा उमटवून गेले होते. याची प्रचिती तिला वेळोवेळी येत गेली.

उदरात उमलणारी कळी न फुलताच गळून पडली होती ...ती वेदना, ते दुःख असह्य होते. 'संध्याकाळच्या वेळी पिराच्या दर्ग्यासमोरून गेली...अशा दिवसात बाहेरच कशाला जायला पाहिजे... कुणाची तरी नजर लागली... मूठ मारली, करणी केली...' बोलणाऱ्या तोंडांना अनेक निमित्त सापडले होते, पण घरचे लोक आणि ती स्वतः कुठल्याही निमित्तावर भर न देता, कुणालाही दोष न देता आपले प्रारब्ध समजून शांत राहिले. असे एक नाही तर अनेक इष्टानिष्ट प्रसंग जीवनांत येत गेले. कित्येक वेळा मन दोलायमान होत असे, श्रद्धा डळमळीत होत असे. मनांत अनेक विद्रोहाच्या, विकल्पाच्या, विकारांच्या लाटा उचंबळत, पण त्यांना आवर घालणारा जिनवाणीच्या श्रुताचा भरभक्कम तटबंदी असलेला किनारा मनाला लाभला होता. तो किनारा संयतपणे मनात उसळणाऱ्या वादळाला थोपवून शांतवीत होता, सोहम्-सोहम्च्या उद्घोषात परावर्तित करत होता. अजाणत्या वयात कानावर पडलेले, जिनवाणीचे वचन, श्रुत वाचन कुठेतरी अंतःकरणात एका कल्पतरूच्या बीजाप्रमाणे खोलवर रुजून गेलेले होते. जीवनातल्या चढ-उताराच्या प्रसंगी या श्रुतरूपी धर्मवृक्षाच्या बीजफलाने दिलेल्या आत्मिक शक्तीमुळेच ती तावूनसुलाखून प्रत्येक प्रसंगातून बाहेर पडली होती.

'आजी, तू काल गोष्ट सांगितली.. पण श्रुत म्हणजे काय ते मात्र सांगितलेच नाही, म्हणजे मला नीट कळले नाही. सानू मला पुस्तकांना वेष्टण लावण्यासाठी मदत करताना विचारु लागली.

'सांगते हं, मी तुला, आधी तू हातामध्ये एक वही घेऊन आपल्याकडे असलेले ग्रंथ व ते लिहिणारे महान आचार्य ग्रंथकार यांची सूची बनवून, मला मदत कर बघू!'

मी मुद्दामच तिला हे काम सांगितले, तेवढेच तिच्या कानांवर जिनवाणी शास्त्र आणि ते लिहिणारे आचार्य शास्त्रकार यांची नावे पडावी एवढाच माझा उद्देश होता. 'सांग ना आजी,श्रुत म्हणजे काय ते...?'

'श्रुत म्हणजे कानांनी ऐकलेले, श्रवण केलेले. आपल्या जैन धर्मग्रंथांना श्रुत असे म्हणतात. जिनवाणी म्हणजेच श्रुतशास्त्र! स्मृतीवर आधारित गुरु-शिष्य परंपरेने चालत आलेली मौखिक ज्ञानधारा! महावीर भगवंतांच्या समवशरणातील ओंकारमय दिव्यध्वनीतून जाणलेल्या उपदेशाची, सरस्वतीची आचार्य गौतम गणधरांनी शब्दवैखरीच्या आधाराने बारा अंगामध्ये रचना केली. म्हणूनच या रचनेला द्वादशांग रचना किंवा द्वादशांग वाणी असेही म्हणतात. भगवान महावीरानंतर ही श्रुतधारा, मौखिक पठन-पाठनातून, अविरतपणे काही शतके वाहत राहिली. नंतर मात्र काळाच्या दोषामुळे माणसाची बुद्धी क्षीण, मंद होऊ लागली व त्यामुळे हे श्रुतज्ञान लिपिबद्ध करण्याची आवश्यकता निर्माण झाली. तुला मी आधी श्रुतपंचमीची कथा सांगितलेलीच आहे.....समजले ना तुला आता ? हा दिवस श्रुताचा, म्हणजेच द्वादशांग वाणी लिपिबध्द झाली याचा आनंद, कृतज्ञता व्यक्त करण्याचा दिवस आहे.

आचार्यांचे आपल्यावर यासाठी अनंत उपकार आहेत! त्यांच्यामुळेच आपल्याला भगवान महावीरांचा उपदेश ऐकण्याचे परोक्ष भाग्य मिळाले आहे. त्यासाठी कृतज्ञता व्यक्त करणारे अर्चनापर्व म्हणजे श्रुतपंचमी !'

सानूचे समाधान झाले होते. गाढ झोपलेल्या सानूच्या अंगावर ममतेने पांघरूण

घालताना, मन चिंतन करू लागले, ‘या जीवनात, ही जिनवाणी मातेच्या रूपात आपल्याला लाभली आहे. तिच्या ममतामयी पदराने तिने तिच्या आश्रयाला गेलेल्या प्रत्येक जीवावर असेच हितोपदेशी आश्वासक पांघरूण घातले आहे. करूणामयी, कल्याणकारी, हितकारी, मंगलकारी अशा तिच्या वचनांनी संसारात पोळलेल्या मनांवर शीतल फुंकर घातली आहे. या भवातील मातापिता, इष्टजनांच्या वियोगात तिनेच आपल्याला सावरले आहे, भवाभवांत तिचे संस्कार सोबत येणार आहेत.... अशा या जिनमुखोद्गम श्रुतवाणीला, तिला शब्दबध्द करणाऱ्या गौतमाचार्यांना आणि लिपीतून आपल्यापर्यंत पोचवणाऱ्या सगळ्या आचार्यवरांना कृतज्ञतापूर्वक शतदा नमन!’

**वियोग वार्ता–**

**शरदकुमार फुलचंद शहा,** जेऊर



बाहुबली गुरुकुलाचे स्नातक आणि पूज्य गुरुदेव श्री समंतभद्र महाराज यांचे परम शिष्य श्री. शरदकुमार फुलचंद शहा यांचे वयाच्या ७८ व्या वर्षी दि. ६ मे २०२५ रोजी हृदयविकाराने निधन झाले.

दि. १३ मार्च २०२३ रोजी बाहुबली गुरुकुलात त्यांचा ७५वा जन्मदिवस म्हणजेच अमृत महोत्सव खूप मोठ्या प्रमाणात साजरा करण्यात आला होता. त्यावेळी त्यांनी सर्व विद्यार्थी, अध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी तसेच गुरुकुल कार्यकर्ता या सर्वांना मिष्ठान्न भोजन ही देऊ केले होते. त्यांच्या परिवारामार्फत बाहुबली गुरुकुलास अनेक वेळा सहयोग लाभले आहे. विविध धार्मिक उपक्रमात त्यांनी मनमोकळेपणाने दानराशी देऊ केली आहे.

‘कष्टाने केली आयुष्याची सुरुवात,
केली सर्वावर प्रेमाची बरसात,
ना ध्यानी ना मनी,
सोडून गेलात आम्हाला तुम्ही’

अशी अवस्था त्यांच्या पश्चात त्यांच्या धर्मपत्नी श्रीमती सविता, पाच मुली, दोन मुले, जावई, सुना, नातवंडे अशा परिवाराची झाली आहे.

**श्री. धनपाल टारे,** इचलकरंजी



इचलकरंजी येथील पावरलूम डेव्हलपमेंट अँड एक्सपोर्ट प्रमोशन कौन्सिल (पीडीएक्सएल) याचे माजी अध्यक्ष आणि वस्त्रोद्योग क्षेत्रातील राष्ट्रीय स्तरावरील जाणकार नेतृत्व असलेले श्री. धनपाल अण्णासो टारे यांचे वयाच्या ८७व्या वर्षी दि. १४ मे २०२५ रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात त्यांची मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे.

ऑल इंडिया पावरलूम फेडरेशनची स्थापना करण्यात त्यांचा पुढाकार होता. तसेच ते या संस्थेचे आणि इतर अनेक संस्थेचे मुख्य पदाधिकारी व सल्लागार होते. त्यांनी कामगारांचे अनेक प्रश्न समन्वयातून सोडवले. बाहुबली विद्यापीठाचे माजी उपाध्यक्ष श्री. अण्णाजी आबाजी टारे यांचे ते सुपुत्र होते. बाहुबली संस्थेच्या उत्कर्षासाठी प्रारंभिक काळात त्यांचे अनमोल योगदान लाभले आहे. गुरुदेव समंतभद्र महाराज क्षुल्लक अवस्थेत असतानाही इचलकरंजीला अनेक वेळा त्यांच्या घरी जात असत. संस्थेच्या स्थापनेत श्री टारे परिवार इचलकरंजी यांचे बहुमोल योगदान लाभले आहे. श्री. धनपाल टारे यांच्या आत्म्यास चिरशांती लाभो हीच भावना..

UGC Care Listed Research Journal ISSN 2395-5503

# प्राकृत साहित्य परम्परा में स्त्री–शिक्षा

**डॉ. विकास चौधरी,** सहायक आचार्य,
प्राकृतभाषा–विभाग, श्री लालबहादुर शास्त्री राष्ट्रिय संस्कृत विश्वविद्यालय,
(केन्द्रीय विश्वविद्यालय) नई दिल्ली, मो. नं. ९२१४५९१७७१, EMAIL-drvikas36@gmail.com

किसी भी समाज के निर्माण में उसकी शिक्षा व्यवस्था एक महत्त्वपूर्ण भूमिका निभाती है। शिक्षा जहां एक ओर अमूर्त सामाजिक आदर्शों एवं मूल्यों को मूर्तिमान करती है, वहीं दूसरी ओर अनेक ऐसे मूल्यों का सृजन भी करती है, जो भावी पीढ़ियों की प्रगति के लिए नए आयाम प्रस्तुत करते हैं। सभ्यता एवं संस्कृति के सम्यक् प्रचार प्रसार, विकास एवं व्यक्ति के सामाजिक और राष्ट्रीय प्रगति के लिए शिक्षा नितान्त आवश्यक है। मानव जीवन का उच्चतम ध्येय अपने जीवन की गुत्थियों को सुलझाना और ज्ञान का आलोक प्रकाशित कारना है, जो सम्भवतः शिक्षा के द्वारा ही किया जा सकता है। भावी पीढ़ियों के निर्माण में स्त्री शिक्षा का महत्त्वपूर्ण योगदान रहा है। शिक्षा बालिकाओं तथा महिलाओं को सक्षम करने में एवं उनके अन्य अधिकारों को सुरक्षित करने के लिए एक महत्त्वपूर्ण भूमिका निभाती है। प्राकृत वाङ्मय में स्त्री शिक्षा की उपादेयता को बढ़ावा दिया गया है। प्राकृत भाषा और साहित्य में स्त्रियों के शैक्षिक और सामाजिक उत्थान के लिए महत्त्वपूर्ण सिद्धांतों का प्रचार प्रसार किया गया है।

भारतीय समाज में एक ऐसा युग भी था जब स्त्रियों को समाज में महत्त्वपूर्ण स्थान प्राप्त था। स्त्रियों को सुख, सम्पत्ति, ज्ञान और शक्ति का प्रतीक माना जाता था। जिसकी अभिव्यक्ति के रूप में लक्ष्मी, सरस्वती और दुर्गा आदि की आज भी पूजा की जाती है। शैक्षिक जीवन के अंतर्गत प्रथम तीर्थंकर भगवान ऋषभदेव ने अपनी पुत्रियों ब्राह्मी और सुंदरी को लिपिशास्त्र एवं अंकगणित का ज्ञान दिया था।

भारतीय संस्कृति में शिक्षा पद्धति का प्रारंभिक स्वरूप वैदिक काल में दृष्टिगोचर होता है। जहाँ विद्यार्थी को गुरु के आश्रम में निवास करते हुए ज्ञानार्जन करना पड़ता था। गुरु के सानिध्य में रहते हुए विद्यार्थी उनके उपदेशों को ग्रहण करता था। वैदिक परंपरा में शिक्षा का प्रारम्भ उपनयन संस्कार के साथ होता था।

वैदिक काल में कन्याओं का भी उपनयन संस्कार प्रचलित था। अथर्ववेद के एक मंत्र में कहा गया है कि– **ब्रह्मचर्येण कन्या युवानं विन्दते पतिम्।**

ब्रह्मचर्य के बल से कन्या युवती होने पर पति का वरण करती है। इससे यह प्रतीत होता है कि प्राचीन काल में नारी को पूजा–पाठ तथा यज्ञादि करवाने के लिए कन्याओं को किशोरावस्था में वेद मंत्रों और याज्ञिक प्रार्थनाओं का ज्ञान दिया जाता था। ऋग्वेद काल में स्त्रियां उस समय की सर्वोच्च शिक्षा अर्थात ब्रह्मज्ञान प्राप्त कर सकती थी। ऋग्वेद में सरस्वती को वाणी की देवी कहा गया है, जो उस समय नारी की शास्त्र एवं कला के क्षेत्र में निपुणता का परिचायक है। उपनिषद साहित्यों में गार्गी, मैत्रेयी जैसी स्त्रियां ब्रह्मविद्या में प्रवीण थी। महाभारत के एक संदर्भ में पांडवों की माता कुन्ती को अथर्ववेद में पारंगत कहा गया है। उत्तररामचरित के अनुसार आत्रेयी ने वाल्मीकि के आश्रम में रहते हुए शिक्षा ग्रहण की थी। रामायण में कौशल्या और तारा दोनों को मंत्रविद् कहा गया है, इसी ग्रंथ में सीता द्वारा वैदिक मंत्रों के पाठ, धार्मिक क्रियाओं के संपादन का भी उल्लेख मिलता है।

प्राकृत वाङ्मय में शैक्षिक दृष्टिकोण से स्त्री और पुरुष को समान माना गया है, जिसमें स्त्रियों को भी शिक्षा का अधिकार प्राप्त है। प्राकृत वाङ्मय में

स्त्रियों को उत्तम जीवन की प्राप्ति के लिए शिक्षा की महत्ता पर बल दिया गया है। उत्तम समाज का निर्माण स्त्रियों के शिक्षित होने से होता है, इससे समाज श्रेष्ठता और समृद्धि को प्राप्त करता है। प्राकृत वाङ्मय में स्त्री शिक्षा के महत्त्व को समझाने और उसे समर्थ बनाने के लिए विभिन्न कथाएं, काव्य, महाकाव्य, खंडकाव्य और नाटक इत्यादि लिखे गए हैं, जो स्त्रियों की शैक्षिक, सामाजिक और धार्मिक स्थिति के परिचायक हैं। प्राकृत साहित्यों में स्त्रियों के जीवन, संघर्ष, और समाज में उनकी भूमिका का वर्णन किया गया है। ये ग्रंथ स्त्रियों के अधिकार, स्वतंत्रता और समाज में उनकी स्थिति को दर्शाते हैं। स्त्रियां किस प्रकार अपने समय में अर्जित शिक्षा और ज्ञान के बल पर समाजिक और आर्थिक परिस्थितियों के साथ जूझती है और अपने शील, संयम एवं अस्तित्व की रक्षा करती हैं। स्त्री शिक्षा के प्राकृत वाङ्मय में बहुत से उदाहरण प्राप्त होते है। प्राकृत साहित्यों में स्त्रियों के इस प्रकार के चित्रण समाज में उन्हें अधिकार और समानता के प्रति जागरूक करना एवं उनके सामाजिक, शैक्षिक जीवन को समृद्ध बनाना था।

प्रारंभिक अवस्था में  स्त्रियों को विशेष रूप से गृह कार्य, ललित कला, संगीत, नृत्य आदि की शिक्षाऐं दी जाती थी। जिससे वे परिवार संभालने के साथ-साथ सामाजिक जिम्मेदारीयों को भी बखूबी निभा सके। इसके साथ ही प्राकृत कथा साहित्यों के अनुसार स्त्रियों को धार्मिक और आध्यात्मिक शिक्षा भी दी जाती थी। जिससे वह अपने परिवार में धार्मिक और आध्यात्मिक शिक्षा का संचार करती थी। स्त्री का यह रूप उसके धार्मिक और आध्यात्मिक पक्ष को उजागर करता है। धार्मिक और आध्यात्मिक शिक्षा के लिए स्त्रियाँ संघ में जाया करती थी । भगवान महावीर के काल में स्त्रियों के विदुषी होने के अनेक प्रमाण मिलते है, परन्तु स्त्रियों के लिए संघ के नियम थोड़े कठोर हुआ करते थे। इसके बावजूद स्त्रियाँ शिक्षा ग्रहण करने संघ में जाया करती थी।

स्त्रियों को संगीत-नृत्य आदि की शिक्षा प्रायः पारिवारिक परिवेश में ही दी जाती थी। इस प्रकार की शिक्षा का अवसर भी प्रायः कुलीन वर्ग की कन्याओं को ही प्राप्त होता था। इन्ही कुलीन कन्याओं में कुछ कवियित्रीयां भी हुई है। महाकवि सातवाहन हाल की गाथासप्तशती में कई कवित्रीयों के सन्दर्भ में उल्लेख मिलते है। रेवा, रोहा, पाहई, अनुलक्ष्मी, बद्धवही, शशिप्रभा आदि कवित्रीयों के नामोंल्लेख अन्य लेखकों व कवियों के साथ गाथासप्तसती में भी मिलते है। थेरीगाथा में भी पचास भिक्षुणियों की कविताओं का संकलन बताया गया है।

जैसे-जैसे समय बीतता गया स्त्रियां जागरुक होती गई और नृत्य, संगीत, चित्रकला के साथ-साथ वे धार्मिक तथा साहित्य ज्ञानार्जन भी करने लगी। परन्तु इस प्रकार की शिक्षा बौद्ध तथा जैन ग्रंथों के अनुसार भी केवल उच्च कुल की नारियों तक ही सीमित रहा था।

मुख्यतः उच्च कुल की स्त्रियों को शिक्षा प्राप्त होती थी। उन्हें धर्म, दर्शन, कला इत्यादि का ज्ञान प्राप्त कराया जाता था। कुवलयमालाकहा में भृगु पुत्री का राजकीर की शिक्षिका के रूप में उल्लेख किया गया है। सन्यासिनी एणिका ने भी राजकीर से अक्षर ज्ञान लेकर धर्म एवं काम विद्याओं के सभी शास्त्रों का ज्ञान प्राप्त किया था।

राजशेखर की काव्यमीमांसा से ज्ञात होता है कि, राजकुल की कन्यायें अमात्यों की पुत्रियां, गणिकायें तथा समृद्धजनों की स्त्रियां काव्य, संगीत, नृत्य, वाद्य एवं चित्रकला आदि विद्याओं में निपुण होती थी। कर्पूरमंजरी सट्टक से ज्ञात होता है कि, कवि राजशेखर की पत्नी अवंतिसुंदरी एक श्रेष्ठ कवियित्री तथा टीकाकार थी। विवेच्य काल में राज्य की ओर से गणिकाओं, दासियों, रंगोपजीवी (रंगशाला द्वारा जीविका अर्जन करनेवाली) आदि को गीत, नृत्य, वाद्य, पाठ्यचित्र, गन्ध माल्य संवाहन एवं वैश्विक कला आदि की शिक्षा राज्य के मनोरंजन के लिए दी जाती थी। आचार्य हेमचन्द्र के कुमारपाल चरियं में पुत्री रत्नावती की शिक्षा के लिए

उसके पिता ने सभी साधन जुटाये थे और अपनी पुत्री को संगीत, चित्रकला आदि शिक्षाओं में निष्णात बनाते है। कुशुमावली को बचपन में ही काव्य एवं चित्रकला आदि की शिक्षा प्रदान की गयी थी। शिक्षा पर इतना अधिक बल देने के कारण कुछ कन्याएं इतनी विदुषी हो जाती थी कि, वे अनेक प्रतियोगिताओं में विद्वान् पुरुषों को शास्त्रार्थ के लिए चुनौती तक दे देती थी। प्राकृत आगम ग्रंथों के ऐसे अनेक उदाहरण मिलते है। ज्ञाताधर्मकथांग में देवदत्ता नामक गणिका का उल्लेख हुआ है जो अट्ठारह भाषाओं में विशारद थी। अभिज्ञान-शाकुंतलम् में शकुंतला अपने हृदय के उद्गारों को कमल और भोजपत्र के पत्तों पर व्यक्त करती है। यहाँ शकुन्तला को इसलिए उद्धृत किया गया है; क्योंकि वह प्राकृत बोलती है।

नम्मयासुन्दारी कहा में नर्मदासुन्दरी को बाल्यावस्था में पिता पंच णमोकार मंत्र की शिक्षा प्रदान करते हैं और नर्मदा सुंदरी मंत्रों को उत्साहपूर्वक ग्रहण करती है।

**बोल्लाविज्जइ पिउणा पंचणमोक्कार भणणकुड्डेण।**
**देवगुरूण पणामं सिक्खाविज्जइ हसिर वयणा।।**

नर्मदासुंदरी को स्त्रियोचित चौसठ कलाएं सिखाई जाती है, परंतु बाद में उसे सम्यग्ज्ञानादि सीखने के लिए साध्वियों के पास भेजा जाता है। उस समय कन्या को माता के माध्यम से नैतिक शिक्षा दी जाती थी, साथ ही धर्म कथाओं के माध्यम से गुरुओं और साध्वियों द्वारा आचरण की शिक्षा दी जाती थी। धर्म और आध्यात्मिकता के क्षेत्र में भी प्राकृत ग्रंथों में स्त्रियों को शिक्षा और ज्ञान का महत्त्व समझाया गया। आचारांग सूत्र आदि प्राकृत आगम ग्रथों में स्त्रियों की शिक्षा और विद्या को महत्त्वपूर्ण स्थान देते हुए उसकी प्रशंसा की गई है।

प्राकृत आचार्यों का मानना था कि किसी भी समाज की प्रगति के निर्धारण का महत्वपूर्ण मानदण्ड वहां की स्त्रियाँ है। स्त्रियाँ भविष्य की पीढ़ियों का निर्माण करती है। यदि किसी पुरुष को शिक्षित किया जाता हैं, तो केवल एक व्यक्ति शिक्षित होता हैं। लेकिन एक महिला को शिक्षित किया जाता है, तो उसका सम्पूर्ण परिवार शिक्षित होता हैं। शिक्षा को ग्रहण करने से कन्याएं भविष्य में शिक्षित होकर स्वयं के गुणों के विकास के साथ-साथ अपने शिक्षित संस्कारों से परिवार, कुटुम्ब, समाज और देश को भी गौरवान्वित करती है।

वर्तमान परिवेश में स्त्री को यदि शोषण व अन्याय से मुक्त होना है, तो उसको आत्मनिर्भर व सुशिक्षित बनाना होगा। सम्पूर्ण समाज, राज्य एवं प्रशासन के द्वारा भी उनके हितों की रक्षा तब हो सकती है जब स्त्री स्वयं अपने अधिकारों की रक्षा करे। इसलिए वर्तमान समय में आवश्यकता है कन्यायें शिक्षित बनें, खूब पढ़े खूब बढ़ें।

## कुंथलगिरी येथे धर्म संस्कार शिबिर संपन्न



श्री सिद्ध क्षेत्र कुंथलगिरी येथे संमती संस्कार मंच तर्फे धर्म संस्कार शिबिर आयोजित करण्यात आले होते. यासाठी परमपूज्य मुनी १०८ श्री सहजसागर महाराज आणि मोक्षसागर महाराज यांचे मंगल सानिध्य लाभले होते. मुनीश्री सहजसागर महाराज आणि मुनी श्री मोक्षसागर महाराज यांनी उत्तम रीतीने अध्यापन केले. या शिबिराचे समापन श्रुतपंचमीच्या दिवशी दि. ३१ मे २०२५ रोजी करण्यात आले. त्याच दिवशी अतिशय क्षेत्र नांदणी मठ ते सिद्धक्षेत्र कुंथलगिरी असा ३०० किलोमीटरचा पायी प्रवास २७ दिवसात करून परमपूज्य जिनसेन भट्टारक महास्वामींचे जिनधर्म प्रभावना ही यात्रा पोहोचली होती. या समापन कार्यक्रमाचे स्वागत वर्धमान बुद्रुक यांनी केले. श्रेया चौगुले यांनी सूत्रसंचालन व अरविंद पाटील यांनी आभार मानले. या प्रसंगी उपस्थित सर्व शिबिरार्थींचा सन्मान करण्यात आला. श्री जिनसेन भट्टारक महास्वामींनी समापनप्रसंगी मंगल प्रवचन केले.

# लोभ – दुःखप्रदाता

– पं. श्री. प्रदीप धोतरे (शास्त्री), बाहुबली

चंपापुरी नावाचे नगर होते. तेथील राजा अभयवाहन होता. त्याच्या राणीचे नाव पुंडरिका होते. तिचे डोळे पुंडरिक कमळासारखे सुंदर होते. त्याच चंपापुरी नगरीत लुब्धक शेठजी व त्याची पत्नी नागवसु हे आपले गरुडदत्त व नामदत्त नावाच्या हसमुख पुत्रांसोबत राहत होते.

लुब्धक शेठजी हा खूप धनिक असून ही खूपच लोभी व परिग्रही प्रवृत्तीचा होता. याच परिग्रही प्रवृत्तीमुळे त्याने आपले संपूर्ण धन खर्च करून सोन्याचे पक्षी, हत्ती, उंट, घोडा, सिंह, हरीण इत्यादी पशु-पक्ष्यांची एक-एक जोडी तयार करून घेतली होती. त्यांचे पंख, शिंग, शेपूट, चोच इत्यादी रत्नजडित असे तयार केले होते व त्या सर्व बहुमूल्य वस्तूंचे एक दर्शनीय संग्रहालय बनविले. जो कोणी या संग्रहालयास भेट देतो तो त्या लुब्धक शेठजीची प्रशंसा नक्की करतो. स्वतः लुब्धक शेठ सुद्धा सुंदर अशा संग्रहालयातील वस्तूंना पाहून स्वतःला धन्य समजून स्वतःच स्वतःची पाठ थोपटत होता. जेव्हा तो शेठ बैलांची जोडी बनवत होता तेव्हा एक बैल सोन्याचा तयार झाला, परंतु सोने कमी पडल्यामुळे दुसरा बैल तयार न झाल्यामुळे तो खूपच दुखी, व्याकुळ झाला.

या गोष्टीची चिंता त्याला सतत होती त्यामुळे तो ती बैल जोडी पूर्ण करण्यासाठी अथक परिश्रम करू लागला.

एके दिवशी सतत सात दिवस मुसळधार पाऊस पडल्याने नदी-नाल्यांना पूर आले होते. त्यामुळे अनेक झाडे पडली व ती पुराच्या पाण्यात वाहत होती. तो धाडसी शेठ दुसरा बैल तयार करण्यासाठी अथक परिश्रम करण्याच्या हेतूने स्वतः नदीच्या काठावर गेला व वाहत्या पाण्यातील लाकडे गोळा करून त्याची मोठी मोळी बांधून आपल्या डोक्यावर घेऊन तो आपल्या घराच्या दिशेने चालू लागला. खरंच – **'तृष्णा की खाई खूब भरी,**
**पर रिक्त रही वह रिक्त रही।'**

राणी पुंडरिका आपल्या राजवाड्यातील एका खिडकीतून निसर्गाचे सौंदर्य पाहत होती. त्यावेळी महाराजा सुद्धा तिच्यासोबत बसले होते. राणी ने पावसात लाकडाची मोठी मोळी डोक्यावर घेऊन जाणाऱ्या लुब्धक शेठला पाहिले. तिने लगेच महाराजांना सांगितले की, 'हे प्राणनाथ! तुमच्या राज्यात हा व्यक्ती खूपच दरिद्री आहे. पहा, एवढ्या मुसळधार पावसात सुद्धा लाकडाची मोळी डोक्यावर ठेवून तो जात आहे. कृपया आपण त्याची मदत करा, ज्यामुळे त्याचे दुःख दूर होईल.'

राजाने त्याच क्षणी त्या लुब्धक शेठला राज दरबारात बोलविले. राजा त्याला म्हणाला, 'तुझ्या घरची परिस्थिती बिकट आहे, त्यामुळे तुला हवे तेवढे धन तू या राज भंडारातून घेऊन जा.'

लुब्धक म्हणाला– 'महाराज ! मला दुसरे काही नको, फक्त एक बैल हवा आहे.' तेव्हा राजाने आपल्याकडे असलेल्या बैलांपैकी कोणत्याही एका बैलाला घेऊन जाण्यास सांगितले. तेव्हा राजाच्या सर्व बैलांना पाहून लुब्धक राजाला म्हणाला– 'हे पृथ्वीपती! आपल्या सर्व बैलांमध्ये माझ्या बैलासारखा एकही बैल नाही.' हे ऐकून राजाला मोठे आश्चर्यच वाटले. तेव्हा राजा लुब्धकाला म्हणाला – 'अरे! तुझा बैल माझ्या बैलासारखा नाही; तर मग आहे तरी कसा? मला तुझ्या त्या बैलाला बघायचे आहे.' तेव्हा लुब्धक शेठ प्रसन्नतेने राजाला आपल्या घरी घेऊन गेला, आणि त्याने राजाला सोन्याचा बैल दाखविले. राजा ज्याला दरिद्र मानत होता, ती व्यक्ती इतकी धनवान आहे हे पाहून राजाला धक्काच बसला.

लुब्धक शेठजीची पत्नी नागवसु राजाला आपल्या घरी आलेले पाहून तिने एक सुवर्ण बहुमूल्य रत्नांनी सजवून राजाला भेट देण्यासाठी घेऊन आली. व शेठजीला इशारा करून राजाला मौल्यवान रत्ने भेट देण्यास सांगितले. रत्नांनी भरलेले ताट पाहून शेठजीची छाती धडधडू लागली; परंतु तो राजाच्या शेजारीच उभा असल्याने नकार देऊ शकला नाही. शेवटी नाईलाजाने त्याने मूठभर रत्ने घेऊन राजाला देण्यासाठी हात पुढे केले तेव्हा त्याच्या हातातील बोटे सर्प फणासारखे दिसत असल्याचे राजाच्या लक्षात आले.

ज्याने आजवर एक कण सुद्धा दुसऱ्याला दिले नाही, त्याचे मन दुसऱ्यांच्या सांगण्यावरून कसे काय देऊ शकेल? अर्थात कधीही नाही.

राजाला लुब्धक शेठजीच्या अशा वागण्याचा खूप राग आला. त्यानंतर राजा तिथे एकक्षण सुद्धा न थांबता शेठजीच्या घरातून निघून गेला. जाता जाता राजाने शेठजीचे 'फणहस्त' असे नाव ठेवले.

त्यानंतर लुब्धक शेठजी आपल्या दुसऱ्या बैलाची इच्छा पूर्ण झालेली नाही म्हणून तो धनप्राप्तीसाठी सिंहलद्वीप मध्ये गेला. तिथे त्याने जवळपास चार करोड इतके धन कमविले. जेव्हा तो आपले संपूर्ण धन व मौल्यवान साहित्य घेऊन जहाजातून समुद्र पार करून घरी जाण्यासाठी निघाला तेव्हा समुद्रामध्ये आलेल्या भयंकर वादळामुळे त्याचे जहाज समुद्रामध्ये बुडाले. तेव्हा लुब्धक शेठजी सुद्धा समुद्रात पडला व शेवटी आर्तध्यान करून त्याचे मरण झाले. मेल्यानंतर तो आपल्याच घरातील धनाचा रक्षक साप म्हणून जन्माला आला. तिथे सुद्धा तो धनाच्या भंडारातील थोडे सुद्धा धन कोणाला घेऊ देत नव्हता.

आपल्या धनांच्या भंडारावर बसलेल्या सापाला पाहून लुब्धक शेठजीच्या मोठ्या गरुडदत्त नावाच्या मुलाला खूप राग आला. त्याने त्या सापाला ठार मारले. मेल्यानंतर लब्धकाचा जीव सापाच्या पर्यायातून नरकात गेला. तिथे महान पापाच्या उदयामुळे त्याला महा कष्ट भोगावे लागले.

पहा! लोभाच्या इच्छेपोटी आयुष्यभर कठीण परिश्रम करून कमविलेल्या धनाचा तो लुब्धक शेठ स्वतः तर भोग करू शकला नाही परंतु त्याच्या अशा स्वभावामुळे त्याच्या परिवाराला सुद्धा त्याचा भोग घेता आलेला नाही. तसेच त्याचे ते धन परोपकार किंवा धार्मिक अनुष्ठानामध्ये सुद्धा वापर करू शकला नाही. उलट तो शेठजी धनाच्या हव्यासापोटी मरून साप झाला व शेवटी नरकातील भयंकर दुखात जाऊन पडला.

सज्जन पुरुषांनी लोभच नाही तर सर्व विषय कषायांना भयंकर विषाप्रमाणे सोडले पाहिजे. कारण क्रोध, मान, माया, लोभ इत्यादींच्या हव्यासापोटी हा जीव अनंत काळापासून दुःख भोगत आलेला आहे. म्हणून सुखाची इच्छा असणाऱ्यांनी लोभ इत्यादींचा त्याग करून जिनेन्द्र भगवंतांनी दिलेल्या उपदेशानुसार धर्माचे पालन केले पाहिजे. कारण **'धर्मेव सुखदायकः – मोक्षप्रदायकश्च'** अर्थात् धर्मच सुखदायक व मोक्षदाता आहे.

**(आराधना कथाकोषसार)**

**कोणालाही कोणत्याही क्षेत्रात यश का मिळत नाही?**

जिनचन्द्र अलमान शास्त्री– हेरले

तोंड आहे पण बोलणे नाही,
बोलणे आहे पण संवाद नाही,
संवाद आहे पण विचार नाही,
विचार आहे पण ऊर्जा नाही,
ऊर्जा आहे पण वेग नाही,
वेग आहे पण दिशा नाही,
दिशा आहे पण धैर्य नाही,
धैर्य आहे पण ध्येय नाही,
ध्येय आहे पण दृष्टी नाही,
दृष्टी आहे पण सातत्य नाही,
सातत्य आहे पण केंद्रित नाही,
केंद्रित नाही, म्हणून यश नाही।।



# बहुआयामी व्यक्तिमत्त्व : शरयूताई दफ्तरी

**श्री. गोमटेश बेडगे, बाहुबली**

शरयू दफ्तरी, ज्यांना सर्व लोक सामान्यपणे **'ताई'** या नावाने ओळखत. यांचा जन्म १९३३ साली ललिता काकी आणि लालचंद हिराचंद काकांच्या पोटी झाला. उद्योगरत्न वालचंद हिराचंद यांची पुतणी व आमच्या संस्थेच्या विश्वस्त समितीचे विद्यमान अध्यक्ष अरविंद दोशी यांच्या भगिनी होत. मुंबईतील एल्फिन्स्टन कॉलेजमधून अर्थशास्त्र (बी. ए.) पदवी प्राप्त केली. त्यांचा अरविंद गौरीशंकर दफ्तरी यांच्याशी विवाह झाला. त्यांना तीन मुली आहेत.

**❊ उद्योगातील कर्तृत्व–**

१९५८ मध्ये रु. २ लाख भांडवल आणि पाच कामगारांसह भारत रेडिएटर्स लिमिटेड ही ऑटो पार्ट्स उत्पादन करणारी कंपनी स्थापन केली, तेव्हा त्या फक्त २५ वर्षांच्या होत्या. दोशी कुटुंबीयांच्या घराण्यामध्ये जेव्हा महिलांना फारसं काही करावं लागत नसायचं त्याकाळी खूप मोठ्या धाडसाने त्या उद्योग जगतात पडल्या.

भारतातील महिला उद्योजकांचा इतिहास पाहिल्यास सुमती मोरारजी या शिपिंग उद्योगातील पहिल्या आणि शरयू दप्तरी या दुसऱ्या महिला उद्योजिका मानल्या जातात. १९८१ साली इंडियन मर्चेंट्स चेंबरच्या अध्यक्षा म्हणून निवडून आल्या. शरयूताईंनी इंडियन मर्चंट चेंबरच्या महिला शाखेची उभारणी केली. दरवर्षी महिला शाखेचे एक शिष्टमंडळ अर्थमंत्र्यांची भेट घेण्यासाठी नेत असत. तेव्हाचे अर्थमंत्री डॉ. मनमोहन सिंग हे आपल्या केबिन बाहेर येऊन 'आईए शरयूबेन' असे म्हणत नमस्कार करीत ताईंचे स्वागत करीत असत. मान आणि प्रतिष्ठा मिळविण्यासाठी केवळ पैसा असून चालत नाही तर भरीव कार्य लागतं, हे यावरून लक्षात येतं.

'लोभ नाही, गरज' अशी परिभाषित केलेली कामाची नीतिमत्ता यामुळे वालचंद कुटुंबातील या उत्साही वारसाला पुरुषप्रधान क्षेत्रात खूप पुढे जाण्यास सक्षम केले आहे. अशा शरयूताईंच्याकडे अनेक 'प्रथम' आहेत. १९८१ मध्ये इंडियन मर्चंट्स चेंबर (आयएमसी)च्या त्यांना पहिल्या महिला अध्यक्षा म्हणून निवडून येण्याचा मान मिळाला होता, १९७१ मध्ये (एसीएमए) ऑटोमोटिव्ह कंपोनेंट्स मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशनच्या अध्यक्षपदी निवडून येणाऱ्या पहिल्या महिला, फिक्की (फेडरेशन ऑफ इंडियन चेंबर्स ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्री, नवी दिल्ली)च्या कार्यकारी समितीच्या पहिल्या महिला सदस्या आणि त्यांच्या क्षेत्रातील रोटरी क्लबच्या पहिल्या महिला रोटेरियन होण्याचा मान मिळविला आहे.

खरं तर, आयएमसीमध्ये त्यांच्या सुरुवातीच्या कारकिर्दीत, त्या त्यांच्या मुख्य प्रवाहातील संस्थेच्या आणि महिला विंगच्या अध्यक्षपदी निवडून आलेल्या होत्या.

ब्रिटनच्या माजी पंतप्रधान मार्गारेट थॅचर या भारताच्या माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांना ताजमहाल हॉटेलमध्ये भेटणार होत्या. इंदिरा गांधी यांनी त्या बैठकीचे निमंत्रण फक्त आणि फक्त शरयूताईंना होते. त्यावेळी या तीन शक्तिशाली महिलांनी काय हितगुज केले, याचे कोडे कोणालाही उलगडले नाही.

**❋ संस्थेशी स्नेह–**

ताई संस्थेच्या अध्यक्षा होण्याच्यापूर्वी ब्र. माणिकचंदजी भीसीकर गुरुजी संचालक असताना मध्यंतरी काही काळ संस्थेकरिता वाहन नव्हते, गुरुजींना बसने प्रवास करताना होणारा त्रास पाहून त्यांनी संस्थेला एक महिंद्रा जीप घेऊन दिली होती.

बाहुबलीतील दिगंबर व श्वेतांबर यांच्यातील विवादामध्ये १९८३ साली सांगली, कोल्हापूर शहरांत शांतता मोर्चा काढून त्याचे नेतृत्व ताईंनी केलेले होते. बाहुबली क्षेत्राचे संरक्षण केवळ आणि केवळ ताई व लालचंद काका यांच्या राजकीय दबावामुळेच होऊ शकले. याचा परिपाक म्हणून त्यांना नाइलाजाने तेव्हाच्या काँग्रेसच्या नेत्यांचा प्रचार करावा लागला. याकरिता त्यांच्यावरती आरोप करण्यात आले. ताईंना याचे खूप दुःख झाले. ताई खाजगीमध्ये म्हणायच्या माझ्यावर आणखीन काही आरोप झाले असले तरी मला काही वाईट वाटले नसते, परंतु ज्या पद्धतीने आपल्या समाजाने आरोप केले त्याला उत्तर देणे देखील मला अपमानास्पद वाटत आहे; कारण माझा जन्मच अशा घरात झालेला आहे की जन्मत:च तोंडात सोन्याचा चमचा आणि झोपायला सोन्याचा पाळणा घेऊन जन्माला आलेल्या मला लोकांनी कसलेही आरोप करावेत याचा खेद होत आहे.

१९८३च्या दरम्यान मा. शरद पवार एकदा वडगावहून कुंभोजकडे चालले होते. ते ताईंना समजले. तेव्हा त्यांनी करके गुरुजी व माझ्या वडिलांना एक सूचना केली की आपण रस्त्यावर जाऊन संस्थेच्या वतीने एक हार घाला आणि ही माझी चिठ्ठी त्यांना दाखवा. त्याप्रमाणे हे सर्व लोक बाहुबली कुंभोजच्या तिकटीला थांबले. पवार साहेबांची गाडी आली. लोक थांबलेले पाहून ते गाडीतून उतरले. तेव्हा ती चिठ्ठी त्यांना दिली. त्या चिठ्ठीत असे वाक्य होते. 'प्रिय शरद, मी इथे बाहुबलीत आहे. तू जर येऊन चहा घेऊन भेटून गेलास तर मला बरे वाटेल.' तेव्हा पवार साहेब म्हणाले, 'अरे बापरे शरयू इथे आली आहे का? चला.' असं म्हणाले व बाहुबलीत येऊन शरयू ताईंना भेटून गेले.

सन १९९१ला समंतभद्र महाराज-जन्मशताब्दीनिमित्त परमपूज्य गुरुदेव समंतभद्र महाराज यांचा विचार व चरित्र याचा प्रचार व प्रसार १०० गावांमध्ये करण्याचे संस्थेने ठरविले होते. परंतु यासाठी स्वतंत्र वाहन करणे आवश्यक होते तेव्हा ताईंनी अहिंसा प्रसारक ट्रस्टतर्फे टेम्पो वर्षभर संस्थेसाठी देऊ केला होता. ब्रह्मचारी भूपाल गुरुजी, तत्कालीन टेक्निकल विभागप्रमुख श्री. जीवेंद्र जडे सर, मी स्वतः व टेक्निकलचे आर. बी. चौगुले सर व आणखी संस्थेचे दोघे तिघे कार्यकर्ते असे मिळून कर्नाटक व महाराष्ट्रात १०० गावांमध्ये गुरुदेवांचा प्रचार व प्रसार केला. अशाप्रकारे संस्थेमध्ये कोणतीही अडचण निर्माण झाल्यास त्या स्वतः त्यासाठी तत्परतेने लक्ष घालून सकारात्मक मार्ग काढून कार्य पूर्णत्वास नेत असत.

सांगली जिल्ह्यातील डिग्रज या गावच्या शेतकऱ्यावर पोलिसांकडून जेव्हा अन्याय झाला होता तेव्हा त्या जैनबोधकच्या संपादिका म्हणून शेतकऱ्यांच्या व्यथा ऐकून घ्यायला बाहुबलीस आल्या होत्या. इथून डिग्रजला जायचे होते. तेव्हा संस्थेमध्ये गाडी नव्हती. तेव्हा ताई मला म्हणाल्या 'राजू, तुझी गाडी असेल तर आपण डिग्रजला जाऊन येऊ.' माझी मारुती ८०० कार होती व ती सुद्धा पेट्रोलची डिझेल कन्व्हर्ट केलेली. मी ड्रायव्हिंग करत होतो. गाडीमध्ये ताई असल्याने अतिशय शिस्तीने ड्रायव्हिंग करू लागलो. ताईंना स्लो गाडी चाललेली पसंत पडली नाही. त्या म्हणाल्या, 'राजू, गाडी फास्ट मारतोस की मी ड्रायव्हिंगला बसू? मी मुंबईमध्ये डॅशिंग कार ड्रायव्हिंग करणारी मुलगी म्हणून झळकले आहे, तुला माहित आहे का?' आणि हे खरेच होते. त्यांच्या कार ड्रायव्हिंगबद्दल तेव्हाच्या मासिकमधून बातमी प्रसिद्ध झाली होती.

ताई जशा उद्योजिका व सामाजिक

कार्यकर्त्या होत्या त्याचप्रमाणे त्या सुगरणसुद्धा होत्या. पदार्थ कसे करायचे हे बाहुबलीत आल्यानंतर आमच्या आईला किंवा तिथल्या महिलांना सांगायच्या. घरी सर्व काम करण्यासाठी नोकर-चाकर असायचे. त्यांचा देखील सांभाळ त्या अतिशय काळजीने करायच्या. ताई म्हणायच्या आमच्या घरी जो स्वयंपाक केला जायचा तो पहिल्यांदा नोकरांनी जेवायचा आणि मग घरचे लोक जेवायचे, असा शिरस्ता आहे. एवढा आपलेपणा घरी काम करणाऱ्या नोकराबाबत असे.

एकदा ताईंनी भीसीकर गुरुजींना दोन विद्यार्थ्यांना गुरुकुलात प्रवेश देण्याविषयी एक पत्र लिहिले व शेवटी असे नमूद केले की त्या दोघांचा जो खर्च येईल तो खर्च ते गुरुकुलात शिकेपर्यंत माझ्याकडून दिला जाईल. मी शिफारस केलेल्या व्यक्तीचा खर्च गुरुकुलावर पडता कामा नये. अशी खबरदारी त्या स्वतः अध्यक्षा म्हणून घेत.

ताईंनी आयुष्यभर शाकाहाराचा प्रचार व प्रसार करण्यासाठी खूप परिश्रम व शक्ती खर्च केली. जिथे जिथे पंचकल्याणक असतील त्या ठिकाणी 'शाकाहार - सर्वश्रेष्ठ आहार'च्या प्रदर्शनी भरवल्या.

पांढरी शुभ्र एम्ब्रॉयडरी केलेल्या साड्या नेसण्यामध्ये त्यांना खूप हौस असायची. कपाळाला लाल ठळक कुंकू असायचे. बाहुबली ब्रह्मचर्याश्रमाच्या १९८३ ते १९९६ या काळात अध्यक्षा राहिलेल्या ताई दक्षिण भारत जैन सभेच्या सुद्धा अध्यक्षा राहिल्या आहेत.

व्यक्तिशः शरयूताईंचा माझ्या वडिलांवर खूपच विश्वास व जीव होता. संस्थेचा कोणताही महत्त्वाचा पत्रव्यवहार करायचा असेल तर तो माझ्या वडिलांच्या मार्फतच त्या करायच्या. ठाम विश्वास व जबरदस्त आधार असणारे एक ते भारदस्त व्यक्तिमत्त्व होते.

असे अतिशय कणखर आणि सुंदर व्यक्तिमत्त्व आज आपल्यातून हरपले आहे, त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली..!!


---

## शरयूताई यांना श्रद्धांजली अर्पण करताना.....



**श्रद्धांजली सभेत प्रतिमापूजन व दीपप्रज्वलन करताना श्री. प्रकाशअण्णा आवाडे, श्री. डी. सी. पाटील, श्री. गोमटेश बेडगे, श्री. तात्यासो अथणे, श्री. बाबासाहेब पाटील, श्री. रवींद्र खोत, श्री. अशोक पाटील आदी**

**※ श्रद्धांजलीपर मनोगत.....**



विश्वस्त समितीचे अध्यक्ष
श्री. अरविंदजी दोशी



विद्यापीठाचे अध्यक्ष
श्री. प्रकाशराव आवाडे



महामंत्री
श्री. डी. सी. पाटील



संचालक
श्री. गोमटेश बेडगे



# साहसी उद्योजिका श्रीमती शरयुताई दफ्तरी

**डॉ. नेमिनाथ शास्त्री, बाहुबली**

**❊ परिवार–**

प्रथितयश उद्योजिका श्रीमती शरयुताई दफ्तरी यांचा जन्म १९३३ साली मुंबईतील आंतरराष्ट्रीय ख्यातीच्या वालचंद उद्योग समूहाच्या कुटुंबात ललिताबाई आणि उद्योगपती लालचंद हिराचंद यांच्या पोटी झाला. त्यांनी मुंबईतील एल्फिन्स्टन कॉलेजमधून अर्थशास्त्रात (बी.ए.) पदवी प्राप्त केली आणि वयाच्या १९व्या वर्षी अरविंद गौरीशंकर दफ्तरी यांच्याशी विवाहबद्ध झाल्या. दफ्तरी दाम्पत्याला तीन मुली आहेत. मोठी मुलगी झाई शाह एक रेस्टॉरंट मालक आहे. गौरी पोहोमल एक उद्योजिका आणि परोपकारी आहे आणि सर्वात धाकटी कविता खन्ना ही गृहिणी आहे आणि तिचे लग्न अभिनेता विनोद खन्ना यांच्याशी झाले होते.

**❊ यशस्वी उद्योजिका–**

त्यांनी १९५८ मध्ये रुपये दोन लाख भांडवल आणि पाच कामगारांसह भारत रेडिएटर्स लिमिटेड ही ऑटो पार्ट्स् उत्पादन करणारी कंपनी स्थापन केली, जेव्हा त्या फक्त २५ वर्षांच्या होत्या आणि तेव्हापासून त्या व्यवसायाच्या व्यवस्थापकीय संचालक म्हणून कार्यरत होत्या. भारतीय औद्योगिक क्षेत्रात त्यांचे लक्षवेधी योगदान आहे. १९७१ मध्ये जेव्हा त्या ऑटोमोटिव्ह कंपोनेंट्स मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशन ऑफ इंडिया (एसीएमए)च्या अध्यक्षपदी निवडल्या गेल्या तेव्हा त्या या पदावर निवडून येणाऱ्या पहिल्या महिला ठरल्या. इंडियन मर्चंट्स चेंबर (आयएमसी) (१९८१)च्या पहिल्या महिला अध्यक्षा व फेडरेशन ऑफ इंडियन चेंबर्स ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्री (एफआयसीसीआय)च्या कार्यकारी समितीच्या सदस्या म्हणून निवडल्या जाणाऱ्या पहिल्या महिला होण्याचा मानही त्यांना मिळाला.

**❊ सामाजिक व धार्मिक सक्रियता–**

१९८३ ते १९९६ अशाप्रकारे चौदा वर्षे श्री बाहुबली ब्रह्मचर्याश्रम, बाहुबली या संस्थेच्या त्या एकमेव महिला अध्यक्षा होत्या. त्यांच्याच कार्यकाळात बाहुबली क्षेत्रावरील संकट दूर करण्यात आले. बाहुबली प्रकरणात त्या स्वतः बाहुबलीत ठाण मांडून होत्या. आचार्यश्री विद्यानंद महाराज यांच्या प्रेरणेने गुरुकुल दिव्यावदान समारंभ संपन्न झाला. १९८८ साली गुरुदेवश्रींची समाधी झाली तेव्हा त्यांचे कार्य संपूर्ण जगाला कळावे याकरिता त्यांनी विविध प्रकल्प राबविले. १९८९ साली भगवान बाहुबलींचा महामस्तकाभिषेक आयोजित करण्यात आला तर १९९१ साली गुरुदेव समंतभद्र महाराज यांची जन्मशताब्दी खूप मोठ्या प्रमाणात आयोजित करण्यात आली होती. गावोगावी गुरुदेवश्रींचे विचार पोहोचवण्यासाठी त्यांनी आपली स्वतःची मोटार गाडी सुद्धा दिली होती आणि विविध नावीन्यपूर्ण उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. या जन्मशताब्दीची सुरुवात आचार्य श्री विद्यानंद महाराज यांच्या मंगल सानिध्यात तत्कालीन पंतप्रधान श्री. पी. व्ही. नरसिंहराव यांच्या शुभहस्ते कुंदकुंद भारती, दिल्ली येथे सुरुवात करविली होती. तसेच तेथील लालबहादूर शास्त्री विश्वविद्यालयात गुरुकुल शिक्षण पद्धती आणि गुरुदेव श्री समंतभद्र महाराज यांच्या विषयी संगोष्ठी देखील आयोजित करण्यात आली होती.

सन १९८१मध्ये श्रवणबेळगोळ येथे

सहस्राब्दी महामस्तकाभिषेक आयोजित करण्यात आला होता. त्यातही त्यांचा सक्रिय सहभाग होता. दक्षिण भारत जैन सभेच्या पहिल्या महिला अध्यक्षा होण्याचा मान त्यांना जातो. दक्षिण भारत जैन सभेच्या माध्यमातून त्यांनी संपूर्ण दक्षिण भारतात समाज जागृतीचे अभूतपूर्व असे कार्य केले आहे.

श्रीमती शरयूताई दफ्तरी या दक्षिण भारत जैन सभेच्या अध्यक्षस्थानी असताना त्यांच्या नेतृत्वाखाली सभेने दमदार वाटचाल केली होती आणि सभेला त्यांच्यामुळे राष्ट्रीय स्तरावर प्रतिष्ठा प्राप्त झाली होती. सभेच्या जनरल बॉडीत व मध्यवर्ती कार्यकारी मंडळात त्यांची अभ्यासपूर्ण भाषणे होत असत. त्यांच्या अध्यक्षीय कारकीर्दीत गेटकेन ऊस प्रकरण गाजले होते. या प्रकरणी सभेच्या बैठकीत त्यांनी सडेतोड मते व्यक्त केली.

गुरुदेव समंतभद्र महाराज आचार्यश्री विद्यानंदजी, आचार्य आर्यनंदीजी, आचार्यरत्न देशभूषणजी, आचार्य बाहुबली महाराज यांच्यावर त्यांची निःसीम भक्ती होती. मुनी-आर्यिका यांच्या आहार-विहार प्रसंगी त्यांचा सक्रिय सहभाग व मदत खूप मोठी होती. वीराचार्य बाबासाहेब कुचनुरे आणि वीर सेवा दलाच्या कार्याचा त्या अभिमानाने उल्लेख करायच्या. पंथभेद बाजूला ठेवून सारा जैन समाज एकाच छताखाली येऊन आपली सर्वांगीण प्रगती करून घ्यावा असा त्यांचा खास आग्रह होता.

*** साहित्यिक चळवळ-**

त्यांच्या आजोबांनी स्थापन केलेल्या आणि जैन समुदायाचे मुखपत्र असलेल्या जैनबोधक या पाक्षिकाच्या त्या संपादिका होत्या. संपादकत्वाच्या कार्यकाळात त्यांनी अनेक नवीन सदर सुरू केले. शाकाहार हाच उत्तम आहार आहे या तत्त्वानुसार त्यांनी रुचिरा हे विविध पक्वान्न घडविण्याचे सदर सुरू केले. आचार्य विद्यानंद महाराज यांची प्रवचने प्रकाशित केली. कालांतराने अहिंसा प्रचारक ट्रस्ट या आपल्या स्वतःच्या संस्थेमार्फत स्वानंद विद्यामृत या नावाची आचार्य श्री विद्यानंद महाराज यांची प्रवचने सुमारे सात भागांमध्ये प्रकाशित करविली. तसेच अहिंसा व शाकाहार या विषयाला अनुसरून अनेक उपक्रम त्यांनी राबविले तर जैनबोधक या मासिकाच्या हिंदी आवृत्तीचेही प्रकाशन दिल्लीहून काही वर्षे करीत होते.

त्यांनी पुस्तिका व पत्रकाच्या माध्यमातून व्यसनमुक्ती व शाकाहार चळवळ उभी केली होती. त्यासाठी त्या वारंवार स्व. डॉ. धनंजय गुंडे व वीराचार्य बाबासाहेब कुचनुरे यांच्याशी संवाद साधून मदत करायच्या. तीर्थंकर मासिकाचे संपादक श्रेणिक अन्नदाते यांच्यावर त्यांचा दांडगा विश्वास होता. तत्कालीन आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून जिनधर्माचा प्रचार केला.

*** स्वानुभव-**

जे काही करा त्यामध्ये आपले सर्वस्व अर्पण करा आणि कोणतेही कार्य करण्यास घाबरू नका. धर्मकार्यात प्रामाणिकपणे, साहसीवृत्तेने कार्य करणाऱ्या कार्यकर्त्यास कधीही, केव्हाही, काहीही कमी पडत नसते, चुकत नसते, चुकले तरी त्यातून शिका. आपण मोठ्या लोकांशी देखील दिलखुलासपणे, स्वच्छ मनाने, न घाबरता बोलावे आणि त्यांच्याशी व्यवहार करावे असा मार्मिक सल्ला त्यांनी आम्हाला दिला होता हे आवर्जून आठवते. **साहसे श्री: प्रतिवसति** हे त्यांचे काका श्री. वालचंद हिराचंदजी यांचे बोधवाक्य आपल्या जीवनात उतरवले होते असे दिसून येते.

*** सन्मान व पुरस्कार-**

२००१ साली श्रीमती शरयू दफ्तरी यांना जैन समाजाचा जैनरत्न पुरस्कार मिळाला आहे आणि त्यांना भारत सरकारने २००४चा पद्मश्री हा नागरी सन्मान प्रदान केला आहे. असे अनेक पुरस्कार मिळाले आहेत.

अशा कर्तबगार जैन महिला उद्योजिका शरयूताईंचे दि. १६ मे २०२५ रोजी निधन झाले. त्या आजही बाहुबली संस्थेच्या ट्रस्टी होत्या. शरयूताईंच्या आत्म्यास चिरशांती व सद्गती लाभो हिच जिनचरणी प्रार्थना. भावपूर्ण श्रद्धांजली..!!



# बाहुबली ब्रह्मचर्याश्रमाच्या माजी अध्यक्षा पद्मश्री शरयूताई दफ्तरी यांची श्रद्धांजली सभा

बाहुबली ब्रह्मचर्याश्रमाच्या माजी अध्यक्षा पद्मश्री शरयूताई दफ्तरी यांचे दि.१६ मे २०२५ रोजी सायं. ४:३० वा. वृद्धापकाळाने मुंबई याठिकाणी दुःखद निधन झाले. बाहुबली ब्रह्मचर्याश्रम व विद्यापीठ संस्थेच्या आधारस्तंभ असलेल्या शरयूताईंना श्रद्धांजली सभेचे आयोजन बाहुबली येथे दि. २० मे २०२५ रोजी करण्यात आले होते.

श्रद्धांजली वाहताना बाहुबली विद्यापीठाचे अध्यक्ष प्रकाश आवाडे म्हणाले, बाहुबली क्षेत्रावर, गुरुदेव समंतभद्र महाराजांच्यावर नितांत श्रद्धा असलेल्या शरयूताईंच्या व आमच्या परिवाराचा ऋणानुबंध वेगळा होता. शरयूताईंचा या क्षेत्राच्या विकासासाठी मोठे योगदान होते. शाकाहार व समाज जागृतीचे कार्य त्यांनी केले. ऑल इंडिया चेंबर ऑफ कॉमर्सच्या अध्यक्षा या नात्याने त्यांचे कार्य बहुमोल होते. भारत रेडिएटर्स कंपनीच्या स्थापनेपासून अनेक उद्योगांच्या यशस्वी संयोजिका होत्या. वेळोवेळी जैन समाज व समाजाचे प्रश्न सोडवण्यासाठी त्यांनी हिरिरीने भाग घेतला. त्यांचे नेतृत्व जैन समाजाला प्रेरणा देणारे होते. प. पू. विद्यानंद महाराज व कुंदकुंद भारती या संस्थेच्या कार्याची व्यवस्था ते पाहत असत. बाहुबली संस्था परिवाराशी त्यांचे नाते अतूट होते. डॉ. एन. जे. पाटील, डॉ. धनंजय गुंडे यांच्याबरोबर विचारविनिमय करून वीर सेवा दलाची पायाभरणी करण्यात त्यांचा मोलाचा वाटा आहे. स्त्री शक्तीचा सन्मान करून आपण त्यांना श्रद्धांजली अर्पण करूया.

महामंत्री डी. सी. पाटील म्हणाले की, कणखर व करारी व्यक्तिमत्त्वाच्या शरयूताई दफ्तरी या दानशूर होत्या. उद्योग क्षेत्रातील अनेक संस्थांच्या अध्यक्षा म्हणून त्यांनी यशस्वी व कर्तबगारिने कार्य केले. गुरुदेव समंतभद्र महाराजांच्यावर अटल श्रद्धा असलेल्या शरयूताई दफ्तरींचा संस्थेच्या विकासामध्ये मोलाचा वाटा आहे.

विश्वस्त समितीचे अध्यक्ष अरविंद दोशी यांनी आपला पारिवारिक ऋणानुबंध सांगत त्यांच्या साहसीवृत्तीचे कौतुक केले. पंतप्रधान इंदिरा गांधी यांची जवळीकता सांगितली. त्यांचा राजकीय, सामाजिक, औद्योगिक, धार्मिक क्षेत्रातील दबदबा स्पष्ट केला. कामगारांचा प्रश्न हताळण्याची सचोटी सांगितली. बाहुबली क्षेत्रावरील संकट दूर करण्यासाठी पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्यापर्यंत पोहचल्या. सत्य घटना सांगून योग्य निकाल लावला. अनेक मोठमोठ्या संस्थेच्या प्रमुख पदावर राहून त्यांनी यथोचित काम केले आहे.

बाहुबली ब्रह्मचर्याश्रमचे अध्यक्ष सनत्कुमार आरवाडे, डी. ए. पाटील यांनी ऑनलाईन उपस्थित राहून श्रद्धांजली वाहिली. श्रद्धांजली सभेचे संयोजन व संचालन संचालक गोमटेश बेडगे यांनी केले. श्रद्धांजली सभेचा शेवट मेरी भावना या गीताने झाला.

श्रद्धांजली सभेस बाहुबली विद्यापीठाचे कोषाध्यक्ष बाबासाहेब पाटील, तात्यासो अथणे, शांती विद्या ज्ञान समितीचे अध्यक्ष अभय बरगाले, रवींद्र खोत, अशोक पाटील, प्रकाश पाटील, रायचंद हेरवाडे, सुरेश चौगुले, ए. ए. खाडे, अशोक नाईक सर्व शाखांचे मुख्याध्यापक, अध्यापक, अध्यापिका व संस्थेचे कार्यकर्ते उपस्थित होते.



# अनवट वाटेवरील प्रवासी

**वृंदा प्राजक्त मेहता,** नाशिक

**श्री. आमोदजी मेहता, नाशिक** ! वय वर्षे ८४ फक्त ! फक्त यासाठी की या वयात त्यांनी संस्कृतचा डिप्लोमा कोर्स पुणे विद्यापीठातून चक्क दुसरे स्थान प्राप्त करीत पूर्ण केला. संस्कृतचा साधा गंधही नसणारा इंजीनियरिंग शाखेचा विद्यार्थी जेव्हा असे काही यश मिळवेल, त्यावेळी कुटुंबीयांसाठी किती अप्रूप असेल ना ! नात्याने ते माझे श्वसुर, माझ्यावर – आम्हा सर्वांवर अगदी पितृवत् माया करणारे ! आम्ही त्यांना दादा म्हणतो. आणि विद्यार्थी यासाठी म्हटले की कायम काहीतरी शिकतच असतात. माणसाने नेहमी – अगदी आयुष्यभर विद्यार्थीच असावे असे म्हणणे–बोलणे वेगळे. परंतु तसे प्रत्यक्ष आचरणात उतरविण्यासाठी किती ठण लागतो हे प्रत्येकाने स्वतः वरून जोखावे. मनाने एखाद्या गोष्टीचा ध्यास घेतला की त्यासाठी स्वतःला झोकून द्यायचे हा दादांचा स्थायीभावच ! मग वेळेचे भान विसरले जाते, तहानभूक दुर्लक्षित होते आणि प्रकृतीच्या तक्रारींना थाराच उरत नाही. आता हेच बघा ना ! संस्कृतच्या अभ्यासासाठी दादा भल्या पहाटे साडेतीन वाजताच उठायचे. राम शब्द घोटत अभ्यासाला सुरुवात व्हायची. मग विविध शब्दांचे पाठांतर , श्लोक कंठस्थ करणे, पेपर लिहिण्याची सवय होण्यासाठी लिहिण्याचा सराव करणे अशी तपश्चर्या सुरू झाली. लिहिण्याची सवय राहिली नसल्याने सुरुवातीला कडक पेनमुळे बोटे दुखायची, हातही दुखायचा. मग त्यांनी पेनला कापड गुंडाळून लिहिण्याचा सराव केला. डोळ्यांचा त्रास होता, त्यावरही मात केली. परिणाम ? **९२ % गुणांसह विद्यापीठाच्या गुणवत्ता यादीत द्वितीय स्थान !**

आयुष्यात मळलेल्या वाटेवरचा प्रवास दादांच्या मनाला कधी भावलाच नाही. तसे असते तर निमगावच्या श्री. रतनचंदजी व रत्नप्रभाजी मेहता या दांपत्याच्या पोटी एका सधन कुटुंबामध्ये जन्माला आलेल्या या मुलाने घरच्या सावकारी, दुकानदारी वगैरे व्यवसायांमध्ये लक्ष घातले असते आणि एक सरळसोट – सुरक्षित जीवनवाट चोखाळली असती. परंतु प्रारब्ध वेगळे होते. निमगावला इयत्ता सहावीपर्यंतचे शिक्षण आजी–आजोबांजवळ राहून घेतल्यानंतर नाशिकला शिफ्ट झालेल्या आपल्या आई – वडिलांजवळ ते राहायला आले आणि इयत्ता सातवीपासूनचे शिक्षण मग नाशिकच्या पेठे हायस्कूलमध्ये सुरू झाले. शाळेत असताना एकदा त्यांनी आपल्या सुंदर हस्ताक्षरात, शुद्धलेखनाची एकही चूक किंवा खोडतोड न करता, हस्तलिखित अगदी एकहाती लिहून पूर्ण करीत सरांच्या हाती सोपवले. घटना अगदी छोटी परंतु दादांमधील अनेक गुणांना उजागर करणारी ! टापटीप, एकाग्रता, विलक्षण चिकाटी आणि बुद्धिमत्ता या आयुष्याला आकार देण्यात महत्त्वपूर्ण भूमिका अदा करणाऱ्या गुणांचे दिग्दर्शन करणारी ! आणि जोडीला सुंदर हस्ताक्षर ! वाचणाऱ्याला प्रभावित करणारे !

नाशिकला आल्यानंतर बाहेरचे जग खूप मोठे आहे आणि त्यात अफाट संधी उपलब्ध आहेत, हे त्यांच्या चाणाक्ष बुद्धीने ओळखले. शिक्षण पूर्ण करीत त्यांनी पुण्याच्या नावाजलेल्या इंजीनिअरिंग कॉलेजमधून (COEP) पदवी प्राप्त केली. आता मनात आणले असते तर त्यांना एखाद्या कंपनीत सहजच उच्च पदाची आणि लठ्ठ पगाराची नोकरी सहज मिळाली असती. परंतु दादांनी स्वभावानुसार अनवट वाट चोखाळली. त्यांनी coldforging

क्षेत्रात पाऊल ठेवण्याचे धाडस केले आणि स्वतःची कंपनी सुरू केली. वाट निश्चितच सोपी नव्हती. अनेक अडचणी आल्या. परंतु हार मानतील ते दादा कसले ? सर्व अडचणीतून मार्ग काढत त्यांनी कंपनीला नावारूपाला आणले.

आयुष्यात असे स्थिरस्थावर होत असतानाच प्रखर सामाजिक भान असणारे दादा सामाजिक कार्यातही तेवढेच सक्रिय होते. JCI या संस्थेचे ते अध्यक्ष असताना त्यांच्या अध्यक्षीय कारकीर्दीत त्यांनी घेतलेल्या प्रोजेक्टचे रेकॉर्ड अजूनही कोणाला मोडता आले नाही. Time management, Public seaking इत्यादी अनेक कोर्सेस त्यांनी घेतले आहेत आणि आजही तेवढ्याच उत्साहाने घेत आहेत. ते एक प्रभावी वक्ता आहेत.

कोणत्याही संकटाने खचून न जाता प्रखर मनोबलाने त्याचा सामना करणे ही दादांची खासियत ! सुमारे १२ वर्षांपूर्वी त्यांना हार्ट अटॅक आला होता. बऱ्याच डॉक्टरांशी सल्लामसलत झाली. सर्वांचे मत होते की बायपास सर्जरी करावीच लागेल. परंतु दादा निश्चयावर ठाम होते की, अजिबात करणार नाही . त्यांनी खाण्यापिण्यावर पूर्ण नियंत्रण आणले. तेलतुप पूर्णपणे बंद. पोळी–भाकरी नाहीच्या बरोबर.फक्त सॅलड आणि भाजी खायचे. आणि डॉक्टरांसाठी पण आश्चर्याची गोष्ट म्हणजे दादा यातून पूर्ण बरे झाले. आज ८४व्या वर्षीही ते गजपंथचा पहाड न थांबता चढून जातात आणि तरुणांनाही लाजवतील असा व्यायाम करतात. आमच्या घरातील सर्वात तरुण आणि तंदुरुस्त व्यक्ती म्हणजे दादा ! शरीराने आणि मनानेही !

आयुष्याचे मर्म त्यांनी अचूक ओळखले. जीवनाच्या या प्रवासात त्यांनी अखंड माणसे जोडण्याचे काम केले. कारखान्यात काम करणाऱ्या लोकांशी सुद्धा असे स्नेहपूर्ण संबंध की ते दादांना भेटायला आवर्जून घरी येतात.

फक्त आयुष्याचे मर्मच नाही तर या मानवी पर्यायाची सार्थकता कशात आहे हे सुद्धा त्यांनी अचूक ओळखले. म्हणूनच व्यस्त दिनक्रमातून वेळ काढून ते नियमित स्वाध्याय करतात. स्वाध्यायाची रुची एवढी की, विदुषी पं. विजयाताई भीसीकर यांच्याजवळ  काही वर्षांपूर्वी खास कारंजाला येऊन त्यांनी धर्मग्रंथांचा स्वाध्याय केला. 'समयसारादी ग्रंथ मूळ संस्कृत टीकेसह वाचले तरच आचार्यांच्या कथनाची खरी भावभासना होईल', हे ताईंचे वाक्य त्यांच्या मनाला भिडले आणि मग सुरू झाला संस्कृतच्या अध्ययनाचा प्रवास ! त्यांच्या अध्ययनामागील प्रेरणा म्हणजे ताईंचे ते शब्द आणि आत्मकल्याणाबद्दलची सजगता !

आज आयुष्याच्या या टप्प्यावर दादांची आयुष्याबद्दल कसलीच तक्रार नाही. मुले – नातवंडं त्यांच्या मार्गदर्शनात कारखान्याला पुढे नेत आहेत. आज त्याचे वटवृक्षात झालेले रूपांतर दादा तृप्त मनाने न्याहाळत आहेत. त्यांना निरामय दीर्घायुष्याची प्राप्ती होऊन त्यांच्या हातून अधिकाधिक धर्मसाधना होवो ही एकच मंगल भावना आमच्या मनात आहे.

---



**बाहुबली येथील विद्यार्थ्यांची आयआयटी दिल्लीत गरुडझेप : यशाचे नवे शिखर**

एम. जी. शहा विद्यामंदिर व ज्युनिअर कॉलेज, बाहुबली येथील **सिद्धार्थ रवींद्र ऐनापुरे** या विद्यार्थ्यांने नेत्रदीपक यश संपादन करत गेट (GATE) परीक्षा क्वालिफाय होऊन थेट आयआयटी (IIT) दिल्लीमध्ये एमटेक (M.Tech) ला प्रवेश मिळवला आहे. या यशाने विद्यालयाच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा खोवला गेला आहे. या विद्यार्थ्याचे पहिली ते दहावीपर्यंतचे शिक्षण बाहुबली येथे झाले. तो बाहुबली येथील वरिष्ठ लिपिक श्री. रवींद्र ऐनापुरे, कुंभोज यांचा चिरंजीव असून त्याचे पहिली ते दहावीअखेरचे शिक्षण बाहुबलीत झाले आहे.

**प. पू. गुरुदेव १०८ श्री समंतभद्र महाराजद्वारा संस्थापित**

## श्री बाहुबली विद्यापीठातर्फे संचालित शाळेतील शालांत परीक्षेचा निकाल

### : कर्नाटक विभाग :

**१) एस. जे. गर्ल्स हायस्कूल, तेरदाळ**

**शाळेचा निकाल – ८८.७१%**

1) Pragati Anil Arage 98.72%
2) Laxmi Ashok Savantanavare 96.00%
3) Smita Bujabali Kadahatti 94.40 %

**२) एस. एम. हायस्कूल, तेरदाळ**

**शाळेचा निकाल – ८५.००%**

1) Prajwal Ajit Kakatanur 96.80 %
2) Anand Ramesh Gadivaddar 95.84%
3) Samarth Jaypal Danigond 95.68 %

**३) पार्श्वमती कन्या विद्यालय, अकोळ**

**शाळेचा निकाल – ८५.७१%**

१) कु. गायत्री संताजी घोरपडे ९१.३६%
२) कु. आरती विनोद खोत ८५.९२%
३) कु. स्नेहल गुंडराव पाटील ८२.८८%

**४) ए. एस. पाटील हायस्कूल, स्तवनिधी**

**शाळेचा निकाल – ८७.३४%**

१) अमूल्या देवगोंडा पाटील ९४.५६
२) विनायक कृष्णात पाटील ९१.३६
३) श्रद्धा प्रवीण नंदरगी ९०.०८

**५) सन्मति विद्यामंदिर, सिदनाळ**

**शाळेचा निकाल – ७५.००%**

1) Anushaka Mahendra Neje 95.52%
2) Supriya Anil Khilare 86.56%
3) Joya Najaruddin Mulla 83.36%

**६) भरतेश विद्यालय, बेल्लद बागेवाडी**

**शाळेचा निकाल – ५८.९१%**

(३११ पैकी १९५ विद्यार्थी उत्तीर्ण)

1) Kempanna Maruti Goudar 99.20%
2) Preetam Rajendra Halkarni 97.12%
3) Siddhant P. Alagoudar 96.80 %

**७)Bhartesh PUCollege, BelladBagewadi**

1) Divya K. Hanji (Science) 94.66%
2) Ashwini R. Pujeri (Science) 94.00%
3) Suvarna R. Pukate (Arts) 91.66 %

**८) J. V. Mandal PU College, Terdal**

1) Shobha Karigar (Commerce) 95.50 %
2) Pratiksha Athani (Arts) 94.83 %
3) Keerti Yadavanavar (Commerce) 94.50%
Laxmi Karigar (Commerce) 94.50%

---

## प. पू. गुरुदेव १०८ श्री समंतभद्र महाराजद्वारा संस्थापित गुरुकुलांचा निकाल

**श्री बाहुबली ब्रह्मचर्याश्रम, बाहुबली**

एकूण विद्यार्थी – ६३ **गुरुकुलचा निकाल –१००%**

१) सार्थ सचिन बेडगे ९०.००%
२) समर्थ सिद्धाराम वागदरी ८९.००%
सार्थक महावीर ढोकर ८९.००%
३) पर्वराज जीवंधर दानोळे ८८.२०%

**श्री महावीर ब्रह्मचर्याश्रम हायस्कूल,कारंजा लाड**

**गुरुकुलचा निकाल १००%**

गुरुकुल विद्यार्थी संख्या– ०७

१) चि.प्रणव शशिकांत झडपे ७९.६०%
२) चि.श्रुतेश रवींद्र ढोले ७५.८०%
३) चि.अरिहंत कस्तुरचंद शेवाळे ७३.२०%

*** कंकुबाई कन्या श्राविकाश्रम, कारंजा(लाड)**

**श्राविकाश्रमचा निकाल – १००%**

१) आकांक्षा सतीश हलगे ९२.६०%
२) मयुरी गणेश सैतवाळ ८०.००%
३) प्रतीक्षा प्रदीप देवळकर ७८.८०%

**श्री पार्श्वनाथ ब्रह्मचर्याश्रम, वेरूळ**

प्रविष्ट विद्यार्थी– ३१ **गुरुकुलचा निकाल ९६.७७%**

१) चि. अथर्व अमोल अंदुरे ८९.८०%
२) चि. कृष्णा ऋषभनाथ बुबने ८३.८०%
३) चि. सम्यक गणेश मेहत्रे ८२.६०%

**श्री जिनसेनाचार्य गुरुकुल, तेरदाळ**

**गुरुकुलचा निकाल–९३.३३%**

1) Deepak Chikkappa Marguddi 93.22%
2) Shrishail Mallappa Patil 84.48%
3) Sourabh Baramappa Halingali 83.20%

## प. पू. गुरुदेव १०८ श्री समंतभद्र महाराजद्वारा संस्थापित

# श्री बाहुबली विद्यापीठातर्फे संचालित शाळेतील शालांत परीक्षेचा निकाल

## : पश्चिम महाराष्ट्र विभाग :

**१) जनतारा कल्पवृक्ष विद्यामंदिर, जयसिंगपूर**

**शाळेचा निकाल – १००%**

१) सई राजेश पाटील ९९.८०%
२) सोहम संतोष पाटील ९८.००%
शर्वरी संजय चावरे ९८.००%
३) चैत्राली सुनिल दुधाळकर ९७.६०%

**२) दादा नाना भोकरे हायस्कूल, कवठेसार**

**शाळेचा निकाल – १००%**

१) सानिका मलगोंडा पाटील ९०.६०%
२) जिया बाबासो राजुभाई ८९.८०%
३) हर्षदा रमेश पाटील ८०.४०%

**३) सन्मति विद्यालय, तारदाळ**

**शाळेचा निकाल – ९९.२५%**

१) अनुष्का लक्ष्मण कारंडे ९७.२०%
२) सोहम दत्तात्रय कांदळकर ९५.००%
३) शाहिद इकबाल पेंढारी ९३.६०%

**४) एम. जी. शहा विद्यामंदिर, बाहुबली**

**शाळेचा निकाल – ९८.४३%**

१) पार्श्व अभिनंदन पाटील ९८.८०%
२) पार्श्व सुधीर पाटील ९८.२०%
३) सोहन संजय पाटील ९७.८०%
आदर्श कुमार शिंदेवाले ९७.८०%

**५) विद्यासागर हायस्कूल, अकिवाट**

**शाळेचा निकाल – ९६.१९%**

१) स्नेहल दत्तात्रय पाटील ९५.००%
२) श्रावणी अमोल चौगुले ९४.६०%
स्नेहल शिवाजी गायकवाड ९४.६०%
३) प्राची भाऊसो आरबाळे ९३.८०%

**६) रत्नसागर हायस्कूल निमशिरगांव**

**शाळेचा निकाल – ९७.१८%**

१) प्राप्ती आण्णासो पाटील ९४.८०%
२) निकुंज महेश शिंगे ९३. ४०%
३) फिरदोस राजू बागसार ८७.००%

**९) सरस्वती हायस्कूल, टाकळीवाडी**

**शाळेचा निकाल – ९२.८५%**

१) श्रुतिका सुरेश परीट ९१.८०%
२) सायली अजित निर्मळे ८३.६०%
३) सक्षम विठ्ठल निर्मळे ८३.४०%

*** आ. न. नांद्रेकर ज्युनि. कॉलेज, जयसिंगपूर**

**कॉलेजचा निकाल – ९८.७६%**

१) संजना सदानंद शिंदे ८३.८३% वाणिज्य
२) श्रुती स्वप्निल नांद्रेकर ८३.१७% विज्ञान
३) सानिका सचिन परमाप्पा ८२.३३% विज्ञान

*** एम. जी. शहा ज्युनि. कॉलेज, बाहुबली**

**कॉलेजचा निकाल – ९४.७३%**

१) श्रेया महावीर लकाडे ८७.१७% वाणिज्य
२) साक्षी संजय पाटील ७८.५०% वाणिज्य
३) दिव्या दीपक भंडारी ७६.५०% वाणिज्य

## प. पू. गुरुदेव १०८ श्री समंतभद्र महाराजद्वारा संस्थापित शाळेतील शालांत परीक्षेचा निकाल

## : विदर्भ विभाग :

**१) कंकुबाई कन्या प्रशाला, कारंजा(लाड)**

**शाळेचा निकाल – १००%**

**(सलग १९ वर्षापासून शाळेचा १००% निकाल)**

१) कु. ज्ञानेश्वरी गजानन उपाध्ये ९७.४०%
२) कु. तनुष्का संजय देशमुख ९७.२० %
३) कु.अनुष्का संजय निकडे ९६.८०%

**२) श्री म.ब्र.आश्रम हायस्कूल, कारंजा(लाड)**

**शाळेचा निकाल – १००%**

१) कु.सुहानी चंद्रकांत काशीकर ९६.२०%
२) कु.मनस्वी पंकज इंगळे ९१.४०%
३) कु.गायत्री गणेश गडकर ८८.८०%

**३) गुरुदेव समंतभद्र विद्यामंदिर, वेरुळ**

**शाळेचा निकाल – ९८.४०%**

१) कु. पलक दीपक कुमार जैन ९८.६०%
२) कु. श्रावणी अशोक मिसाळ ९३.६०%
३) वेदांत गणेश गायकवाड ९१.८०%

# गुरुदेवश्री समंतभद्र महाराजद्वारा संस्थापित

## प्रत्येक प्रशालेतील प्रथम क्रमांकप्राप्त विद्यार्थी

### * प.महाराष्ट्र विभाग *



सई पाटील ९९.८०%
जनतारा, जयसिंगपूर



पार्श्व पाटील ९८.८०%
एम. जी. शहा, बाहुबली



अनुष्का कारंडे ९७.२०%
सन्मती विद्यालय, तारदाळ



स्नेहल पाटील ९५.००%
विद्यासागर, अकिवाट



प्राप्ती पाटील ९४.८०%
रत्नसागर हाय., निमशिरगाव



श्रुतिका परीट ९१.८०%
सरस्वती हाय.,टाकळीवाडी



सानिका पाटील ९०.६०%
भोकरे हाय., कवठेसार



श्रेया लकाडे ८७.१७%
१२वी वाणिज्य
एम. जी. शहा ज्युनि., बाहुबली



संजना शिंदे ८३.८३%
१२वी वाणिज्य
नांद्रेकर ज्युनि., जयसिंगपूर

### *कर्नाटक विभाग*



**Pragati Arage**
**98.72%**
एस.जे.गर्ल्स हाय., तेरदाळ



**Prajwal Kaktanur**
**96.80 %**
एस.एम.हाय., तेरदाळ



**Anushka Neje**
**95.52%**
सन्मती विद्या., सिदनाळ



अमूल्या पाटील
९४.५६%
ए.एस.पाटील,स्तवनिधी



**Kempanna Goudar**
**99.20%**
भरतेश, बे.बागेवाडी



गायत्री घोरपडे
९१.३६%
पार्श्वमती कन्या, अकोळ



**Shobha Karigar**
**(Com.) 95.50 %**
**J. V. Mandal**
**PU College, Terdal**



**Divya Hanji**
**(Sci.) 94.66 %**
**Bharatesh PU**
**College, Bagewadi**

### *विदर्भ विभाग*



पलक जैन
९८.६०%
गुरुदेव समंतभद्र, वेरुळ




ज्ञानेश्वरी उपाध्ये
९७.४०%
कंकुबाई कन्या, कारंजा



सुहानी काशीकर
९६.२०%
म.ब्र.आश्रम हाय., कारंजा

## सर्व यशस्वितांचे हार्दिक अभिनंदन..!!!

RNI No. MAH/MAR/2006/21290/27-9-07 Reg. No. KLR-022/2024-2026 Posted at Bahubali on- 12-06-2025




**व्योम लिंग्विस्टिक लॅब्स फाउंडेशन**
**(www.sanskritfromhome.org)**
यांच्या तर्फे शुभेच्छा...!!

आम्ही संस्कृत शिक्षण, सर्वांसाठी सुलभ, आकर्षक आणि शैक्षणिकदृष्ट्या समृद्ध बनविण्यासाठी कटिबद्ध असलेले, संस्कृत ई-लर्निंग व्यासपीठ आहोत.

आपल्या प्रतिष्ठित मासिकामध्ये आमच्या जाहिरातीसाठी जागा उपलब्ध करून दिल्याबद्दल आम्ही आपले मन:पूर्वक आभार मानतो. या माध्यमातून 'संस्कृत - संस्कृति - संस्कार' (SSS) ह्या आमच्या संकल्पनेची जागृती प्रत्येक जैन व्यक्तीपर्यंत पोहोचण्याची आम्हाला खात्री आहे.

## बाहुबली येथे संपन्न धार्मिक बालसंस्कार शिबिराची क्षणचित्रे....



शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी उपस्थित डॉ. नेमिनाथ शास्त्री, प्रदीप धोतरे, उद्घाटनसत्राचे अध्यक्ष तात्यासो अथणे, प्राचार्य शांतिकुमार पाटील, गोमटेश बेडगे, ए. ए. खाडे, रवींद्र देसाई, अरुण चौगुले, बाबगोंडा पाटील



शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी मार्गदर्शन करताना गुरुकुलस्नातक प्राचार्य डॉ. शांतिकुमार पाटील, जयपूर

समापनप्रसंगी उपस्थित पदाधिकारी व विद्वत्वर्ग -



प्रेषक,
www.sanmatimasik.com
सन्मति प्रकाशन
पो. बाहुबली,
जि. कोल्हापूर-४१६ ११०
फोन : ९० ४९ ४७ ३४ ३४
E-mail : sanmatimasik@gmail.com

प्रति,

प्रकाशक : श्री. गोमटेश बेडगे, मालक : श्री बाहुबली ब्रह्मचर्याश्रम, बाहुबली
मुद्रण स्थळ : शिव इम्प्रेशन्स्, कोल्हापूर. प्रकाशन स्थळ : बाहुबली